म. ग्रं. सं. ठाणें.
विषय — चरित्र
सं. क्र. १५२०

REFBK-0008914

৩৭৫৪৭
৩৮৫/৫৩
বসি ৭৭২০

বাংলা গ্রন্থ সংগ্রহালয়, ঢাকা, ...
[illegible] ৫৩৮৫৭ বিঃ বসির
[illegible] ৭৭২০ তাং বিঃ ৭৮/৫/৫০

# आचार्य विनोबा भावे

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत

लेखक

मनोहर महादेव केळकर

वसंतपंचमी, [illegible] फेब्रुवारी १९५६

REFBK-0008914

किंमत एक रुपया चार आणे

मुद्रक
प्र. भा. काळे
प्रतिभा मुद्रणालय,
सदाशिव पेठ, टिळक रस्ता,
पुणे २

प्रकाशक
अ. स. वैद्य
यशवंत प्रकाशन,
घ. नं. ६८९/२४ सदाशिव पेठ,
पुणे २

कै० ती. तात्या व ताई

यांच्या पूज्य स्मृतीस

—मनोहर

# विनोबा-मानसदर्शन

खूप हिंडायचें, खूप पहायचें, अनेक अनुभव घ्यायचे आणि मग त्याबद्दलचा मजकूर लिहून काढायचा असें करणारा एक वर्ग असतो त्यांना लेखक म्हणतात. त्याउलट पुष्कळ पहायचें, खूप अनुभवायचें, पण तो अनुभव कागदावर मात्र उतरावयाचा नाहीं असें करणाराहि एक वर्ग असतो. आणि तो लेखकांच्यापेक्षां संख्येनें कितीतरी मोठा असतो. मानससरोवराचें यात्री आपले प्रवास-वृत्तांत कां लिहीत नाहींत असा एका पाश्चात्त्य लेखकाला प्रश्न पडला होता. पण त्यानें स्वतःच जेव्हां हे यात्री पाहिले तेव्हां त्याच्या प्रश्नाचें उत्तर त्याला आपोआप मिळालें. पायाकडे पहात, पावलापुढें पाऊल टाकून, करतां येतील तेवढ्या प्रदक्षिणा पूर्ण करून पुण्य संपादन करण्याच्या नादांत ते इतके तल्लीन झालेले असतात कीं, प्रवास-लेखनासारखी उपाधि ते पत्करूंच शकत नाहींत. त्यांना लेखक व्हायचें नसते, कीर्ति नको असतें, दुसरें कांहीं नको असते. फक्त एकच गोष्ट हवी असते; ती म्हणजे जीवनाचें सार्थक. कदाचित् जन्मोजन्मीं मानसप्रदक्षिणा करण्याची मनाशीं बाळगलेली इच्छा पूर्ण होण्याची आलेली ही संधि त्यांना जास्तीत जास्त साधायची असते. मानससरोवराच्या दर्शनानें त्यांचें हृदय उचंबळून आलेलें असतें. आणि मग कुठलें लेखन आणि कुठलें काय ! ‘ देह जावो अथवा राहो ’ या भावनेनें झपझप पावलें टाकून, प्रदक्षिणेबरोबरच मोक्षमार्गाचा प्रवास अत्यंत भावव्याकुल मनानें ते करीत असतात. काश्मीरमधील अमरनाथाची यात्रा करणारे

ce78

कांहीं यात्री तेथील एका घळींत बर्फ सांचून तयार होणाऱ्या शिवपार्वतीच्या मूर्ती पाहून सद्गदित होतात. आणि त्यांना त्यांची मिठी सोडवून तिथून परत आणणेंहि अवघड होतें, असेंहि सांगतात. श्रद्धेचें हें बळ आणि ही भावनिर्भर अवस्था आज माझ्यापासून अनंत योजनें दूर असली तरी तिचें महत्त्व मनानें समजण्याइतकी समजूत माझ्या अंगीं आहे.

वर वर्णिलेल्या दोन्ही वर्गांत—लेखक आणि लेखक नसणारे—मी वसत नाहीं कारण विनोबांचें हें चरित्र मी लिहिलें आहे खरें पण मी विनोबांना अजून पाहिलेलेंहि नाहीं. या थोर पुरुषाला न पाहतांच त्यांचें चारित्रकथन करण्याचें काम मी पत्करलें हें थोडें विचित्रच नाहीं का ? मग याच अधिकारानें इतर न पाहिलेल्या कर्तबगार व्यक्तींचीं चरित्रें मी कां लिहूं नयेत ? जगांत निरनिराळ्या क्षेत्रांत आपल्या कर्तबगारीनें गाजलेले सुल्तान काय कमी आहेत ? फक्त विनोबांचें चरित्र लिहिण्यालाच मी प्रवृत्त कां झालों असेन ?

वास्तविक विनोबा हेहि असेच एक सुल्तान आहेत. फरक एवढाच कीं त्यांचें वैभव फकीराचें आहे आणि तरीहि ते कुबेराला देखील विनम्र करणारें आहे. अशा या सुलतानाच्या वैभवानें मी दिपून गेलों, हरखून गेलों. वर्तमानपत्रें वाचून विनोबांचें एक व्यक्तिचित्र मी मनोमन रंगवीत असे. म्हणूनच त्यांचें चरित्र लिहिण्याचें काम मला मिळतांच मी तें पत्करलें. त्यांच्याबद्दलची थोडीफार माहिती मिळाली ती वाचून काढली. मग त्यांचे एक निकटचे सहकारी श्री. पानसे व विनोबावाङ्मयाच्या प्रसाराला वाहून घेणारे माझे एक ज्येष्ठ स्नेही डॉ. दातार यांच्या बरोबर मी चर्चा केली. विनोबांचें बरेचसें वाङ्मय वाचून काढलें, त्याचें चिंतन केलें आणि मग विनोबांचें जें चित्र माझ्या मनांत साकार झाले, त्यांचे जें मनोमन दर्शन झालें, त्याला शब्दरूप दिलें.

ही एक तऱ्हेची मानसपूजाच आहे. प्रत्यक्ष पूजा पत्करणें विनोबांनाहि आवडणार नाहीं; माझ्या स्वभावालाहि तें विचित्र वाटेल. कारण माणसानें माणसापुढें कांहीं एका मर्यादेपलकिडे सहसा वांकावें असें मला वाटत नाहीं. पण मानसपूजेंत सर्व उपचार व संकोच गळून पडतात. आणि तरीहि मानसपूजेचें श्रेष्ठत्त्व फार वर्णिलें आहे. प्रत्यक्षानुभव घेतलेले सांगतात कीं, अत्यंत तन्मयतेनें केलेल्या मानसपूजेंत मनोमन अर्पिलेल्या फुलांचा आणि धूपाचा सुगंध सभोवार असणारांनाहि प्रत्यक्ष अनुभवास येतो. इतकें मनाचें सामर्थ्य मोठें आहे. मी अत्यंत पवित्र भावनेनें विनोबांना ही माझी मानसपूजा अर्पण केली आहे. यांतील फुलें आणि धूप म्हणजे त्यांच्याच कर्तृत्त्वाचें आणि तत्त्वज्ञानाचें विवेचन होय. त्याचा अल्पसा सुगंध जरी या चरित्राच्या वाचकांच्या अनुभवास आला तरी ही माझी मानसपूजा सफल झाली असें मी समजेन.

माझे ज्येष्ठ स्नेही श्री. य. गो. **जोशी** यांनीं माझ्या डोक्यावर बसून हें लहानसें पुस्तक लिहून घेतल्यानें मला एकदम दोनतीन लाभ झाले आहेत. १९४६ सालीं माझें **उपायन** हें पहिलें पुस्तक प्रसिद्ध झालें होतें. त्यानंतर दहा वर्षांनीं हें नवें पुस्तक माझ्या खातीं जमा होण्याचा योग आला. माझ्या विद्यार्थीदशेंत कांहीं वर्षें मी ज्यांच्या निकट सहवासांत काढलीं, त्या **कै. ती. तात्या** आणि **ताई** म्हणजेच माझे चुलते **न. चिं. केळकर** आणि त्यांच्या पत्नी **दुर्गाताई**, यांच्या स्मृतीस हें पुस्तक कृतज्ञतापूर्वक अर्पण करण्याची संधि मला लाभली हा दुसरा लाभ. आणि ज्यांनीं माझ्या विद्यार्थीदशेपासून माझ्या लेखन-गुणाचें कौतुक केलें ते ती. बापूजी अणे यांचा आशीर्वादहि मिळाला. यांपैकीं कोणाचेच आभार मानण्याचें मला कारण नाहीं, पण उल्लेख करणें मात्र जरूर आहे.

**—मनोहर महादेव केळकर**

# आशीर्वाद

वाङ्मयशोभा मासिकाचे संपादक व सुप्रसिद्ध साहित्यिक मनोहरपंत केळकर यांनीं लिहिलेला आचार्य विनोबा भावे यांच्या-वरील लेख मी वाचला. या चरित्रवजा लिहिलेल्या छोट्या लेखांत विनोबाजींच्या व्यापक व लोकोत्तर विभूतिमत्वाचें वाचकांस यथार्थ दर्शन होऊं शकतें. विनोबाजींच्या आंतरजीवनाचा विकास कस-कसा होत गेला व "विन्याचा विनोबा" कसा झाला याची कल्पना केळकरांच्या लेखावरून करतां येते.

त्यांनीं एका सुल्तानाशीं विनोबांची तुलना करतांना थोड्या व मोजक्या शब्दांत विनोबांचें जें वर्णन केलें आहे त्यांत विनोबांच्या जीवनाचें व शिकवणीचें सगळें रहस्य सांठविलें आहे असें मला वाटतें.

"त्यांचें चरित्र स्वल्प असलें तरी त्यांचें चारित्र्य फार मोठें आहे आणि त्यांनीं केलेली मानवतेची सेवा फार मोठी आहे." "विनोबा हेहि एक सुलतानच आहेत. फरक एवढाच, कीं तो सुलतान गर्वोद्धत होता व त्याचें वैभव रक्तलांछित होतें; तर उलट विनोबा हे विनम्र आहेत व त्यांचें वैभव फकीराचें असले तरी ते कुबेरालाहि विनम्र करणारें आहे."

सारांश, विनोबाजी हे गीतेंत वर्णन केलेल्या दैवी संपत्तीचा पुतळा आहेत. प्रेमानें व परोपकारानें जगतांतून आसुरी संपत्तीचें उच्चाटन करून दैवी संपत्तीची प्रतिष्ठा करण्याचा उद्योग करणारे

ते स्थितप्रज्ञ कर्मयोगी आहेत. अनासक्ति तर त्यांच्या रोमरोमीं भिनलेली. समदर्शन त्यांच्या तेजस्वी नेत्रांतून प्रतिक्षणीं प्रकाशित होत असतें. विनोबाजी हे मूर्तिमंत वैराग्य व क्रियाशीलता. ज्ञान आणि कर्म यांचा हृदयंगम संगम जर पहावयाचा असेल तर तो त्यांच्या कृश शरिराच्या आंत असलेल्या विश्वव्यापी हृदयांत.

या थोर विभूतीचें केळकरांनीं आपल्या लेखांत काढलेलें शब्दचित्र यथार्थ व मनोज्ञ आहे. प्रत्येक सुजाण भारतीय तरुणानें त्याचें योग्य रीतीनें परिशीलन केल्यास त्याचें आंतील मनोमालिन्य नष्ट होईल, त्याच्या नैसर्गिक उदात्त विचारास उजळा मिळेल आणि त्याचे ठिकाणीं परोपकाराभिमुख क्रियाशीलता प्रगट होईल.

हें पुस्तक प्रत्येक तरुण व तरुणीच्या हातांत पडण्याची व्यवस्था राज्याच्या शिक्षणाची जबाबदारी वाहणाऱ्यांनीं अवश्य करावी.

ग्रंथकाराची लेखणी कसलेली आहे. पुस्तकाची भाषा सुलभ व ओघवती आणि लेखनशैली आकर्षक असल्यामुळें ग्रंथ पुरा झाल्याशिवाय वाचकास खालीं ठेववत नाहीं.

मीं श्रीयुत केळकर यांचें या लहान पण सुंदर कृतीबद्दल अभिनंदन करतों व हें अभिप्राय-लेखन संपवितों.

२६।१।५६
३४१ सदाशिव, पुणें २

—मा. श्री. अणे.

७५२०

# आचार्य विनोबा भावे

**भूदान** यज्ञाचे प्रवर्तक म्हणून आचार्य विनोबा भावे यांच्या कीर्तिदुंदुभी आज जगभर गाजत आहेत. इ. स. १९४० सालीं महात्मा गांधींनीं नियुक्त केलेले पहिले वैयक्तिक सत्याग्रही म्हणून विनोबा भावे यांचें नांव जगाला प्रथमच ज्ञात झालें.

या विसाव्या शतकांत जे भारतीय जगांत ख्यातनाम झाले त्यांचीं नांवें सांगा असें जर कुणीं म्हटलें, तर चटकन् पांचसात नांवें आठवतील. ' ओरायन 'सारख्या विद्वत्तापूर्ण ग्रंथाचा लेखक, इंग्रजांच्या सुसंस्कृत राज्यांत कारागृहांत कसा ठेवला जातो याची चौकशी व्हिक्टोरिया राणीकडे मॅक्समुल्लरसारख्या जर्मन पंडितानें केली त्यामुळेंच त्यांची कारावासांतून मुदतीपूर्वीं सुटका झाली, अशी एक आख्यायिका आहे. टिळकांच्या कीर्तीचा परिमल त्यांच्या विद्वत्तेमुळें प्रथम परदेशांत पसरला असला तरी ते जगांत ख्यातनाम झाले ते धुरंधर राजकारणी म्हणूनच. आपल्या

राज्यावर सूर्य कधींच मावळत नाहीं, नव्हे पुढेहि कधीं मावळणार नाहीं असा इंग्रजाला गर्व झाला होता. भारत हा राणीच्या मुकुटांतील कोहिनूर. हा कोहिनूर एक दिवस त्या मुकुटांतून ढळण्याची शक्यता आहे, अशी जाणीव जर इंग्रजाला प्रथम कुणीं करून दिली असेल तर ती टिळकांनींच. तेल्यातांबोळ्यांपर्यंत हक्कांची जाणीव नेऊन असंतोषाची ठिणगी जर कुणीं पेटविली असेल तर ती 'भारतीय असंतोषाचे जनक' जे लोकमान्य त्यांनींच.

जगांत गाजलेला दुसरा भारतीय म्हणजे स्वातंत्र्यवीर सावरकर. ब्रिटिश सिंहाची आयाळ धरून जोरानें जर कुणीं ओढली असेल तर ती 'अभिनव भारतां'तील आणि नंतर परदेशांत राहून काम करणाऱ्या क्रांतिकारकांनींच. या क्रांतिकारकांचा अग्रणी, अठराशें सत्तावनचा लढा हें बंड नसून स्वातंत्र्ययुद्धच होतें अशी खणखणीत ग्वाही देणाऱ्या तेजस्वी इतिहासग्रंथाचा लेखक आणि कैदी असतांनाहि ब्रिटिशांच्या आगनावेंतून उडी टाकून प्रथम फ्रान्सच्या किनाऱ्याचा आणि नंतर आंतरराष्ट्रीय कायद्याचा आधार घेऊन गाजलेला वीरपुरुष म्हणून सावरकर आंतरराष्ट्रीय कीर्ति पावले.

तिसरे महात्मा गांधी. सत्याग्रहामुळें आफ्रिका खंडांत प्रसिद्धी मिळवून नंतर अहिंसेच्या तत्त्वज्ञानाचें आणि निःशस्त्र क्रांतीचे प्रणेते म्हणून ते जगाला माहीत झाले. Quit India असें इंग्रजांना स्पष्ट सांगूनच ते थांबले नाहींत तर ऐन युद्धकाळांत त्यांनीं हिंदुस्थानभर आग पेटविली. लोकशाहीच्या इंग्रजी घोषणा हें केवळ थोतांड आहे; पस्तीस कोट लोकांना गुलामगिरींत डांबून ठेवून इंग्रज लोकशाहीकरितां लढूंच शकत नाहींत

अशी इंग्रजांची साऱ्या जगभर बदनामी झाली ती गांधींच्या पराक्रमामुळेंच.

गांधींनीं पोखरलेल्या ब्रिटिश सिंहासनाला जर कुणीं गदगदां हलवलें असेल तर तें सुभाषचंद्र बोस यांनीं. शिवाजीमहाराजांच्या आग्र्याहून सुटकेइतक्याच सुरस आणि चमत्कारिक पद्धतीनें इंग्रजांच्या हातावर तुरी देऊन ते निसटले आणि जर्मनी व जपान या शत्रुराष्ट्रांत जाऊन तेथें अडकलेल्या भारतीय सैनिकांच्या सहकार्यानें त्यांनीं भारताच्या स्वातंत्र्याचा लढा भारताच्या भूमीबाहेर जाऊन चालविला. इंग्राजांना भारत सोडायला लावण्याचें कांहीं श्रेय सुभाषबाबूंना निश्चित द्यावें लागेल. सैन्यांत बेदिली माजलेली असून तेंहि आपल्या बाजूस राहील किंवा नाहीं याची इंग्रजांना शाश्वति वाटेनाशी झाली तेव्हांच त्यांनीं भारत सोडण्याचा निर्णय घेतला. स्वातंत्र्य मिळण्यापूर्वींच सुभाषबाबू स्वर्गवासी झाले पण त्यांचा कीर्तिदुंदुभि साऱ्या जगांत गाजवूनच ते गेले.

पंडित जवाहरलाल नेहरू आज आपल्यांत असून जगांतल्या महान् राष्ट्रांतल्या नेत्यांच्या बरोबरीनें आज त्यांचें नांव घेतलें जातें. अमेरिकेचा आयसेनहोअर, रशियाचा बुल्गानिन, चीनचा माऊत्से तुंग, इंग्लंडचा ईडन या चौघांना शांततेच्या सूत्रानें बांधून जागतिक शांततेकरितां अधिकांत अधिक प्रयत्न करणारे शांततावादी वीरपुरुष म्हणून नेहरूंचें नांव आज जगभर गाजत आहे.

जगांत दोन युद्धमान गटच फक्त असूं शकतात असें नाहीं तर तिसरा शांततावादी गटहि असूं शकतो असें नेहरूंनीं घोषित केलें. परक्यांना तें मानवलें नाहीं आणि अनेक स्वकीयांना तें पटलें नाहीं. पण शांततावाद म्हणजे केवळ अलिप्ततावाद नाहीं

तर ती एक विधायक शक्ति आहे, असें त्यांनीं सतत प्रयत्नानें जगाला पटवून दिलें. गेल्या दोन महायुद्धांनीं जग पुरेसें होरपळलें आहे. जगाला शांतता हवी आहे, पण दोन गट एकमेकांना भेडसावीत असल्यामुळें शांततेचें वातावरण निर्माण व्हायचें कसें हाच प्रश्न होता. पण पंडितजींच्या प्रयत्नानें हें असाध्य तें साध्य होऊं घातलें आहे; आणि म्हणूनच भारतांतील जगद्विख्यात पुरुषांत पंडितजी अग्रगण्य आहेत असेंच म्हटलें पाहिजे.

पण पंडितजी बाहेरच्या जगांत शांतता-प्रस्थापनेचें कार्य करीत असतां खुद्द स्वदेशांतच धुमसणारी एक आग विझवायचा अभिनव प्रयत्न करणारा, चरत जाणारें एक दुखणें वेशीवर टांगून त्याला उपाय केला नाहीं तर तुमचा विनाश ओढवेल असें सांगूनच न थांबतां आपल्या परीनें उपायहि सुचविणारा एक महापुरुष एकदम प्रकाशांत आला आहे. त्याची राहणी संन्याशाची आहे, वृत्ति विदेही आहे. त्याला कसला लोभ नाहीं, कसला राग नाहीं, कुणांबद्दल द्वेष नाहीं, पण त्याचें अंतःकरण पीडितांच्या अनुकंपेनें ओतप्रोत भरलेलें आहे :

**ज्यासी आपंगिता नाहीं, त्यासी धरी जो हृदयीं ।**
**तोचि साधु ओळखावा, देव तेथेंचि जाणावा ॥**

हें तुकाराममहाराजांचें म्हणणें ज्यांना सर्वस्वीं लागू पडतें तेच पौनारच्या आश्रमांतील महापुरुष **विनोबा भावे** हे होत. नेहरूंच्या कीर्तीचे पडघम जगभर वाजत असतांहि ज्याच्या उक्ति आणि कृतींचा घंटानाद जगांतल्या विचारवंतांच्या कानांपर्यंत स्वच्छ ऐकूं जाऊं लागला आहे त्या पुरुषाची गणना भारताच्या जगद्विख्यात पुरुषांत सहज होऊं शकेल. आपले आचार्य

विनोबा भावे यांचें नांव आज भारतांतच नव्हे तर जगांतहि बहुमुखीं झालेलें आहे, असें म्हटलें तर अतिशयोक्ति खास होणार नाहीं.

शिकंदर, सीझर, नेपोलियन, हिटलर इत्यादि पुरुषांचीं नांवेंहि सर्वतोमुखीं झालेलीं आहेत. आजच्या काळांत सिनेमा, रेडिओ इत्यादि साधनांमुळें नटनटींचीं नांवेंच काय पण औषधांचीं नांवेंसुद्धां जगभर प्रसिद्ध होतात. पण या सर्व प्रकारच्या कीर्तीमध्यें पुष्कळच फरक असतो. नट-नटी आणि औषधें यांचीं नांवें सवंग गाण्यांप्रमाणें किंवा जलाशयाच्या लहरींप्रमाणें ऐकतां ऐकतां आणि पाहतां पाहतां नाहींशीं होतील. शिकंदर, नेपोलियन यांसारख्या जगद्जेत्यांचीं नांवें जगांत राहतील पण त्यांच्या देशाइतकीं इतरत्र आदरणीय वाटणार नाहींत. पण ज्यांनीं स्वतःचें सर्वस्व मानवतेच्या उद्धारासाठीं वाहिलें, ज्यांचें जीवन हें स्वतः जळून इतरांना मार्गदर्शन करणाऱ्या ज्योतीप्रमाणें असतें अशा विभूतींचीं नांवें सर्वत्र आणि सर्वकाळ आदरणीय ठरतात. अशाच विभूतींमध्यें **आचार्य विनोबा भावे** यांची गणना करावी लागेल.

मोठीं माणसें जीं महान् कार्यें सिद्धीस नेतात किंवा असेंहि म्हटलें तरी चालेल कीं, जीं महान् कार्यें तडीस नेल्यामुळेंच लोक या माणसांचा मोठेपणा ओळखूं लागतात, तीं कामें पार पडलेलीं पाहून लोक एकदम चकित होतात. एखादें सुंदर तळें पाहून पाहणाराला आनंद होतो; डौलानें डुलणारीं धान्यांचीं कणसें पाहून बघणाराची दृष्टि धन्य होते; पण ‘ थेंबें थेंबें तळें सांचे’ हें त्याच्या ध्यानांत येत नाहीं किंवा शेतकऱ्यानें जमिनीची आधीं किती मशागत केली असेल आणि नंतरहि शेत पिकेपर्यंत

तो किती खपला असेल हेंहि चटकन् समजून येत नाहीं. पण थोडा विचार केला असतांहि या गोष्टी सहजच लक्षांत येतील.

एखादी कलाकृति पाहून सामान्य माणसासहि आनंद होतो. पण ती कलाकृति कशी घडली आणि त्यापेक्षांहि ती कलाकृति पूर्ण होण्यापूर्वी तो कलावंत कोणच्या मानसिक अवस्थांतून गेला आणि त्यानें किती कष्ट केले हें समजून घेणेंहि तितकेंच आनंददायक असतें. जी गोष्ट कलाकृतीसंबंधीं खरी आहे तीच गोष्ट थोर व्यक्तींच्या सफल जीवनाविषयींहि खरी आहे. त्यांचें जीवन सफल झालेलें आपण पाहातों; त्यांचें मोहरलेलें व्यक्तिमत्त्व आपल्या मनाला ओढ लावतें; पण हें घडविण्याकरितां त्यांनीं कसे प्रयत्न केले, भोंवतालची परिस्थिति त्यांना किती अनुकूल व प्रतिकूल ठरली हें पाहाणेंहि नुसतें मनोरंजकच नव्हे तर उद्बोधकहि असतें. विनोबा भावे यांच्या भूदान-यज्ञानें आज साऱ्या जगाचें लक्ष वेधून घेतलें आहे. त्यावर अनुकूल-प्रतिकूल टीकाहि होत आहेत. जयप्रकाश नारायण यांच्यासारखीं थोर माणसें राजकारण सोडून देऊन विनोबांच्या कार्याला वाहून घेत आहेत. चेस्टर बोल्ससारखा अत्यंत सुसंस्कृत, बुद्धिमान् आणि अमेरिके-सारख्या महान् राष्ट्राच्या भारतांतील वकिलीचें एका काळीं जबाब-दारीचें काम करणारा गृहस्थ विनोबांच्या भूदानकार्याचा प्रचार अमेरिकेंतहि करीत आहे.

हेच विनोबा गांधीजींच्या मृत्यूपूर्वीं स्वतःपुरते विदेहीपणें राहून समाजाची सेवा मात्र अष्टौप्रहर करीत होते. त्यांची जगाला फारशी माहितीहि नव्हती. पहिले वैयक्तिक सत्याग्रही म्हणून गांधीजींनीं त्यांची निवड केली त्या वेळीं त्यांचा परिचय करून देण्याकरितां गांधींनीं स्वतः एक लेख लिहिला होता. तेच विनोबा गेल्या

अवघ्या चार वर्षांत जगाच्या कुतूहलाचा, भारतीयांच्या कौतुकाचा, कांहीं थोड्यांच्या टीकेचा, पण अनेकांच्या भक्तीचा व आदराचा विषय झाले आहेत. त्यांनीं लिहिलेलीं पुस्तकें हजारोंनीं खपत आहेत, लाखों लोक त्यांच्या प्रार्थना व प्रवचनें श्रवण करीत आहेत. सूर्य आणि चंद्र एकत्र कधीं दिसत नाहींत. कन्याकुमारीला ते पौर्णिमेच्या दिवशीं एकत्र दिसतात असें सांगतात; तरी देखील त्या वेळीं मावळता सूर्य आणि उगवता चंद्र दृष्टीस पडतो. पण पंडित नेहरू मध्यान्हींच्या सूर्याप्रमाणें तेजस्वी व्यक्तिमत्त्वानें तळपत असतांनाच क्षितिजाच्या किती तरी वर विनोबांच्या शांत व उदात्त व्यक्तिमत्त्वाचा चंद्र तळपतांना दिसावा हा अजब चमत्कार नाहीं काय? हें व्यक्तिमत्त्व त्यांनीं कोणत्या तपश्चर्येनें साध्य केलें त्याचा मागोवा आपण घेणार आहोंत.

◆ ◆ ◆

विनायक नरहर भावे यांचा जन्म कुलाबा जिल्ह्यांतील गागोदें या गांवीं ११ सप्टेंबर १८९५ या दिवशीं झाला. ११ सप्टेंबर १९५५ या दिवशीं त्यांच्या वयास साठ वर्षें पूर्ण झालीं. साठ वर्षांनीं जगांत विख्यात होणारें पुत्ररत्न आपल्या पोटीं आज जन्मास आलें आहे, अशी कल्पना त्यांच्या जन्मदात्रीच्या मनांतहि नसेल. विनोबांचें बरेचसें बालपण त्यांचे आजोबा शंभुराव यांच्या जवळच गागोदें आणि वांई येथें गेलें. शंभुराव वृत्तीनें धार्मिक असले तरी सनातनी नसून प्रागतिक होते. वांई येथें त्यांनीं श्रीकोटेश्वराचें मंदिर बांधून त्याचा उत्सव सुरू केला होता. या उत्सवाचे दिवशीं या देवळांत हरिजनांनाहि मुक्तद्वार असे. इतकेंच नव्हे तर देवापुढें गाण्यासाठीं ठेवलेला

गवईसुद्धा मुसलमान होता. आजोबांची ही जातिधर्मभेदातीत वृत्ति त्यांच्या सहवासानें विनोबांच्या अंगीं बाणली असली तर नवल नाहीं. त्यांचे आजोबा चांद्रायणव्रतासारखीं अनेक व्रत-वैकल्यें करीत. या गोष्टींचाहि विनोबांच्या मनावर परिणाम झाला आणि ईश्वरावरील श्रद्धेला त्यांच्या जीवनांत एक विशेष स्थान प्राप्त झालें. ईश्वराइतकीच त्यांची त्यांच्या आईवर आणि पुढें बापूजींवर श्रद्धा होती. ते स्वतः उत्तम बुद्धिवादी आहेत. एखादा विचार घांसूनपुसून कसा मांडावा हें त्यांना उत्तम समजतें. तरीसुद्धां भावनेला त्यांच्या जीवनांत असलेलें स्थान पाहून आनंद वाटतो. आश्रमवासी झाल्यानंतरहि कित्येक दिवस-पर्यंत आपल्या आईचें नेलेलें एक लुगडें शांत झोंप यावी म्हणून ते उशागतीं घेत असत. नंतर बापूजींनीं विणलेलें एक धोतर ते उशाला घेऊं लागले.

मनुष्याचें बालपण हें रम्य तर खरेंच, पण मनुष्याच्या पुढच्या आयुष्याचा पाया घालणारें असल्यामुळें महत्त्वाचेंहि आहे. मनुष्य जन्माला येतांना अनेक सदसद्प्रवृत्ति घेऊन जन्माला येतो. त्याला बालपणांत शिक्षण मिळतें त्यावरच त्याच्या सद्प्रवृत्तींची वाढ होणें अवलंबून असतें; अर्थात् बालपणाचें हें महत्त्व आईबाप व शिक्षक यांनींच ओळखावयाचें असतें. त्यांतहि शाळेंत जाण्यापूर्वीं आणि शाळेंत गेल्यानंतरही दिवसाचे बरेच तास तो घरीं असतो. म्हणून ही जबाबदारी आईबापांवर अधिकतर आहे आणि त्यांतल्या त्यांत आईवर अधिकतम आहे. कारण, ती मुलाला नऊ महिने पोटांत संभाळते. तेथपासून ती त्याच्यावर अन्नाचे, विचारांचे आणि भावनांचे संस्कार करीत असते. बाल्यांतही त्याचें लालनपालन करतांना प्रत्यक्षाप्रत्यक्ष

अनेक प्रकारचें शिक्षण तीच त्याला देत असते. म्हणूनच 'जिच्या हातीं पाळण्याची दोरी ती जगातें उद्धारी' असें म्हटलें आहे तें सार्थ आहे. बालपणचें हें महत्त्व ओळखणारे आईबाप लाभणें ही परमभाग्याची गोष्ट मानली जाते. शिकंदर, नेपोलियन, शिवाजी यांसारखे थोर पुरुषहि याकरितांच आईला अत्यंत मानीत होते. विनोबांच्या सद्भाग्यानें त्यांना आई अतिशय उत्तम लाभली होती आणि पहिल्या दहा वर्षांत ते वडिलांजवळ नसले तरी त्यांच्या आजोबांनीं ती उणीव भरून काढली होती.

त्यांचे आजोबा शंभुराव यांना फार मोठी सामाजिक दृष्टि होती. त्यागबुद्धि म्हणजे काय, सामाजिक ऋण म्हणजे काय हें त्यांना चांगलें समजलें होतें आणि स्वतःच्या आचरणानेंच या गोष्टी ते मुला-नातवंडांना शिकवीत. आदर्श हा उपदेशापेक्षां श्रेष्ठतर असतो– Example is better than precept – अशी जी म्हण आहे ती शंभुरावांचे बाबतींतच नव्हे तर विनोबांच्या आईच्या बाबतींतहि संपूर्णपणें खरी होती. घरच्या झाडांचे प्रथम आलेले आंबे घरांत न ठेवतां आधीं घरोघर मुलांच्या हस्तें ते वांटीत व मग घरांत खायला आणीत. त्यांची आईदेखील घरांत केलेला विशेष जिन्नस प्रथम 'विन्या'च्याच हस्तें शेजाऱ्या-पाजाऱ्यांना पोंचवीत असे. या माउलीच्या पोटीं दातृत्वबुद्धि आणि ओठींहि संतवचनें असत. समाजऋण कसें फेडावें आणि देकारांतहि किती आनंद असतो याचें ज्ञान विनोबांना आजोबांकडून व आईकडून अगदीं बालपणींच वारसाहक्कानें मिळालें. वडिलांची ही शिकवण आणि पुण्याई त्यांना पुढील आयुष्यांत शिदोरीसारखी उपयोगी पडली असेल यांत शंका नाहीं.

विनोबांचे वडील बडोद्यास रहात असत. तेथें ते कापडाच्या एका गिरणींत टेक्स्टाइल टेक्नॉलॉजिस्ट म्हणून नोकरीस होते. त्यांना अनेक प्रकारचे व्यावसायिक प्रयोग करून पाहण्याची आवड होती. ते चांगले गणिती होते. त्यांनींच पुढें विनोबांना गणित शिकविलें. त्यांचा स्वभाव मात्र कांहींसा एककल्ली असावा. विनोबांचा जन्म आजोबांचे घरीं झाल्याचें वर सांगितलेंच आहे. त्यांची आईहि त्यांचेजवळ येऊन-जाऊन असे, पण वडील मात्र बडोद्यास एकटेच रहात. वयाचीं पहिलीं दहा वर्षें विनोबांनीं आजोबांजवळच गागोदें व वांई येथें काढलीं. मुलाच्या मनावर शिक्षणाचा जसा परिणाम होतो तसा भोंवतालच्या नैसर्गिक परिस्थितीचाहि होतो; म्हणूनच वर्ड्स्वर्थसारखे किंवा टागोरांसारखे कवि आणि तत्त्वज्ञ "निसर्गाच्या सान्निध्यांतच माणसाला खरें शिक्षण मिळेल" असें म्हणतात. गागोद्याला सभोंवतालीं खूप डोंगर होते. त्या डोंगरांवर विनोबा मनसोक्त भटकत. निसर्गाच्या विशालपणाचा परिणाम संस्कारक्षम मनावर होतोच होतो. ह्या भटकण्यामुळें विनोबा कणखर झाले आणि त्याचा उपयोग त्यांच्या आजच्या भ्रमंतींतहि त्यांना होत असला पाहिजे. भटकण्याप्रमाणेंच वाचण्याचाहि त्यांना खूप नाद होता. पण कांहीं तरी उगाच वाचावें असें त्यांना वाटत नसे. ते जें वाचीत तें नीट समजून व मननपूर्वक वाचीत. आईला 'टिळकांचा केसरी' वाचून दाखवणें हा एक त्यांचा आवडता छंद होता.

विनोबांचें मोठेपण जगाला खूप उशीरां कळलें असलें तरी त्यांना कांहीं तें एकदम प्राप्त झालेलें नाहीं. साधा पाथरवट असला तरी तो आपल्या टांकीनें जातें घडवतो, कुशल कारागीर देवाची सुंदर मूर्ति बनवितो. मनुष्यजन्माचें सार्थकहि करतां येतें

आणि तो वायांहि घालवतां येतो; पण हें मुख्यतः स्वतःच करायचें असतें. विनोबांनीं स्वतःपुरता हा कार्यभाग निश्चयानें, कष्टानें आणि विचारपूर्वक पार पाडला. आपण ब्रह्मचर्यव्रतानें आजन्म रहावें अशी बुद्धि वयाच्या दहाव्या वर्षी होणें हा सुकृताचा भाग. ह्या निश्चयाला साथ देणारी आई भेटणें हाहि सुकृताचाच भाग म्हणतां येईल. पण हा निश्चय मनःपूर्वक आणि आनंदानें अमलांत आणणें, हा विनोबांच्या स्वतःच्या पराक्रमाचाच भाग नव्हे काय ?

मनुष्य पशूहि आहे आणि देवहि आहे. तो पशूसारखा वागतो हें तर अनेकदां आपण पाहातों. पण मनांत आणलें तर त्याला देवहि बनतां येतें, यावर विनोबांचा विश्वास आहे. इतकेंच नव्हे तर जगांतील इतर मानवांच्या हृदयस्थ परमेश्वराला साद घालून माणसाचें देवपण जागें करतां येईल, अशी त्यांची श्रद्धा आहे, आणि या श्रद्धेची प्रचीतीच भूदान-यज्ञाच्या निमित्तानें ते घेऊन पाहात आहेत. त्यांच्या पुढील आयुष्यांतील सर्व साधनांचा पाया त्यांनीं वयाच्या दहाव्या वर्षी ब्रह्मचर्य-व्रताच्या स्वीकारानें घातला असें म्हणावयास हरकत नाहीं.

विनोबांची आई ही अगदीं वेगळ्या प्रकारची आई होती. मुलानें लग्न करावें, आपण सुनमुख पाहावें आणि वृद्धपणीं नातवंड खेळवावें अशी उत्सुकता साहजिकच प्रत्येक आईला असते. विनोबांची माता रुक्मिणीबाई यांना या गोष्टीचें महत्त्व कळत नव्हतें असें नाहीं. पण यापेक्षांहि अधिक महत्त्वाच्या गोष्टी जगांत असतात याची त्यांना जाणीव होती. आपलाच संसार सुखाचा करण्यापेक्षा इतरांच्या संसारांतील दैन्यदुःख निवारण करण्यांतहि आनंद असतो; आणि आपला मुलगा कालांतरानें अशाच एका

महान् कार्याला वाहून घेणार आहे हें जणूं कांहीं तिला दैवी सामर्थ्यानें आधींच कळलें होतें. मुलाचा निश्चय ऐकून ती म्हणाली, “ उत्तम गृहस्थाश्रम केला तर पितृऋण फिटतें, उत्तम ब्रह्मचर्य साधलें तर चाळीस पिढ्यांचा उद्धार होतो. ” चाळीस पिढ्यांचा उद्धार या माउलीच्या म्हणण्याप्रमाणें विनोबांच्या कुळांत तर घडला असेलच, पण लक्षावधि पीडित जनता मात्र त्यांच्याकडे आज उद्धाराच्या आशेनें पहात आहे. विनोबांचे धाकटे दोघे बंधु, बाळकोबा आणि शिवाजी, या दोघांनींहि ब्रह्मचर्य व्रताचीच दीक्षा घेतली आहे.

◆ ◆ ◆

इ. स. १९०५ सालीं, विनोबांच्या वयाच्या दहाव्या वर्षी, त्यांच्या वडिलांनीं आपलें कुटुंबच बडोद्यास आणलें आणि विनोबांना शाळेंत घातलें. दोन वर्षांत प्राथमिक शिक्षण संपल्यानंतर पुढील तीन वर्षें वडिलांनीं त्यांना घरींच शिकवलें. त्यांना शिकवायची हौस होती आणि त्यांनीं विनोबांकडून इंग्रजी, गणित वगैरे विषय करून घेतले आणि मग एकदमच त्यांना इंग्रजी शाळेंत चौथ्या इयत्तेंत बसवलें. मूळची तीव्र बुद्धिमत्ता आणि वडिलांनीं करून घेतलेली तयारी यामुळें आरंभीं ते खूप हुषार विद्यार्थी म्हणून गाजले; पण पुढें अवांतर वाचनांत त्यांचें लक्ष अधिकाधिक गुंतूं लागलें आणि मग परीक्षेच्या अभ्यासांत त्यांचें मन रमेना. मग केवळ परीक्षेपुरता अभ्यास ते करूं लागले. अर्थातच हुषार विद्यार्थी हा त्यांचा लौकिक लोपला. आपल्या मित्रांच्या गटासह ते वर्गांत मागें बसूं लागले. आणि त्यांची बुद्धिमत्ता जणूं लोपली असें इतरांना वाटूं लागलें.

पण विनोबांना या गोष्टीची फिकीर नव्हती. त्यांना सध्यां राजकारणाचें वेड लागलें होतें. ते आणि त्यांचे मित्र देशाच्या स्वातंत्र्याबद्दल विचार करीत. बंदी असलेलीं वर्तमानपत्रें आणि पुस्तकें हरप्रयत्नानें मिळवून तीं वाचीत. खांद्यावर सदरा टाकून भटकण्याचा जसा त्यांना नाद होता, तसाच त्यांचा वाचनाचा छंदहि मुलुखावेगळा होता. एखाद्या पुस्तकांतला एखादा भाग आवडला म्हणजे तोच ते पुनःपुन्हा वाचीत बसत. वडिलांचा छांदिष्टपणा थोडाफार त्यांच्यांतहि उतरला होता असें म्हणावयास हरकत नाहीं. या छांदिष्टपणाचा पुढें उपयोगी पडण्याजोगा एक चांगला फायदा मात्र झाला. त्यांची स्मरणशक्ति तीव्र असल्यानें त्यांनीं पुनःपुन्हा वाचलेला मजकूर त्यांना सहजच मुखोद्गत होई. किती तरी संतवचनें त्यांना पाठ येत. मोरोपंतांची केकावलि त्यांना पाठ झाली होती. ती ते घडाघड म्हणत आणि सगळी आळी गर्जून सोडीत. केकावलीवर त्यांचें फार प्रेम होतें. केकावलीनें माझा संस्कृतच्या अभ्यासाचा मार्ग सोपा केला असें ते म्हणत.

त्यांच्या तीव्र स्मरणशक्तीविषयींची एक गोष्ट मोठी उद्बोधक आहे. एकदां मास्तर विद्यार्थ्यांना धडा समजून देत होते आणि धड्यावर टिपणें पण देत होते. विनोबा टिपणें घेण्याऐवजीं उदाहरणें सोडवीत बसले होते. मास्तरांच्या नजरेस ही गोष्ट आल्यावर ते म्हणाले, “ अहो भावे, तुमचीं टिपणें दाखवा बरं वाचून?” विनोबा उठून उभे राहिले आणि त्यांनीं वही पुढें धरून तीं सर्व टिपणें घडाघड वाचून दाखविलीं. मास्तरांना मोठें आश्चर्य वाटलें. त्यांनीं वही पाहण्यासाठीं मागितली. त्यावर विनोबा म्हणाले, ‘ सर, ती वही तुम्हांला वाचतां येणार नाहीं!’

मास्तरांनीं जवळ येऊन पाहिलें तों ती वही त्यांना अगदीं कोरी दिसली.

विनोबांना शाळेंत मात्र संस्कृतच्या ऐवजीं वडिलांच्या सांगण्यावरून फ्रेंच घ्यावें लागलें. वडिलांना संशोधनाची फार आवड. ते म्हणत, संशोधनाला फ्रेंच भाषाच उपयोगी पडेल. आईला मात्र वाटे कीं, आपल्या मुलानें संस्कृतच घ्यायला हवें होतें. आपलें सारें जुनें ज्ञानधन संस्कृतमध्यें. तेव्हां ती न शिकून कसें चालेल? ती म्हणे, " विन्या, संस्कृत ही आपल्या धर्माची भाषा. ती नको का तुला यायला ? " त्यावर विनोबा म्हणत, " संस्कृत यायला हवें असेल तर तेंहि येईल. पण दरएक गोष्ट शाळेंतच शिकायला हवी असें थोडेंच आहे ? " त्यांना स्वतःलासुद्धां गीता समजण्याकरितां संस्कृत शिकण्याची आवश्यकता पटली होती. त्यांनीं ऐकलें होतें कीं, लोकमान्य टिळक गीतेवर एक विस्तृत टीका लिहीत आहेत. तो ग्रंथ प्रसिद्ध झाल्यावर वाचायचा म्हटला तरी देखील स्वतः आधीं गीता मननपूर्वक वाचणें जरूर होतें आणि ज्यावेळीं त्यांना गीतारहस्य वाचायला मिळालें त्या वेळीं स्वतःजवळ प्रत नसल्यानें जिथें त्याची प्रत होती तिथें जाऊन त्यांनीं रात्रीच्या वेळीं देखील आठ-आठ तास बसून अवघ्या तीनचार दिवसांत तें वाचून संपविलें.

पण हें सगळें चालू असतांना त्यांच्या डोक्यांत मात्र राजकारण आणि देशकारण हेच विषय घोळत होते. कांहीं मित्रांसमवेत त्यांनीं एक वाचनालय काढलें तेंहि त्याच हेतूनें. तें चालवायला पैसे नव्हते, तर गणिताचा वर्ग चालवून त्यांनीं पैसा उभा केला. त्यांचा गणित हा विषय इतका चांगला होता कीं, मॅट्रिक झालेल्या या मुलाच्या वर्गाला देखील विद्यार्थी मिळूं लागले.

त्या काळच्या क्रांतिकारक कल्पनांनीं त्यांचें मन भारावून गेलें होतें. सावरकरांचें मॅझिनीचरित्र त्यांना फार आवडत असे. टिळक-आगरकरांच्या लेखनावर त्यांची भक्ति होती. पण त्यांना असेंहि वाटे कीं, नुसतें लेखन आदर्श वाटून काय उपयोग? कल्पनांना अर्थ प्राप्त व्हावयाचा असेल तर तो सर्वस्वत्यागानेंच होईल. म्हणजे अशा त्यागाची तयारी करणें ओघानेंच आलें. आणि तो विचार त्यांना चैन पडूं देईना. घर सर्वस्वीं सोडलें पाहिजे असेंहि त्यांना वारंवार वाटूं लागलें.

पण घर सोडून जायचें कुठें? बेझंटबाईकडे जावें असें वाटेना आणि लोकमान्यांकडे जायची हिंमत होईना. लोकमान्य टिळकांबद्दल तरुण-पिढीला वाटणारा आदर भीतियुक्त होता. लोकमान्यांचें चारित्र्य, त्यांचा करडा स्वभाव, त्यांची बौद्धिक उंची आणि कुठलीहि जाहिरात न करतां त्यांनीं केलेला असामान्य त्याग आणि सोसलेले कष्ट, यांमुळें त्यांच्याबद्दल सर्वांनाच एक विशेष प्रकारचा दरारा वाटत असे. "बेझंटबाई नकोत आणि टिळकांकडे जायचें नाहीं, मग काय हिमालयांत जाणार?" असें मित्र विचारीत.

"हिमालयांत जायचें तें परत न येण्याकरितां. पण ज्याला जगांत देव सांपडत नाहीं त्याला तो हिमालयांत तरी कशावरून सांपडेल?" विनोबा म्हणत.

वरील संवादावरून त्यांच्या मनःस्थितीची कांहींशी कल्पना येईल.

◆◆◆

इ. स. १९१६ च्या सुरुवातीची गोष्ट. मार्च महिन्यामध्यें ते मुंबईला इंटरमीजिएटच्या परीक्षेला जाणार होते. पण त्यांनीं आपल्या मनानें गाडीचा सांधा बदलायचा निर्णय केव्हांच घेतला होता. पुढें नक्की काय करायचें हें त्यांचें ठरलें नव्हतें. तरी पण चालू चाकोरी सोडून बाहेर पडावयाचें आणि मगच नवीन मार्ग सांपडतो का तें पाहावयाचें असें मात्र त्यांनीं ठरवून टाकलें. पाण्यांत पडल्याशिवाय पोहतां येणार नाहीं असें त्यांना वाटूं लागलें असावें.

मित्रांनींहि आपल्याबरोबर जीवनाचा मार्ग बदलावा असें त्यांना वाटे. पण त्यांना कुणावर कांहीं लादावयाचें नव्हतें. अर्थात् आतां ते स्वतः मात्र कुणाकरितांहि थांबणार नव्हते. आपल्या मनाचा कांहींसा थांग त्यांनीं आईला तेवढा लागूं दिला होता. एके दिवशीं सकाळीं आई स्वयंपाकघरांत काम करीत असतांना ते आईजवळ येऊन बसले. त्यांच्या हातांत एक कागदाची गुंडाळी होती. तिचें एक टोंक त्यांनीं विस्तवावर धरलें. तेव्हां आईनें विचारलें, " हें काय करतो आहेस ?"

विनोबा उत्तरले, " शाळा-कॉलेजांतील सर्व सर्टिफिकिटें मी जाळून टाकतों आहें. "

" आणि पुढें तीं केव्हां तुला लागलीं तर ? "

" छे, छे, कॉलेज सोडायचें माझें नक्की झालें आहे. आतां तीं मला कधींच लागणार नाहींत. मग ज्याची जरूर नाहीं त्याचें ओझें हवें कशाला ? "

दुसरी एखादी आई असती तर मुलाचीं हीं लक्षणें पाहून ती पार घाबरून गेली असती. मुलाच्या मनांत कांहीं वेडेविद्रे

विचार तर येत नसतील ना, असाहि तिला धाक पडला असता. कारण, मुलाच्या राजकारणी प्रवृत्ति तिला माहीत होत्या; पण जिनें मुलाला स्वतःच त्यागाची शिकवण दिली होती, आणि ब्रह्मचर्यव्रतपालनाची शपथ घेतांना उत्तेजन दिलें होतें, अशी ती माउली अशा वेळीं थोडीच कच खाणार होती?

मुलाच्या मनावर उत्तम संस्कार करणाऱ्या आईला किंवा गुरूला हें माहीत असतें कीं, हा विचारधर्म एक दिवस आचार-धर्मांत परिणत होणार आहे आणि म्हणूनच मुलगा जेव्हां प्रत्यक्ष आचरणांत आपले संस्कार उतरवितो तेव्हां त्यांना मनापासून आनंदच होतो. जें थोडेंफार दुःख होतें तें केवळ मायेच्या पोटीं असतें आणि तें साहजिकच असतें. तें दुःख जोंपर्यंत प्रगतीच्या आड येत नाहीं तोंपर्यंत त्याची खंत करायचें काय कारण!

मार्च महिन्यांत विनोबा मित्रांसमवेत परीक्षेकरितां म्हणून मुंबईस जाण्यास निघाले. वाटेंत ते सुरतेस उतरले आणि भुसावळ मार्गें त्यांनीं काशीस प्रयाण केलें. सुरतेला निकटच्या मित्रांनीं जेव्हां "तूं असें कां करतोस?" म्हणून विचारलें, तेव्हां "अथातो ब्रह्मजिज्ञासा" असें सूत्रबद्ध उत्तर त्यांनीं दिलें. या ब्रह्म जाणून घेण्याच्या आणि परमात्म स्वरूपांत स्वत्व विलीन करण्याच्या ओढीनेंच स्वतःला 'शून्यवत्' करण्याचें त्यांचें तत्त्वज्ञान जन्माला आलें.

गांधीजींच्या 'मंगलप्रभात' या पुस्तकाचें मराठी भाषांतर करतांना त्यांनीं सुरुवातीला कांहीं काव्यपंक्ति लिहिल्या. त्यांतील शेवटल्या दोन ओळी त्यांची ही भावना उत्तमप्रकारें व्यक्त करतात :

२

**अद्वितीयच एकत्व गुरूचें गौरवूनि जें ।**
**विन्या शून्य विना भूत फावला गणितापरी ॥**

वरील ओळींत विनोबांनीं स्वतःला शून्याची उपमा देऊन गुरूला एकाची उपमा दिली आहे, ती अर्थपूर्ण आहे. गुरूला महत्त्व देऊन स्वतःकडे लघुत्व घेतांनाहि ते स्वतःला निरर्थक मानीत नाहींत. कारण त्यांच्यासारख्या ‘ शून्या ’मुळेंच गुरूची किंमत अनेक पटींनीं वाढत असते. आज सगळ्या जगभर त्यांचें नांव गाजत आहे; परदेशी नियतकालिकांतून त्यांच्यावर स्तुति-सुमनांचा वर्षाव होत आहे; सर्व पक्षांतील सर्वप्रकारचे लोक त्यांना ‘ साधु साधु ’ म्हणत आहेत; अशा वेळीं देखील ते अत्यंत निरहंकारी वृत्तीनें हजारों लोकांच्या मेळाव्यांतहि वावरत आहेत. एका प्रार्थनेनंतरच्या प्रवचनांत ते म्हणाले, “ आज बापू असते तर मी तुम्हांला हें सारें सांगायला बाहेर कधींच आलों नसतों. त्यांनीं मजवर जें काम सोंपविलें होतें तेंच करण्यांत मला अतीव आनंद मिळत असे····परन्तु ते गेले आणि मला एकान्त आश्रम सोडून बाहेर पडावें लागलें—त्यांच्याचकरितां ! मी नेता नाहीं. तुम्हां सर्वांचा सेवक आहें. माझ्यासमोर कोणीहि येवो, मला त्याच्या हृदयांतील परमेश्वरच दिसतो आणि भक्तीनें माझे हात जुळले जातात. माझ्या ह्या दोन हातांना जुळण्याचीच संवय झाली आहे.”

त्यांनीं आतां बडोद्याला कायमचा रामराम ठोकला होता. तरीसुद्धां बडोद्यास असतांना त्यांनीं मराठी संत-वाङ्मयाचें मनन, परिशीलन आणि पाठांतर केलें होतें, त्याचा त्यांना पुढच्या आयुष्यांत फारच उपयोग झाला. त्या वाङ्मयाच्या परिशीलनानें

त्यांनीं जणूं काय एक वेगळें आध्यात्मिक विश्वच स्वतःकरितां निर्माण केलें होतें. संतवाङ्मयाचा हा अभ्यास आणि "मराठींत गीता नाहीं का" या आईच्या प्रश्नाची टोंचणी यामुळेंच पुढें त्यांच्या हातून '**गीताई**' लिहून झाली असली पाहिजे.

सुरत सोडतांना त्यांनीं आपल्या वडिलांच्या नांवें लिहिलेलें एक पत्र आपल्या मित्रांजवळ देऊन ठेवलें होतें. मुंबईहून परीक्षा संपवून परत निघतांना तें पत्र पोस्टांत टाकावयाचें होतें. हेतु हा कीं, वडिलांना आधींच कळलें तर ते तांतडीनें आपला तपास करतील. काशीला पोंचून स्थिरस्थावर झाल्यावर मग आपण घर सोडल्याचें वडिलांना कळावें, म्हणूनच ही युक्ति त्यांनीं योजिली होती. कदाचित् हा एकच खोटेपणाचा प्रसंग त्यांच्या आयुष्यांत घडला असेल. त्या पत्रांतहि आपण सन्मार्गापासून विचलित होणार नाहीं, असें आश्वासन त्यांनीं वडिलांना दिलें होतें.

घर सोडण्याचें कारण ब्रह्मजिज्ञासा होय असें विनोबांनीं मित्रांस सांगितलें खरें; पण ब्रह्मज्ञान म्हणजे कांहीं तेंकुराच्या गोष्टी नव्हेत. अर्थात् ब्रह्मपदीं नाचण्याकरितां लोखंडाचे चणे खायचीसुद्धां त्यांची तयारी होती. बनारसला पोंचल्यावर जुन्या ज्ञान-भांडाराचें प्रवेशद्वार जी संस्कृतभाषा तिचें अध्ययन अन्न-छत्रांत जेवूनहि त्यांनीं केलें; पण त्यापेक्षांदेखील त्यांनीं तत्त्व-चिंतनावरच अधिक भर दिला. आत्मा हा परमात्म्याचाच अंश आहे आणि आत्मतत्त्व अखेरीस परमतत्त्वांत विलीन होणें म्हणजेच मुक्ति हें तत्त्वज्ञान पुस्तकें वाचूनहि कळतें; पण तें उमजणें किंवा अनुभवास येणें ही वेगळीच प्रक्रिया आहे. पाण्यांत स्थिर पडून राहिलें म्हणजे मनुष्य बुडत नाहीं असें पट्टीचे पोहणारे सांगतात आणि तें डोळ्यांनीं पाहतांहि येतें.

पण तें घडणें किती दुरापास्त आहे, हें पाण्यांत उतरल्यानंतरच कळूं शकेल. मागें एकदां डॉ. राधाकृष्णन् यांनीं एका व्याख्यानांत दोन संस्कृत वचनें उद्धृत केलीं होतीं. तीं आठवत नाहींत पण त्यांचा अर्थ मात्र आठवतो आणि तो येथें सांगण्यासारखा आहे:

" परमेश्वरप्राप्तीच्या मार्गावरील खाणाखुणा दाखवा, नाहींतर तो मार्गच खोटा " असें कोणी म्हणाला तर त्याला सांगावें लागेल कीं, " पाण्यांतून लीलेनें संचार करणारे मासे आणि हवेंतून विहार करणारे पक्षी यांच्या खुणा मागें रहात नाहींत; म्हणून त्यांचा संचार आणि विहार खोटा असें कोणीच म्हणूं शकणार नाहीं. तीच स्थिति आत्मानुभवाची होय." सत्पुरुषांचीं वचनें आणि डोळ्यांना दिसणारें त्यांचें जीवन यावरून ब्रह्मजिज्ञासा तृप्त होऊं शकते एवढें समजतें; पण तें ज्याचें त्यानें स्वतःच्या कष्टानें उमगून घ्यावें लागतें. त्या केवळ सांगावांगीच्या गोष्टी नव्हेत. विनोबांची मनःस्थिति या वेळीं कांहींशीं अशीच झाली असली पाहिजे. पूर्वजन्मींच्या पुण्याईमुळें ब्रह्मप्राप्तीचा त्यांना ध्यास लागला होता. आत्मज्ञान होऊं शकतें याबद्दल त्यांची निश्चिति होती. म्हणूनच आत्मज्ञानाच्या मार्गावरील यात्री बनून भारताच्या या परमपवित्र क्षेत्रांत राहून ते तत्त्वचिंतन करीत होते.

विनोबांच्या बाबतींत आणखी एक गोष्ट लक्षांत घेतली पाहिजे. स्वतःपुरतें आत्मज्ञान मिळवून तृप्त व्हावें अशी त्यांची इच्छा नव्हती. जीवनाचा अर्थ स्वतःला तर कळावाच पण तो कळत असतां किंवा कळल्यानंतरहि ईश्वरानें दिलेला हा नरदेह ईश्वरानेंच निर्मिलेल्या इतर मानवांच्या अंतरांतील देवपण जागें करण्याकरितांच खर्ची घालावा; अशी त्यांना अंतरीची ओढ होती. गीतेच्या

(१७४)

मननानें निष्काम कर्मयोग कसा आचरतां येईल, याचाहि विचार त्यांच्या मनांत घोळत असावा असें म्हणावयासहि हरकत नाहीं आणि त्यांची तळमळ योग्य त्या तपमानापर्यंत गेली आहे, असें परमेश्वराला वाटतांच त्यानें त्यांना त्यांचा आदर्श पुरुष दाखविला. कारण, विनोबांना केवळ शाब्दिक ज्ञान सांगणारा गुरु नको होता. त्यांचें वाचन भरपूर झालें होतें, मनन सतत चालू होतें. जरूर होती ती प्रत्यक्ष निष्काम कर्मयोग आचरणाऱ्या आदर्शाची. त्यांच्या सुदैवानें त्या वेळीं भारताच्या राष्ट्रीय क्षितिजावर एक नवा तारा नुकताच उदयाला येत होता. लोकमान्य टिळकांच्या तेजानें तें आकाश व्याप्त झालें असलें तरी हा तारा देदीप्यमान आहे ह्याची जाणीव सामान्य जनतेला नसली तरी गोखले, मालवीय, टिळक या पुढाऱ्यांना होऊं लागली होती. गोखल्यांना तर गांधीजी गुरूच मानीत. त्यांच्याच आज्ञेवरून भारताच्या सामाजिक आणि राजकीय परिस्थितीचें सम्यक् ज्ञान होण्याकरितां ते भारतांत संचार करीत होते. त्याच सुमारास बनारस विद्यापीठाच्या पदवीदान-समारंभांत दीक्षान्त भाषण बेझंटबाई करणार होत्या. मालवीयांनीं गांधींनापण आमंत्रण दिलें होतें. गांधीजींनीं तिथें व्याख्यान दिलें आणि तेंहि हिंदींतून. तेथें हजर असणाऱ्या राजेमहाराजांची त्यांच्या पोषाखीपणाबद्दल त्यांनीं सडकून हजेरी घेतली आणि आपलीं रत्नभांडारें विकून टाकून तो पैसा देशसेवेच्या कारणीं लावण्याचा त्यांना उपदेश केला.

गांधीजींच्या त्या भाषणाला ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झालें आहे. त्या भाषणाचा रिपोर्ट विनोबांनीं वर्तमानपत्रांतून जेव्हां वाचला, तेव्हां त्यांना गांधींबद्दल विलक्षण ओढ वाटूं लागली. त्यांना जी सर्वस्वत्यागाची तळमळ लागली होती, तिला प्रतिसाद

मिळाली होती. बनारसला असतांनाच त्यांनीं दहशतवादी क्रांतिकारकांशीं संबंध जोडण्याचा प्रयत्न केला होता. पण त्या मार्गाची माहिती झाल्यावर तो मार्ग आपल्या स्वभावाला जुळण्याजोगा नाहीं, असें त्यांनीं विचारांतीं ठरवून टाकलें होतें. तेव्हां अन्यत्र मन कोठेंहि गुंतलेलें नाहीं, कांहींतरी करायला पाहिजे अशी भावना प्रबळतम झाली आहे, अशा वेळीं त्यांच्या पिंडप्रकृतीला मानवणारा मार्गदर्शक मिळतो असा विश्वास वाटल्याबरोबर त्यांनीं गांधींजींकडे धांव घेतली असल्यास नवल नाहीं. त्यांनीं गांधीजींना धर्म व राजकारण यांसंबंधीं आपल्या मनांतील शंका व्यक्त करणारें एक पत्र लिहिलें. त्याचें तावडतोब उत्तर आलें. तें उत्तर वाचून विनोबांनीं पुन्हां एक पत्र लिहिलें त्याचेंहि उत्तर आलें. पण त्यांनीं जेव्हां त्या पत्रांतील कांहीं मुद्यांचा खुलासा विचारणारें तिसरें पत्र लिहिलें, तेव्हां गांधीजींनीं कळविलें कीं, "पत्रानें सर्व गोष्टींचा पूर्ण खुलासा होऊं शकत नाहीं, तेव्हां तुम्ही समक्षच या." तावडतोब विनोबा कोचरब येथील आश्रमांत येऊन दाखल झाले. अवघ्या तीन महिन्यांत त्यांनीं काशीक्षेत्राचा निरोप घेतला होता.

◆ ◆ ◆

त्यांचीं बालपणाचीं पहिलीं दहा वर्षें आजोबांजवळ राहून डोंगरावर व माळावर हिंडून, पाहून व ऐकून मिळेल तें अप्रत्यक्ष ज्ञान संपादन करण्यांत गेलीं. पुढलीं दहा वर्षें वडिलांजवळ राहून प्रत्यक्ष शिक्षणांत खर्च झालीं. त्याच अवधींत भरपूर वाचन व आईच्या सहवासांत तिच्याकडून मिळणारें वात्सल्य व बोध यांची शिदोरी त्यांनीं बांधून घेतली आणि मग ते बाहेर पडले. गांधींच्या आश्रमांत आल्यानंतर त्यांच्या आयुष्यांतील तिसऱ्या अध्या-

१७१५११ १५२०

यास सुरुवात झाली. उत्तम प्रकारचें लोखंड परिसाच्या सान्निध्यांत आलें होतें. आतां थोड्याच अवधींत त्याचें सोनें होणार होतें. अर्थात् ही उपमा अंशतःच खरी आहे. लोखंड आणि सोनें या दोन्ही वस्तु निर्जीव असतात. या ठिकाणीं मात्र दोन स्वतंत्रपणें वाढलेल्या आणि घडलेल्या व्यक्ती एकत्र आल्या होत्या आणि त्यांच्या परस्पर साहचर्यानें कुठलेंहि वैमनस्य अगर विद्वेष निर्माण न होतां जगाला वेगळा मार्ग दाखवणारे आणि परस्परांना भूषण-भूत ठरणारे दोन महापुरुष निर्माण होणार होते.

७ जून १९१६ या दिवशीं त्यांची महात्माजींशीं पहिली भेट झाली. उभयतांच्या आयुष्यांतील तो अत्यंत महत्त्वाचा क्षण होता आणि आजहि आपण त्या प्रसंगाला फार मोठें ऐतिहासिक महत्त्व होतें असें म्हटलें पाहिजे. कारण त्या भेटींतच गांधीजींना त्यांच्या विधायक कार्याचा झेंडा फडकत ठेवणारा पुत्र लाभला. लौकरच विनोबांनीं गांधींना आपला पिता म्हटलें. गांधींनींहि तें पद स्वीकारलें आणि आज त्यांचा पुत्र कुलदीपक निघाला असेंच कोणालाहि म्हणावें लागेल. हें सर्व पुढें घडलें असलें तरी त्या पहिल्या भेटींतच दोघांनींहि एकमेकांना आपादमस्तक न्याहाळलें, अंतरीच्या खुणा पटवून घेतल्या आणि स्थलकालातीत असा एक बंध त्या उभयतांत त्या क्षणीं निर्माण झाला.

आश्रमांत पाऊल ठेवल्यापासून शक्यतों मौन पाळावयाचें, व्रतस्थ रहावयाचें आणि दैनंदिन कर्तव्यें निष्ठेनें पार पाडून शांत मनानें मनन-चिंतनांत काळ घालवावयाचा, असें त्यांनीं ठरविलें होतें पण त्यांचा तो हेतु सफल झाला नाहीं. सायंप्रार्थनेनंतर कांहीं चर्चा होई अगर प्रश्नोत्तरें होत. अशा वेळीं केवळ गप्प बसणें त्यांच्यासारख्या बुद्धिमान् माणसाला शक्य नव्हतें. ते प्रश्न

थोडेच विचारीत पण ते अर्थपूर्ण असत. प्रश्न विचारण्यांत अहंकाराचा भाग नसून तीव्र जिज्ञासा असे. या चर्चेच्या वेळींच त्यांच्या अंतरंगाचा आणि बुद्धिमत्तेचा परिचय इतर आश्रमवासीयांना झाला. विनोबांच्या ठिकाणीं अहंकाराचा किंवा महत्त्वाकांक्षेचा संपूर्ण अभाव असल्यानें आश्रमवासीयांना त्यांच्याबद्दल आत्मीयता वाटूं लागली असल्यास नवल नाहीं. त्यांच्यावर शिकवण्याचेंहि कांहीं काम सोंपविण्यांत आलें आणि तें त्यांनींहि आनंदानें पत्करलें. पण त्यांच्या बुद्धिमत्तेपेक्षांहि त्यांच्या विरागी व्यक्तिमत्त्वानेंच महात्माजींना अधिक भुरळ घातली. विनोबांबद्दल अत्यंत थोड्या काळांतच गांधीजींना किती आदर वाटूं लागला होता, याची साक्ष त्यांनीं विनोबांच्या वडिलांना जें छोटें पत्र लिहिलें त्यावरूनच पटेल. विनोबांनीं स्वतःच्या हालचालींविषयीं आपल्या मातापित्यांना कांहींच कळविलेलें नाहीं; हें लक्षांत येतांच महात्माजींनीं त्यांना लिहिलें, " तुमचा विनोबा माझ्यापाशीं आहे. तुमच्या मुलानें एवढ्या कोंवळ्या वयांत जी समाधानी आणि आनंदी वृत्ति मिळविली आणि जें वैराग्य संपादन केलें आहे, तितकें मिळवायला मला अनेक वर्षें कष्ट करावे लागले आहेत. " यापेक्षां आपल्या मुलाबद्दल त्यांच्या आईवडिलांना कोणत्या वेगळ्या धन्यवादाची अपेक्षा असणार !

पण एकंदर आश्रमाची राहणी विनोबांच्या प्रकृतीला मानवेनाशी झाली. त्यांची प्रकृति नादुरुस्त झाली. शिवाय त्यांना संस्कृतचाहि सखोल अभ्यास करावयाचा होता. तेव्हां त्यांनीं गांधीजींच्या संमतीनें एक वर्ष आश्रम सोडला आणि ते वांई येथें प्राज्ञपाठशाळेंत येऊन दाखल झाले. प्राज्ञपाठशाळा त्या वेळीं फारच प्रसिद्ध होती. त्या पाठशाळेचे त्या वेळचे चालक

श्री. नारायणशास्त्री मराठे हे संस्कृतचे केवळ पंडित म्हणूनच नव्हे तर पुरोगामी वृत्तीचे पण संस्कृतीचे अभिमानी असे थोर गृहस्थ म्हणून आसपास माहीत होते. कालांतरानें ते केवलानंदसरस्वती या नांवानें विख्यात झाले. ते नुकतेच गेल्या वर्षी समाधिस्थ झाले. नारायणशास्त्र्यांजवळ विनोबांनीं शंकराचार्यांच्या ब्रह्मसूत्र-भाष्याचें अध्ययन केलें. त्याचप्रमाणें त्यांनीं गीता, उपनिषदें, पातंजलयोगदर्शन, वैशेषिक सूत्र, याज्ञवल्क्यस्मृति यांचाहि अभ्यास केला. दहा-बारा मैल फिरणें आणि तीनशें सूर्यनमस्कार हा त्यांचा नित्याचा व्यायाम होता आणि आहार म्हणाल तर मीठ-मसाला वर्ज करून पाऊण शेर दूध, दोन ज्वारीच्या भाकऱ्या, चारपांच केळीं आणि लिंबें येवढाच होता; पण त्यामुळें त्यांची प्रकृति मात्र सुधारली. तेथें त्यांनीं विद्या-दानहि केलें. गीतेचा वर्ग चालविला. ज्ञानेश्वरी व उपनिषदें विद्यार्थ्यांना शिकविलीं. ऐतिहासिक स्थळांच्या पायीं सफरी केल्या, एक वाचनालय विद्यार्थ्यांना उघडून दिलें आणि तें स्वावलंबी करण्यासाठीं दळणाचाहि एक वर्ग सुरू केला. कोठलेंहि काम श्रद्धेनें करण्याची संवय असल्यानें या बाबतींत लोकांनीं वेडगळ म्हटलें तरी त्यांनीं तें मनावर घेतलें नाहीं.

अशा रीतीनें वर्षांतील सहा महिने अध्ययन-अध्यापनांत आणि बाकीचे सहा महिने हिंडण्या-फिरण्यांत, गीतेवर प्रवचनें देण्यांत आणि सत्याग्रहाश्रमाच्या तत्त्वांचा प्रचार करण्यांत त्यांनीं खर्च केले. बडोद्याला जाऊन त्यांनीं त्यांच्या जुन्या विद्यार्थी-मंडळाच्या उत्सवांत भाग घेतला. तेथेंहि गीतेवर प्रवचनें केलीं. त्यांचीं तीं प्रवचनें इतकीं सुंदर झालीं कीं, " घर

सोडलें पण त्याचें चीज केलें" असें सर्वांकडून धन्यवादहि त्यांनीं मिळविले.

बरोबर एक वर्षानें ठरलेल्या दिवशीं ते आश्रमांत परत आले. ते अमुक वेळीं येणार आहेत हें गांधींच्याहि लक्षांत नव्हतें. अगदीं नेमक्या वेळीं परत आल्याबद्दल गांधीजींनीं त्यांचें अभिनंदन केलें. तेव्हां विनोबा म्हणाले, "हा माझा गुण नाहीं, माझ्या गणितावरील प्रेमाचा हा गुण आहे. एक वर्ष म्हणतांच मी बरोबर वर्षानें परत आलों." तेव्हां गांधी म्हणाले, "गणित झालें तरी तें सत्याचे विरोधी कसें असेल?" ह्या एक वर्षांत त्यांची प्रकृति सुधारली आणि संस्कृतचा अभ्यासहि त्यांच्या मनाजोगा झाला. या एका वर्षांत त्यांनीं जी कमाई केली, तिचा वृत्तान्त त्यांनीं स्वतःच जें गांधीजींना पत्र लिहिलें, त्यांतच लिहिलेलें आहे. कै. महादेवभाई देसाई यांनीं हें पत्र जपून ठेवलें आणि आपल्या डायरींत तें उद्धृतहि केलें आहे.

त्यांनीं केलेल्या कामांची वर दिलेली माहिती आणि प्रकृती-करितां त्यांनीं अनुसरलेला मार्ग त्यांच्या पत्रावरूनच दिलेला आहे. आश्रमाबाहेर राहूनहि त्यांनीं आस्वाद, अपरिग्रह, स्वदेशी, सत्य, अहिंसा, ब्रह्मचर्य इत्यादि व्रतांचें कांटेकोरपणें पालन व तेंहि अत्यंत श्रद्धापूर्वक केलें. त्यांच्या साध्या आहाराचा वर उल्लेख केलेलाच आहे. संसार म्हणाल तर, लाकडाची थाळी, कटोरी, लोटा, धोतर व घोंगडी येवढाच. लोभ कसला केला असेल तर फक्त पुस्तकांचाच—त्यांना स्वप्नें पडत तीं एकच. "देव माझ्या-कडून कांहीं सेवा घेईल का?" पत्राच्या अखेरीस त्यांनीं महात्मा-जींना आपल्या पित्याचें पद अर्पण केलें आहे आणि त्यांच्या हातच्या पत्राचा आग्रह धरला आहे. पत्र वाचून गांधीजी म्हणाले, "गोरखनें

मच्छिंद्रनाथाला हारवलें खरें! हा भीम आहे भीम!!" विनोबांना स्वहस्तें लिहिलेल्या उत्तरांत गांधीजी म्हणतात, "तुझ्यासाठीं कोणतें विशेषण वापरावें तेंच मला सुचत नाहीं. तुझें प्रेम आणि तुझें चारित्र्य मला मोहांत बुडवून टाकतें. तुझी परीक्षा करायला मी असमर्थ आहें. तूं जी स्वतःची पारख केली आहेस, ती मी मान्य करतों. तूं मला पितृपद अर्पण केलें आहेस, तें मी पत्करतों. तुझ्याबद्दलच्या माझ्या अपेक्षा तूं बहुतांश पूर्ण केल्या आहेस. सत्यप्रिय पित्यानें आपल्यापेक्षां अधिक सत्यप्रिय पुत्र निर्माण केला पाहिजे. खरा पुत्र वडिलांच्या लौकिकांत भर घालतो. बाप जर सत्यवादी, कणखर पण दयार्द्र वृत्तीचा असेल, तर हे सद्गुण मुलामध्यें वाढत्या प्रमाणांत उतरायला पाहिजेत. तुझ्या बाबतींत हें सर्व तूं माझ्या सहाय्याशिवाय साध्य करून दाखविलें आहेस. तेव्हां तूं मला दिलेलें पितृपद केवळ तुझी प्रेमाची खूण म्हणूनच मी पत्करतों. या पदाला पात्र ठरण्याचा मी नेहमींच प्रयत्न करीन. पण जर मी चुकून हिरण्यकश्यपु ठरलों तर मात्र तूं भक्त प्रह्लाद बनायला चुकूं नकोस." "शिष्यादिच्छेत् पराजयम्" असें म्हणतात. पण या ठिकाणीं तर स्वतः पिताच मुलाला योग्य ठरण्याचा प्रयत्न करीन असें आश्वासन देत आहे. पिता-पुत्राची किंवा गुरु-शिष्याची असली जोडी जगांत नेहमींच वंदनीय ठरते.

याच पत्रांत पुढें गांधीजी लिहितात, "आश्रमधर्माचें पालन तूं यथायोग्य केलें आहेस. तूं आश्रमांत परत येशील याबद्दल माझी निश्चिति होती. ईश्वर तुला दीर्घायु करो आणि तुझ्या हातून आपल्या मायभूमीची सेवा तो करून घेवो हीच माझी प्रार्थना—बापूचे आशीर्वाद." गांधीजींची ही प्रार्थना ईश्वरानें मान्य केली आहे, हें आज आपण पाहातच आहोंत. गांधीजींच्या हयातींत

जवळजवळ एकान्तवासांत रहाणारे विनोबा आज त्यांच्याच कार्याचा झेंडा घेऊन भारत-भ्रमण करीत आहेत आणि शब्दाआधीं प्रकाश पोंचतो त्याप्रमाणें ते जगाच्या ज्या भागांत अजून गेलेहि नाहींत, त्या अमेरिकेसारख्या दूरच्या प्रदेशांतहि त्यांचें नांव आणि कार्य जाऊन पोंचलें आहे.

१९१८ सालीं विनोबांच्या आयुष्यांतली एक अत्यंत महत्त्वाची घटना घडली. बडोद्याला इन्फ्लुएन्झाची भयंकर साथ पसरली. लोक भराभरा मृत्युमुखीं पडूं लागले. विनोबांच्या विद्यार्थिमंडळानें स्वयंसेवकांचें पथक उभारलें आणि मदतीचा खटाटोप सुरू केला. अशा भयंकर प्रसंगीं मानवी प्रयत्न तोकडे पडतात. पण म्हणूनच कार्यनिष्ठेची कसोटी लागते. हे स्वयंसेवक रोज घरोघर जाऊन चौकशी करीत. शक्य तेवढी लोकांना मदत ते करीत असत. परिस्थिति अशी होती कीं, मृत्युमुखीं पडलेल्या लोकांना उचलून न्यायला पुरेशीं माणसेंसुद्धां मिळत नसत. स्मशानांत प्रेतें जाळायला जागा मिळत नसे. अशा परिस्थितींत ते लोक विनोबांच्या घरीं जातात तों घरांत त्यांचे वडील, आई आणि भाऊ दत्तू असे तिघे तापानें पछाडलेले. त्यांच्या एका मित्रानें आश्रमांत पत्रानें तें कळविलें. गांधीजींना तें कळतांच त्यांनीं विनोबांना बोलावून घरीं जाऊन आईवडिलांची सेवा करणें जरूर आहे असें सांगून बडोद्यास पाठविलें. "आपण आश्रमवासी तेव्हां आपल्याला हे पाश हवेत कशाला?" असे कांहींसे तात्त्विक विचार विनोबांच्या डोक्यांत घोळत असावेत; कारण गांधींना त्यांची थोडी समजूत काढावी लागली. "आश्रमांत सध्यां तुमच्यावर खास जबाबदारी अशी नाहीं आणि आपल्याला अमुक एका माणसाविषयीं विशेष प्रीति न बाळगणें हें आश्रम-

वासी म्हणून योग्य असलें तरी सहजप्राप्तांची सेवा करणें हेंहि एक आपलें कर्तव्यच आहे." असें त्यांना गांधीजींनीं सांगितलें. लगेच विनोबा बडोद्याला गेले. तेथें प्रसंग भयंकर होता. प्रथम त्यांचा धाकटा भाऊ दत्ता गेला. पाठोपाठ आईलाहि तीन दिवसांनीं काळानें ओढून नेलें. वडील मात्र हळूहळू बरे झाले. आईचा अंत्यविधि जुन्या पद्धतीनें करावा हें विनोबांना मान्य नव्हतें. पण वडिलांच्या मनाला जुने संस्कार केल्याखेरीज बरें वाटणार नव्हतें. शेवटीं वडिलांच्या म्हणण्याला मान देऊन जुन्या पद्धतीनें शवास मंत्राग्नि देण्यांत आला. विनोबांनीं मात्र त्या अंत्यविधींत भाग घेतला नाहीं. आईवर त्यांचें आत्यंतिक प्रेम होतें. शवाचें अखेरचें दर्शन घेतांना त्यांचे नेत्र आंसवांनीं भरून आले. तिला अखेरचें वंदन करून ते बाजूला झाले आणि तो सारा दिवस त्यांनीं तिला अत्यंत प्रिय असणारी गीता आणि उपनिषदें यांचें पठन करण्यांत घालविला.

◆ ◆ ◆

विनोबांच्या आयुष्यांत एक पूज्यत्रयी आहे. पहिली आई, दुसरी गीताई—गीतेचें विनोबांनीं केलेलें मराठी नामकरण—आणि तिसरे बापू म्हणजे महात्माजी. त्यांच्या आईला गीता समजावी असें फार वाटे पण तिला संस्कृत येत नसल्यानें स्वतः गीता वाचणें शक्य नव्हतें. म्हणून आपण तिला गीता समजावून सांगावी असें त्यांना वाटे. त्यांना वाटे, आपल्याला गीता समजावी म्हणून आपल्या आईसारख्या आज कितीतरी मायबहिणी देशांत तळमळत असतील. त्यांच्याकरितां गीता मराठींत सांगितली पाहिजे. त्यांना स्वतःला गीतेचा मोठा आधार वाटे. आईला गीता समजून देतां यावी म्हणून त्यांनीं स्वतंत्रपणें संस्कृतचा व गीतेचा

अभ्यास केला होता. गीतारहस्य वाचायची उत्सुकता होती पण ग्रंथ विकत घेण्याची ऐपत नव्हती; म्हणून दुसरीकडे जाऊन लागोपाठ तीन रात्रीं बसून त्यांनीं गीतारहस्य वाचून काढलें होतें.

१९२१ सालीं वर्षप्रतिपदेच्या दिवशीं विनोबांनीं जमनालाल बजाज यांच्या वर्ध्याच्या आश्रमांत प्रवेश केला. तरुण मंडळी विनोबांच्या भोंवतीं जमूं लागली. दळण, कांडण, पिंजण, इतर घरकाम, शेती हे सर्व करून बौद्धिक शिक्षण, असा कार्यक्रम आश्रमांत सुरू झाला. विद्यार्थ्यांना स्वावलंबन शिकवून शिक्षण देणाऱ्या गुरुकुलाचें स्वरूप आश्रमास आलें. आश्रमांत प्रार्थनाहि होत पण त्या संस्कृतमध्यें. प्रार्थना जर चित्तशुद्धीसाठीं असेल तर ती मातृभाषेंतून असली पाहिजे असें विनोबांना वाटे. पूर्वी ज्ञानेश्वर-एकनाथादि संतांनीं संस्कृत भाषेंतील ज्ञानगंगा मराठी भाषेच्या कावडींनीं घरोघर पोंचविली. मोरोपंतासारख्या आणि वामनपंडितासारख्या पंडित कवींनीं भगवद्‌कथा मराठी काव्यांत आणल्या. मंत्ररामायणांत कविवर्य मोरोपंत म्हणतात :

**रामाचें रचिलें चरित्र मुनिनें वाल्मीकिनें संस्कृतीं ।**
**नाहीं हानि कदापि अन्य कविही तें वर्णितीं प्राकृतीं ।।**
**मुक्तांचा रचिलाचि हार वहिला जो रेशिमाच्या गुणें ।**
**तो कापासगुणें करून करितां काय प्रभेला उणें ।।**

त्याच्या पावलावर पाऊल ठेवून आपणहि गीता आणि इतर प्रार्थना यांचें मराठीकरण करावें असा त्यांनीं विचार केला. १९३० सालीं चार महिन्यांत त्यांनीं गीतेचा 'गीताई' या नांवानें मराठी अनुवाद केला. अनेक लहानमोठया मुलांना ती त्यांनीं शिकवून बघितली, अनेकांच्या सूचना मागविल्या आणि या

सर्वांचा उपयोग करून ती त्यांनीं जास्तींत जास्त सोपी केली. लहानपणीं आईनें लालनपालन केलें, गीतेवर प्रेम करायला शिकविलें आणि गीता थोडीथोडी समजूं लागल्यावर आई गेली! तेव्हां, "मला गीतेच्या ओटींत घालून ती गेली" असें विनोबा म्हणतात.

**गीताई माउली माझी तिचा मी बाळ नेणता।**
**पडतां रडतां घेई उचलोनि कडेवरी॥**

अशी त्यांची गीतेबद्दल भावना आहे. रोजच्या जीवनांत आपण अनेक चुका करतों. कांहीं नकळत करतों, कांहीं कळून-सवरून करतों. त्याचे परिणाम अर्थात् भोगावे लागतातच. जीवनकलहार्थ जी धडपड आपण करतों, त्यांत अनेक प्रसंगीं आपणांस अपयश भोगावें लागतें आणि मनावर उदासीनतेची काजळी चढते. अशा प्रसंगीं मनुष्य कुणाचा तरी अगर कशाचा तरी आधार हुडकीत असतो. लहानपणीं आई हा एक मोठा आधार वाटत असतो. कुठल्याहि चुकीची क्षमा करून, अनेक बरेवाईट दोष डोळ्यांआड करून, निरपेक्ष बुद्धीनें मुलांवर प्रेम करणारा जीव म्हणजे आईच. आईइतका निकटचा संबंधहि लहानपणीं कोणाशींच येत नाहीं. तीच जन्म देते, तीच वाढवते आणि मोठेपणींहि मायेचा हात अंगावरून तीच फिरवते. विनोबांची आई तर याहूनहि आगळी होती. तिनें मुलावर माया तर केलीच पण त्याबरोबर त्याला संस्कृतीहि दिली. गीतेबद्दलचें प्रेम तिनेंच दिलें. पुढील आयुष्यांत मनुष्य जेव्हां एखादा वेगळा आधार शोधूं लागतो, तेव्हां एखादें तत्त्वज्ञान आपलेंसें करावें किंवा स्वतंत्र निर्माण करावें अशी त्याला ओढ लागते. विनोबांचें

मन गीतेच्या तत्त्वज्ञानांतच रममाण झालें. आईचा आधार सुटतांच त्यांनीं गीतेचा आधार घेतला आणि गीता तत्त्वज्ञानाचें चिंतन व मनन करीत असतां गीतेंतील तत्त्वज्ञानाचा आदर्श म्हणून त्यांनीं गांधीजींना पत्करलें.

त्यांनीं गांधीजींना पत्करलें याचा अर्थ ते गांधीजींचे भगत बनले असा नव्हे. त्यांनीं आपली स्वतंत्र बुद्धि कधींच गहाण टाकली नाहीं. इतकेंच काय पण असें सांगतात कीं, आश्रमांत असतांनाहि ते गांधीजींच्या जवळ आपणहून जाऊन कधींच बसले नाहींत. गांधीजींना जेव्हां त्यांचेशीं बोलावेंसें वाटे, तेव्हां गांधीजी त्यांना आपणहून बोलावून घेत. त्यांच्या स्वतंत्र प्रज्ञेची गांधीजींना देखील जाणीव होती. उलट, त्यांनीं गांधीजींना जें पितृपद दिलें तें त्यांची नीट पारख करूनच. एकदां विनोबांच्या व्याख्यानापूर्वी त्यांचा परिचय करून देतांना, 'विद्वत्तेंत ते महात्माजींपेक्षांहि श्रेष्ठ आहेत' असें अध्यक्षांनीं सांगितलें. नंतर विनोबांनीं स्वतःच आपल्या विद्वत्तेचें वर्णन सुरू करून श्रोत्यांना थोडें आश्चर्यांत टाकलें. ते म्हणाले, "मी अनेक भाषा जाणतों. भाषाशास्त्रहि मला अवगत आहे. संस्कृतचा तर मी पंडितच आहें. मी गांधींनाहि गीता शिकवूं शकतों. हें सर्व खरें, पण गीतेंत सांगितलेला अनासक्त कर्मयोगाचा आदर्श मला महात्माजींच्या रूपांतच आढळला; म्हणूनच ते माझ्यापेक्षां श्रेष्ठ आहेत." विनोबांच्या शब्दांत इतका अहंकार कसा असें श्रोत्यांच्या मनांत कांहीं क्षण आलें असेल-नसेल तोंच त्यांनीं शेवटच्या विधानानें त्यांना आनंदाश्चर्याचा धक्काच दिला, असें म्हणावयास हरकत नाहीं. या पूज्यत्रयीची आठवण झाली कीं, ते अजूनहि सद्गदित होतात, बुद्धिवादी असूनहि भावनेलाहि त्यांच्या जीवनांत फार

मोठें स्थान आहे, आणि म्हणूनच ते अज्ञ आणि दलित जनतेची सेवा मनोभावें करूं शकतात.

अनासक्त कर्मयोगाबद्दल गांधीजींचा आदर्श त्यांनीं केवळ वाच्यार्थानें डोळ्यांसमोर ठेवला नाहीं, तर स्वतः तो कर्मयोग आचरणांत आणण्याचा त्यांनीं कसोशीनें प्रयत्न केला. गांधीजींच्या सहवासांत येईपर्यंत त्यांनीं वाचनानें आणि मनानें पुढील कष्टशील जीवनाची पूर्वतयारी केली असें म्हणावयास हरकत नाहीं. वडील मंडळींकडून झालेल्या संस्कारांमुळें ही पूर्वतयारी करणें त्यांना सोपें गेलें. नंतरच्या आश्रमीय आयुष्यांत आश्रमांतील कर्तव्यकर्म करीत असतांनाहि त्यांनीं आपलें अष्टपैलू व्यक्तित्व कसें घडविलें आणि नंतर गांधीजींच्या पश्चात् या व्यक्तित्वांतील तेजाचा आविष्कार कसा झाला हे दोन्ही टप्पे आपण पाहणारच आहोंत. पण तत्पूर्वीं गीताईच्या अनुषंगानेंच गीतेंतील तत्त्वज्ञानाचा—विशेषतः कर्मयोगाचा—अर्थ ते काय सांगतात तेवढा आपण पाहूं :

“ अलीकडे आपण कर्मयोग शब्द फार ढिल्या अर्थानें वापरतों. परंतु सबंध जीवन जगाच्या सेवेसाठीं घालविणें, त्यांत अहिंसा-सत्यादिकांचें कसोशीनें परिपालन करणें, अहंकार आणि आसक्ति यांचा थोडाहि चिकटा लागूं न देणें, निरंतर चित्त शोधीत जाणें, जीवनांतील दरएक कृति ईश्वराशीं जोडून देणें, या सर्व खुणा एकत्रटल्याशिवाय गीतानुसारी कर्मयोग होऊं शकत नाहीं. ”

आणखी एका गीताप्रवचनांत ते म्हणतात, “ गीताधर्माचा प्रचार नुसत्या श्रवणानें किंवा प्रवचनानें होणें नाहीं. गीता हें बोलाचें

शास्त्र नाहीं. आचरणाचें शास्त्र आहे. ज्या स्त्री, शूद्र, वैश्यांना वेदांच्या खोल विहिरींतून पाणी काढणें शक्य नाहीं, त्यांना मनमुराद पाणी मिळण्याची सोय गीतेच्या वाहत्या झऱ्यांत होण्यासारखी आहे.........गीतेचा प्रचार म्हणजे निष्काम कर्माचा प्रचार, गीतेचा प्रचार म्हणजे भक्तीचा प्रचार, गीतेचा प्रचार म्हणजे त्यागाचा प्रचार. हा प्रचार प्रथम आपल्या आत्म्यांत झाला पाहिजे. ज्या दिवशीं आत्मा त्यानें परिपूर्ण भरून वाहूं लागेल, त्या दिवशीं तो दुनियेंतहि पसरल्याशिवाय राहणार नाहीं. .........गीतेचें रहस्य उघडें आहे. भगवान् स्वतःच सांगतात कीं, "मीं तें सूर्याला सांगितलें आहे. ज्याला डोळे असतील तो तें पाहूं शकतो; इतकें तें उघडें आहे आणि झांकलेलेंच असलें तर तें गीतेच्या पुस्तकांत खासच झांकलेलें नाहीं. तें हृदयाच्या गुहेंत झांकलेलें आहे. ह्या गुहेच्या तोंडाशीं दुर्वर्तनाचे दगडगोटे सांचले आहेत. ते दूर करून आंत पाहिलें पाहिजे. त्यासाठीं मेहेनत करावी लागेल.........गीता कुरुक्षेत्रांत सांगितली आहे. संस्कृतांत कुरु म्हणजे कर्म असा अर्थ आहे. कुरुक्षेत्र म्हणजे कर्माची भूमि. या कर्माच्या भूमिकेवर गीता सांगितली आहे आणि तेथेंच मेहेनतीच्या कानानें ती ऐकायची आहे......... गीतेच्या प्रचाराच्या बाह्य कल्पनेवर जोर न देतां हातून कांहीं तरी निष्काम सेवा होईल असा प्रयत्न करावा. त्याबरोबर भक्तियुक्त चित्तानें यथाशक्ति गीतेचा पाठ करणें उपयुक्त आहेच."

◆ ◆ ◆

आई, गीताई आणि बापूजी या पूज्य त्रयीबद्दल त्यांच्या भावना काय आहेत त्या आपण पाहिल्या. या भावबळाच्या

जोरावर त्यांनीं पुढील आयुष्यक्रमांत कशीं पावलें टाकलीं, निष्काम कर्मयोग आपल्या आचरणांत आणण्याचा कसा प्रयत्न केला आणि या संगमरवरांतून एक सुंदर आणि तेजस्वी मूर्ति कशी निर्माण झाली याचें अवलोकन करणें हें अतिशय मनोरंजक आणि तितकेंच उद्‌बोधक आहे.

इ.स. १९१६च्या आरंभीं विनोबा घर सोडून काशीला आले. तेथून लौकरच गांधीजींच्या जवळ आश्रमांत आले. हें जरी खरें असलें तरी त्यांच्या आश्रमांतीलच का होईना पण स्वतंत्र आयुष्यक्रमाला सुरुवात झाली ती ते १९२१ सालीं वर्षप्रतिपदेला शेठ जमनालाल बजाज यांनीं स्थापन केलेल्या वर्धा येथील आश्रमाचे सूत्रचालक म्हणून आले तेव्हांच. १९२१ च्या १४ जानेवारीला साबरमतीच्या सत्याग्रहाश्रमाची एक शाखा शेठ जमनालाल बजाज यांनीं श्री. रमणिकलाल मोदी यांच्या नेतृत्वाखालीं वर्ध्याला सुरू केली; पण प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें श्री. मोदी यांना तेथें राहणें जमेना तेव्हां बापूजींनीं विनोबांना तेथील सूत्रें हातांत घेण्याबद्दल विचारलें. त्यावर "मला हवीं तीं माणसें बरोबर देत असाल तर हें काम मी पत्करतों," असें विनोबांनीं उत्तर दिलें. बापूजींची संमति मिळतांच विनोबा आपली मंडळी घेऊन वर्ध्यास दाखल झाले. या मंडळींत त्यांचे बडोद्याचे जुने स्नेही श्री. रघुनाथराव धोत्रे, कृष्णदास गांधी आणि वल्लभजी पटेल ऊर्फ वल्लभस्वामी हे प्रमुख होते.

इ.स. १९२१ ते १९५१ या तीस वर्षांतील विनोबांचें चरित्र अगदीं थोडक्यांतहि सांगतां येईल; पण या घटना वाचून त्यांचें खरें चरित्र आपणांस समजणार नाहीं. कारण विनोबांप्रमाणेंच आश्रमीय आयुष्य अनेकांनीं व्यतीत केलें. विनोबांच्या प्रमाणेंच

इतर अनेकांनीं सूत कातणें, दळणकांडण करणें, साफसफाई करणें इत्यादि दैनंदिन कामें केलीं आहेत. त्यांनीं सायंकाळच्या प्रार्थनाहि केल्या आहेत आणि विनोबांप्रमाणेंच त्यांनीं तुरुंगवासहि पत्करला असेल. पण केवळ ह्या गोष्टींतच विनोबांचें 'विनोबापण' सामावलेलें नाहीं. अवांतर गोष्टींना जें तेज चढतें तें तेजस्वी व्यक्तिमत्त्वामुळें. विनोबांनीं आपलें व्यक्तित्व कसें जोपासलें, आपल्या चित्तवृत्तीची मशागत कशी केली, तण आणि पालापाचोळा कसा काढून टाकला, हें पाहायचें असेल तर त्यांच्या जीवनांत खोल डोकावून पाहिलें पाहिजे; कारण त्यांचें जीवन म्हणजे उथळ ओढा नाहीं तर खोल विहीर आहे आणि तीमध्येंहि जिवंत झरे आहेत. माझ्या लहानपणीं एका जादूगारानें केलेला एक खेळ मला आठवतो. त्यानें झांकण आणि बूड नसलेला एक पत्र्याचा डबा घेतला. तो अर्थातच संपूर्ण रिकामा होता. त्यावर दोन्ही बाजूंनीं त्यानें आमच्यासमोर कागद लपेटले आणि ते दोन्ही तोंडावर पक्के राहावे म्हणून त्यावर पत्र्याचीं दोन अरुंद चाकें बसवून एक कागदाचें ढोलकेंच म्हणाना, त्यानें तयार केलें. या ढोलक्यांत काय आहे, असें त्यानें प्रेक्षकांना विचारतांच "तें तर रिकामें आहे" असें प्रेक्षकांकडून उत्तर मिळालें. त्यावर त्या जादूगारानें एका छोट्या काठीनें एक फटका मारून एका बाजूस भोंक पाडलें आणि आंत डोकावून पाहात तो म्हणतो, "आंत तर किती तरी गंमत आहे." आणि मग ती काठी आंत घालून त्यानें रंगीत चिरटोळ्या बाहेर काढावयास सुरुवात करून त्यांचा प्रेक्षकांसमोर केवढा तरी ढीग घातला. विनोबांच्या आश्रमीय जीवनाकडे पाहिलें म्हणजे या जादूच्या डब्याची आठवण होते. त्यांच्या योग्यतेची जाणीव महादेवभाई, गांधीजी किंवा इतर

जवळची कांहीं मंडळी याना होती. पण या अनावृत आणि अनासक्त साडेतीन हात देहांत एवढी क्रांतिकारक शक्ति असेल याची कल्पना बाहेरच्या जगाला नव्हतीच; पण गांधीजींखेरीज इतर जवळच्यांना तरी ती किती असेल याची शंकाच आहे. ते तपोधन आहेत असें महादेवभाईंनाहि वाटे. पण याच ब्रह्मतेजांतून पुढें अहिंसक क्षात्रतेज निर्माण होणार आहे याची कल्पना त्यांनाहि पूर्णपणें नसेल. पण विनोबांच्या यशाचीं प्रसादचिन्हें कांहीं प्रमाणांत आधींच दिसलीं होतीं यांत शंका नाहीं. त्यांच्याबद्दल महादेवभाई आपल्या रोजनिशींत लिहितात, "बापूजींची भक्तमाला मोजण्याची इच्छा होते. त्यांत तपोधन विनोबांना पहिला क्रम देण्यांत कोठलाहि संकोच वाटत नाहीं. असे लोक जोंपर्यंत वावरत आहेत तोंपर्यंत बापूंचा झेंडा फडकत राहील यांत काय शंका!" खुद्द गांधीजींनीं विनोबांचा परिचय एका आश्रमांत आलेल्या व्यक्तीला असा करून दिला होता : "विनोबा हें या आश्रमांतील एक रत्न आहे. इतरांप्रमाणें ते या आश्रमांत आशीर्वाद घेण्यासाठीं आलेले नाहींत तर देण्यासाठीं आलेले आहेत. ते येथून कांहीं घेऊन जाण्यासाठीं नव्हे, पण आपणाला कांहीं देण्यासाठीं येथें आले आहेत."

इ.स. १९२१ च्या वर्षप्रतिपदेला विनोबांनीं वर्धा आश्रमाचीं सूत्रें हातांत घेतलीं. त्यांच्याभोवतीं तरुण मंडळी भराभर जमूं लागली. वास्तविक पाहातां प्रथमदर्शनीं विनोबा कांहींसे अबोल, स्वतःमध्यें मग्न असलेले व थोडेसे तुसडेहि वाटत. पण हें सर्व तिऱ्हाइताला आणि फक्त पूर्ण परिचय होईपर्यंतच. पण फणसाला जरी कांटे असले तरी तो आंत मधुर असतो, त्याचप्रमाणें जो सद्बुद्धीनें त्यांच्या पोटांत शिरला त्याला त्यांच्या मधुर स्वभावाचा अनुभव

येत असे. असाच अनुभव आश्रमांतील तरुण मंडळींना येऊं लागला. ते हिशेबी असले तरी रुक्ष नाहींत, बुद्धिमान् असले तरी अहंकारी नाहींत, स्वतः कोठलेंहि असिधारा व्रत आचरीत असले तरी दुसऱ्याचें दुबळेंपण समजून घेणारे आणि त्यावर पांखर घालणारे आहेत; हें त्यांच्या लक्षांत येऊं लागलें. त्यांच्या आश्रमांत एक विणकर होता. तो आपल्या कामांत पुरा कसबी असला तरी त्याला चोरून विड्या ओढण्याची संवय होती; त्यामुळें त्याच्या कामावर परिणाम होऊं लागला. आश्रमाच्या नियमाप्रमाणें राजरोस विडी ओढणें शक्य नव्हतें; तेव्हां विनोबांच्या लक्षांत ही गोष्ट येतांच त्यांनीं स्वतःच त्याला विड्या पुरवून ठराविक कामानंतर त्या ओढायची परवानगी दिली. फक्त ओढलेल्या विड्यांचा हिशेब ठेवायला त्याला सांगितलें. लोकांना याचें आश्चर्य वाटलें. तेव्हां ते म्हणाले, 'त्याला विडी ओढायची बंदी करून आपण त्याला चोरी करायला आणि खोटें बोलायला शिकवितों. त्याचें व्यसन सुटत नाहीं तें नाहींच आणि शिवाय या कसबी माणसाच्या गुणांचा आपल्याला पूर्ण उपयोग होत नाहीं तो नाहींच. उलट, त्याला राजरोस परवानगी दिली तर त्याला खोटेपणाचें पाप लागणार नाहीं, त्याच्याकडून आपल्याला कामहि पुरेसें मिळेल आणि एखादे वेळीं त्याची त्यालाच लाज वाटून तो कदाचित व्यसनमुक्त होईल." आणि त्यांचें म्हणणेंच शेवटीं खरें झालें.

विनोबा हे एक उत्तम शिक्षक होते. ते स्वतः नाना तऱ्हेचीं सुभाषितें सांगून, दृष्टांत देऊन आणि अनेक वेळां गणित्याच्या हिशेबी पद्धतीनें आपला विषय समजावून सांगत. त्यांचा विशेष म्हणजे अनेक सूत्रांचे अर्थ चालू युगाला उपकारक होतील अशा तऱ्हेनें बसवून दाखविण्यांत ते मोठे चतुर आहेत आणि या

सर्वांस विनयाची जोड आहे. त्यांच्या स्मरणशक्तीची तारीफ करतांना लहानपणीं त्यांची आई म्हणे, "आमचा विन्या, संध्या किती लवकर शिकला! त्याला मुळीं पाठ करावंच लागत नाहीं." त्यावर विनोबा हंसून म्हणत, "आई, तुझा विन्या संध्या किती लवकर विसरतो हें तुला माहीत नाहीं! त्याची संध्या पाठ झाली या खुशींत तूं असतेस, तोंपर्यंत तो ती विसरलेलाहि असतो!"

त्यांची विस्मरणशक्तीहि दांडगी आहे आणि एका परीनें तीच त्यांच्या धारणाशक्तीची ताकद आहे. एकाग्रतेनें मननपूर्वक वाचणें, महत्त्वाचें तेवढें लक्षांत ठेवणें आणि फालतू व गैरलागू विसरून जाणें हेंच खरोखर खऱ्या बुद्धिमंताचें लक्षण आहे. त्यांच्याकडे रोज चर्चा करायला येणाऱ्या एका गृहस्थाची जात कोणची असें कोणीं तरी विचारलें. त्यावर ते म्हणाले, "त्यानें सांगितली खरी पण मला ती आठवत नाहीं. कारण माझ्या कामांत मला त्या गोष्टीची गरज पडत नाहीं." त्यांच्याकडे एक मुलगी बरेच दिवसपर्यंत कांहीं शिकण्याकरितां येत असे. कालांतरानें ती पुन्हा आली आणि त्यांनीं आपणांस ओळखलें नाहीं असें पाहून ती म्हणाली, "मी तुमच्याकडे अमुक अमुक शिकण्याकरितां येत असें." आणि तिनें त्यांपैकीं कांहीं भाग म्हणून दाखविला. त्याबरोबर विनोबा म्हणाले, "होय, हा आवाज माझ्या ओळखीचा आहे. आतां मीं तुला ओळखलें. कारण तूं शिकत असतांना तुझा हा आवाजच नेमका माझ्या लक्षांत राहिला. बाकी सर्व मी विसरलों." या एका गोष्टीवरून त्यांच्या निर्लेप मनोवृत्तीची साक्ष पटते. कमलपत्रावर जसें पाणी ठरत नाहीं, तसेंच विनोबांच्या वृत्तीला बाह्य गोष्टींचा स्पर्शहि होत

नाहीं. रामायणांत लक्ष्मणाचें चरित्रहि असेंच वर्णिलें आहे. सीतेचे दागिने त्याच्यापुढें टाकले असतां त्यानें फक्त "हींच राघवा, हींच पैंजणें" असें म्हणून सीतामाईचीं पैंजणेंच तेवढीं ओळखलीं. असें हें विदेहीपण, पूर्व सुकृताची जोड असली तरच फक्त व तेंहि अनंत परिश्रमांनींच साध्य होतें.

आश्रमाला त्यांनीं पाहतांपाहतां गुरुकुलाचें रूप आणलें. कृषिउद्योगमूल शिक्षण-पद्धतीवरच त्यांचा भर होता, किंबहुना या पद्धतीला त्यांनींच आकार दिला. आश्रमांत एकपरीनें व्रतोपासनाच चालू होती. साफसफाई, दळणकांडण, स्वयंपाक-पाणी हीं गृहकृत्यें; पिंजणें, कातणें, विणणें हे उद्योग आणि शिवाय शेतीचें काम असा त्रिविध कार्यक्रम चालू झाला आणि हे उद्योग करीत असतांनाच शिक्षणहि दिलें जाई. त्यांतहि विद्यार्थ्यांची शारीरिक, मानसिक व बौद्धिक कुवत, त्याचप्रमाणें स्वभाव आणि संवयी या गोष्टींचा साकल्यानें विचार करून त्यांना शिक्षण दिलें जाई. विद्यार्थ्यांनीं स्वाभिमान सोडूं नये आणि परावलंबीहि असूं नये, याविषयीं विनोबा फार जागृत असत. ते स्वतः आहारविहारांचे निरनिराळे प्रयोग करीत, व्रतें आचरीत पण आपल्या प्रेमळपणामुळें इतरांना सांभाळून घेत.

◆ ◆ ◆

इ. स. १९२३ सालीं विनोबांनीं 'महाराष्ट्रधर्म' नांवाचें अठ्ठेचाळीस पृष्ठांचें पण कांठोकांठ उत्कृष्ट मजकुरानें भरलेलें असें एक मासिक सुरू केलें. याचें वैशिष्ट्य म्हणजे यांतील सर्व मजकूर विनोबांनीं लिहिलेला असे. पण या मासिकाचे फक्त

चारच अंक निघाले. नंतर नागपूरला सरकारनें राष्ट्रध्वजाला बंदी केल्यानें अचानक झेंडा—सत्याग्रह उभा राहिला. विनोबांचा राजकारण हा मुख्य विषय नसला तरी प्राप्तकर्तव्य म्हणून त्यांनीं त्यांत भाग घेतला आणि ते कारागृह-निवासी झाले. कारागृहांतून सुटल्यानंतर त्यांनीं महाराष्ट्रधर्म मासिकाचें साप्ताहिकांत रूपांतर केलें आणि तें सुमारें तीन वर्षे चालविलें. महाराष्ट्रधर्मांतील निवडक लेखांचा संग्रह **'मधुकर'** या पुस्तकांत केलेला आहे. विनोबांची लेखनशैली देखील पाल्हाळिक नसून कांहींशी त्रोटकच आहे. त्यांचा हिशेबीपणा आणि मुद्देसूदपणा तेथेंहि आढळतो. एक उत्तम उदाहरण म्हणून त्यांनीं **मधुकर** या पुस्तकाला लिहिलेली प्रस्तावना येथें मुद्दाम देत आहें.

## मधुकरचा उलगडा

महाराष्ट्र-धर्म साप्ताहिकांतील ( सन १९२४ ते १९२७ ) विशिष्ट लिखाणांचा हा संग्रह आहे. 'महाराष्ट्र-धर्म' शब्दाचें संक्षिप्त रूप 'म. ध.' त्याला पाणिनी-प्रमाणें 'उ' अनुबंध जोडून 'मधु' हा सांकेतिक शब्द साधला आहे. 'मधु' म्हणजे महाराष्ट्र-धर्मांतून निवडलेलें लिखाण. त्याचा संग्रह करणारें हें पुस्तक आहे म्हणून ह्याचें नांव मधुकर.

पुस्तकाच्या नांवाचा उलगडा केल्यानंतर प्रस्तावना अधिक लांबविण्याची आवश्यकता दिसत नाहीं. वस्तु वाचकांच्या समोर आहेच.

नालवाडी

१३-७-३६

**विनोबा**

विनोबांचें आश्रमीय जीवन म्हणजे एक प्रखर साधनाच होती. साधनेच्या काळांत स्वतःपुरतें तरी दयेमायेला स्थान असतां कामा नये, असें विनोबांचें मत आहे. कारण नरम साधकाला मोह गिळून टाकतील आणि साधना मात्र बाजूला राहील असें त्यांना वाटतें. अर्थात् अशी प्रखर साधना करीत असणाऱ्या माणसाच्या मनांत नसलें तरी भोंवतालच्यांना त्याची थोडीशी भीति वाटली तर तें साहजिकच नाहीं काय ? विनोबांच्या काटेकोर आणि तुटक वागण्यामुळें त्यांचे कांहीं निकटवर्ती सोडून इतर अनेक माणसें त्यांच्याबद्दल नितांत आदर असूनहि त्यांच्यापासून थोडीं दूर असत. अर्थातच विनोबांची खरी योग्यता आणि त्यांचें सुप्त सामर्थ्य यांची ओळख जगालाच काय पण भोंवतालच्या माणसांनाहि असणें शक्य नव्हतें.

आश्रमांत येईपर्यंत त्यांनीं स्वतःची जी कांहीं तयारी केली ती बालपणांतील ऊर्मींना अनुसरून केली. त्या वेळीं मूळचा तेजस्वी पिंड आणि त्यावर वाचनमननादि बाह्य कारणांनीं होणारे संस्कार, यांमुळें ज्वलंत भावनांचे कढावर कढ त्यांच्या मनांत येत पण ते स्थिर झाले नव्हते. भोंवतालची राजकीय परिस्थिति पाहून आणि देशवासीयांची खुरटलेली मनःस्थिति लक्षांत घेऊन, ‘ कांहींतरी केलें पाहिजे ’ असें त्यांना वाटे. क्रांतिकारकांच्या सशस्त्र मार्गाचा त्यांना क्षणभर मोह पडे, तर कठोर साधनेकरितां हिमालय गांठावा असेंहि त्यांना वाटे. अर्थातच या बालवयांत त्यांची जी मानसिक तयारी झाली ती कांहीं पद्धतशीर झाली नव्हती. त्यांच्या बालपणच्या एका स्नेह्याच्या शब्दांत, सांगायचें तर “ असामान्य बुद्धिमत्ता, प्रखर वैराग्य, ब्रह्मचर्यप्रेरणा, अद्भुत विकासशीलता, बुद्धीचें आणि हृदयाचें विलक्षण सामंजस्य”

हे गुण त्यांच्या ठिकाणीं उपजतच होते. त्यामुळें त्यांचें जसें खाण्यापिण्यांत चित्त नसें तसेंच बाह्य राहणीकडेहि लक्ष नसें. वडिलांनीं आंबे खाण्याकरितां दिलेले पैसे तसेच पडून रहात आणि कोणीं "केंस कां वाढवले, सदरा कां घातला नाहीं, जोडया-शिवाय कां राहतोस" असें विचारलें म्हणजे ते उद्धटाप्रमाणें "तुम्ही न्हावी आहांत का?" अशासारखे प्रतिप्रश्न विचारीत. आश्रमांत आल्यानंतर हा उसळणारा अवखळपणा कमी झाला आणि त्यांच्या जीवनाला शिस्तीची चाकोरी लागली.

काशीला असतांना आश्रमाकडे त्यांचें मन ओढण्याचें तात्कालिक कारण गांधीजींचें भाषण हें तर खरेंच, पण त्याच्या आधींचें कारण म्हणजे लोकशिक्षण या मासिकांत छापलेलें सत्याग्रहाश्रमाचें पत्र हें होय. त्यांतलीं व्रतें, नियम, कार्यक्रम त्यांना अतिशय आकर्षक वाटला. त्यांनीं गांधीजींशीं पत्रव्यवहार केला आणि मग हिमालयांत जाण्याचा अजूनहि मधूनमधून मनांत डोकवणारा विचार कायमचा बाजूस सारून ते आश्रमांत दाखल झाले. आश्रमांतील नियमबद्ध आयुष्य त्यांना इतकें पसंत पडलें कीं, आरंभीच्या काळांत संस्कृत शिकण्याकरितां आणि प्रकृति सुधारण्याकरितां त्यांनीं जी एक वर्ष रजा घेतली, त्या अवधींतहि त्यांनीं आश्रमांतील सर्व नियम पाळले आणि आपला अहवाल महात्माजींना सादर करून त्यांच्याकडूनहि धन्यता मिळविली.

इ.स. १९२१ पासून १९४७ पर्यंत विनोबांनीं आश्रमवासी या नात्यानें जें जीवन व्यतीत केलें, तें अत्यंत आदर्श होतें; यांत शंका नाहीं. तरी पण घटनांचा विचार केला तर मात्र त्यांत अतिशय थोडयाच घटना सांपडतील. या अवधींत त्यांनीं स्वतःचें मन व शरीर म्हणजे एक प्रयोगशाळाच बनविली. आश्रमाच्या सर्व

प्रकारच्या दैनंदिन कामांत ते जातीनें भाग घेत आणि मार्गदर्शनहि करीत. काम करतांकरतां जीवनांतलें शिक्षण मिळावें म्हणून त्यांचा प्रयत्न असे; तसेंच प्रार्थना आणि प्रवचन या द्वारांहि आश्रमांतील बंधूंना बौद्धिक आणि आध्यात्मिक शिक्षणहि ते देत असत. सकाळीं पावणेचारला पहिली घंटा होत असे. सकाळीं चारला प्रार्थनेपासून दिनक्रमास सुरुवात होई. सात साडेसातपर्यंत प्रातःकाळचें आह्निक उरकून आणि कांजीची न्याहारी करून मंडळी शेती, सूत कातणें, विणणें, सफाई किंवा भोजनव्यवस्था इत्यादि वांटून घेतलेलीं कामें करीत. ११ वाजतां भोजनाचा कार्यक्रम असे. पुन्हा १–१॥ वाजेपासून ४॥ ते ५ पर्यंत वरील कष्टाचीं कामेंच होत असत. नंतर ५॥ चे सुमारास सायंकाळचें भोजन झालें म्हणजे जो तो फिरायला जायला अगर आपआपला वेळ घालवायला मोकळा असे. रात्रीं आठला सगळीकडे सामसूम होई; कारण पुन्हा पहांटे उठायचें असे. अर्थात् ज्या कोणाला स्वतःचें वाचन वगैरे शांतपणें करायचें असेल त्याला तशी परवानगी असे. आश्रमांत राहणाऱ्या मंडळींनीं तें जीवन स्वखुषीनें पत्करलें असल्यामुळें सक्तीचा प्रश्नच नव्हता. विनोबांचा स्वतःचाच दिनक्रम आंखीव असल्यामुळें आणि यम-नियम कडक असल्यामुळें इतरांना शब्दांनीं शिकविण्याचा प्रश्नच नव्हता. ते स्वतः सर्व प्रकारचे शारीरिक कष्ट करीत. चार गुंड्या म्हणजे सुमारें तीन साडेतीन हजार वार सूत कांतीत, आल्यागेल्याच्या भेटीगांठी घेत, गीतेचा वर्ग चालवीत आणि उरलेला वेळ स्वाध्यायांत घालवीत. गांधीजींच्या राजकीय चळवळींतहि त्यांनीं कर्तव्यबुद्धीनें भाग घेतला असला तरी त्यांचा स्वतःचा भर मात्र विधायक कार्यावरच होता. परिश्रम करीत

जगावें, ज्याला जेवायचें असेल त्यानें शारीरिक कष्ट केलेच पाहिजेत असें स्वतःच्या उदाहरणानें दुसऱ्याला शिकवावें, असें कष्ट करीत असतांनाच चिंतन, मनन आणि निदिध्यास यांच्या जोरावर आंतरिक विकास साधावा; असा त्यांचा दिनक्रम होता. हिंडण्याचा तर त्यांना ल्हानपणापासूनच छंद होता व आजहि भूदानयात्रेकरितां ते विलक्षण वेगानें पायीं फिरत आहेत. जितकी पायांची गति अधिक तितकी त्यांच्या विचारचक्राला अधिक गति प्राप्त होते. पवनारला असतांनासुद्धां जवळच्या सुरगांवची सफाई करण्याकरितां रोज तीन मैल जायचें व तीन मैल यायचें हा कार्यक्रम त्यांनीं दोनतीन वर्षें खंड न पडतां पार पाडला. त्यांच्या या निष्काम कर्मयोगाबद्दल त्यांना कोणी विचारलें कीं, "हें किती दिवस चालायचें?" तर ते म्हणत, "किमान वीस वर्षांचा माझा कार्यक्रम आहे. कारण वीस वर्षांत एक पिढी बदलते. या पिढीला तिच्या अज्ञानामुळें माझ्या कार्याचें महत्त्व जरी समजलें नाहीं तरी उद्यांच्या पिढीला तें खास समजेल अशी माझी खात्री आहे;" आणि न कंटाळतां शांतपणें पण तितक्याच कडव्यापणानें ते हें कार्य करीत राहिले असते पण अचानक परिस्थिति बदलली. गांधीजी गेले आणि त्यांच्या विधायक कार्याची धुरा विनोबांना उचलणें भाग पडलें.

◆ ◆ ◆

आश्रमांत राहून आपले नित्याचे प्रयोग करीत असतांनाहि जेव्हां त्यांच्यावर एखादी कामगिरी सोंपविली जाई, तेव्हां कर्तव्य-बुद्धीनें तीहि ते पार पाडीत. १९२३ सालीं नागपूरला झेंडा सत्याग्रह सुरू झाला. त्या सत्याग्रहाचीं सूत्रें हालविणाऱ्यांपैकीं विनोबा एक होते. शेठ जमनालाल बजाज, महात्मा भगवानदीन,

गणपतराव टिकेकर आणि निळकंठराव देशमुख हे त्यांचे त्या वेळचे सहकारी होते. विनोबांनीं एक भाषण केलें; त्याबद्दल त्यांना १२ महिने कारागृहवासाचें प्रायश्चित्त सांगण्यांत आलें. तो वास्तविक त्यांचा जेलयात्रेचा पहिला अनुभव होता. वर्धा आश्रमाच्याइतकेंच कारा-आश्रमांतहि ते स्वस्थचित्त होते. त्यांची अत्यंत तरल अशी विनोदबुद्धीहि पूर्णपणें जागरूक होती. एका मुलाखतीचे दिवशीं त्यांचे कांहीं स्नेही त्यांना भेटण्यास आले. त्यांपैकीं कांहींनीं जेलची व्यवस्था कशी आहे असें त्यांना विचारलें. स्वभावसिद्ध मनमोकळेपणानें विनोबा उत्तरले, "तुम्ही सर्कस पाहिली आहे कीं नाहीं? तिथें काय घडतें? माणसं जनावरांकडून कामें करून घेतात. इथें बरोबर उलटी स्थिति असते. या ठिकाणीं जनावरें माणसांना मार्गदर्शन करतात आणि त्यांना ताब्यांत ठेवतात." या मुलाखतीच्या वेळीं कांहीं जेलचे अधिकारीहि हजर होते. त्यांनादेखील हा फटका ऐकून हंसण्याखेरीज गत्यंतर उरलें नाहीं. नागपूर जेलमधून त्यांची रवानगी अकोला जेलमध्यें करण्यांत आली. ज्या दिवशीं ते अकोला जेलमध्यें आले, त्या दिवशीं विनोबांच्या व्यक्तिमत्त्वाची चुणूक दाखवणारा एक महत्त्वाचा प्रसंग त्या ठिकाणीं घडला. अकोला जेलमध्यें राजकीय बंद्यांनीं काम करायचें नाकारलें होतें. विनोबांना हें कळतांच त्यांनीं त्यांची समजूत घातली. ते म्हणाले कीं, "काम न करतां अन्नग्रहण करणें हें एक पाप आहे. तुम्ही काम करावयाची सक्ति म्हणजे एक ईश्वरी प्रसादच समजला पाहिजे. तुम्हांला शारीरिक श्रमाची संवय व्हावी म्हणूनच जणूं कांहीं ही सुवर्णसंधि प्राप्त झाली आहे असें समजून तुम्ही तिचा पूर्ण उपयोग करून घेतला पाहिजे." विनोबाच्या

उपदेशामुळें सगळे राजकीय बंदी काम करूं लागले. अकोला जेलच्या अधिकाऱ्यांनाहि, हें सर्व विनोबांच्या जादूमुळेंच घडलें असें वाटलें. जरी त्यांना वर्षाची शिक्षा झाली होती, तरी २० सप्टेंबर १९२३ रोजीं म्हणजे अवघ्या तीन महिन्यांनीं त्यांची सुटका झाली. एका भल्या पहांटे विनोबा पुन्हा आश्रमांत दाखल झाले आणि जणूं कांहीं घडलेंच नव्हतें, अशा वृत्तीनें त्यांनीं दैनंदिन कार्यक्रमास सुरुवात केली. १९२४ सालीं त्रावणकोर संस्थानांतील वैकोम येथें हरिजनांच्या मंदिरप्रवेश सत्याग्रहास मार्गदर्शन करण्यासाठीं गांधीजींनीं त्यांना पाठविलें. विनोबांनीं स्वतःच्या आवडीचें असें काम परत आल्यानंतर लगेच सुरू केलें. त्यांनीं ग्रामसेवेचा एक आराखडा तयार केला. वर्ध्याच्या आसपासच्या तीनशें खेड्यांना या योजनेचा फायदा मिळणार होता. त्यांनीं ग्रामसेवकांचें एक जाळेंच तयार केलें आणि काम करणारांना वेगवेगळीं खेडीं वांटून दिलीं. या सर्व कार्यकर्त्यांशीं १९४८ च्या सुरुवातीपर्यंत विनोबा संबंध ठेवीत होते आणि देखरेखीचें हें काम करीत असतांनाहि कांतणें, विणणें, खणणें इत्यादि कामांतहि ते हळूहळू तरबेज होत होते.

१९३२ सालीं गांधीजी राउंड टेबल कॉन्फरन्सहून परत आले आणि ते हिंदुस्थानांत पाय ठेवतात न ठेवतात तोंच लॉर्ड विलिंग्डननें त्यांच्यापासूनच धरपकडीस सुरुवात केली. विनोबा त्या वेळीं धुळें येथील राजवाडे इतिहाससंशोधक मंदिराच्या उद्‌घाटनसमारंभांत भाषण करून जळगांवीं आले होते. तिथेंच त्यांच्या सहकाऱ्यांसह त्यांना पकडून त्यांच्यावर खटला भरण्यांत आला आणि त्यांना सहा महिन्यांची शिक्षा होऊन धुळ्याच्या जेलमधें आणून ठेवलें. जेलमधें विनोबांचा चिंतन, मनन, प्रवचन

हा कार्यक्रम सुरूच असल्यानें तेथें आणल्या गेलेल्या अनेक सत्याग्रहींशीं त्यांचें मार्गदर्शकाचें नातें निर्माण झालें. तेथें ते दर रविवारीं गीतेवर प्रवचनें करीत. त्यांची विचारसरणी तर्ककर्कश असली तरी विवेचन रसपूर्ण असे. जीवनाशीं संबंध असलेल्या गोष्टींची चर्चा ते गीतेच्या आधारानें करीत. हीं प्रवचनें साने गुरुजींनीं लेखबद्ध करून ठेवलीं आहेत.

धुळ्याच्या तुरुंगांतच त्यांनीं गीताईची अखेरची प्रत तयार केली. गीताई व गीताप्रवचनें यांच्या प्रती आतांपर्यंत हजारोंनीं खपल्या आहेत. जेथें जेथें विनोबा जातात तेथें तेथें गीता-प्रवचनांचा ते प्रचार करतात. त्यांच्या चिंतन-मननाचें सार म्हणजे गीताप्रवचनें होत. त्यांच्या आश्रमीय जीवनांत त्यांनीं मागें कांहीं उरण्यासारखें निर्माण केलें असेल तर तें म्हणजे गीताई व गीताप्रवचनें होत. गीताप्रवचनांच्या द्वारां त्यांनीं शाश्वत स्वरूपाचें असें विद्यादान केलें आहे. एका भूदान यात्रेंत त्यांना गीताप्रवचनाची महति गाणारा एक नागरिक भेटला. तो म्हणाला, "हें पुस्तक जिथें जिथें जातें तिथें तिथें आपला प्रभाव पाडतें. त्याला आतां रामायणासारखें स्थान प्राप्त होऊं लागलें आहे. तें वाचून विद्वानालाहि मार्ग सांपडतो आणि संन्याशालाहि मार्ग सांपडतो." त्यावर विनोबा म्हणाले, "जेथें तें पुस्तक पोंचलें असेल तेथें भूदान अधिक मिळतें असा माझा अनुभव आहे. आजच्या जगांत कोणी तलवारीच्या जोरावर जमीन हिसकावून घेतात तर कोणी कायद्याच्या जोरावर. पण मी तर पुस्तकाच्या जोरावर जमीन मिळवीत आहें. मी तुम्हांला विद्या-दान देत आहे आणि तुमच्याकडून 'माती 'सारखी तुच्छ वस्तु घेत आहे. मग सांगा बरें, हा सौदा स्वस्त कीं महाग?"

विनोबांच्या मतानें भूदान आणि विद्यादान हीं दोनच शाश्वत स्वरूपाचीं दानें आहेत. यांपैकीं विद्येचें दान लोकांना देऊन त्यांचेकडून ते स्वतःकरितां म्हणजेच भूमिहीनांकरितां भूमिदान मिळवीत आहेत.

विद्यादानाची थोरवी आपण आजपर्यंत पुष्कळ ऐकलेली आहे. विद्येची महति गाणारी सुंदर कविता 'विद्येनेंच मनुष्या आलें श्रेष्ठत्व या जगामाजीं' ही तर आपण लहानपणापासून म्हणत आलों आहों. जी दिल्यानें कमी होत नाहीं तर उलट वाढते, जी चोरीस जात नाहीं, जिच्या दानानें आणि ग्रहणानें देणारा आणि घेणारा दोघेहि धन्य होतात अशा विद्येचें महत्त्व कोण नाकारील? आणि सर्व प्रकारच्या विद्यांत श्रेष्ठ अशी जी आत्मविद्या तिचें विवेचन ज्यांत केलेलें आहे असे गीतारहस्य, गीताप्रवचनें आदि ग्रंथ फारच श्रेष्ठ आहेत, यांत शंका नाहीं. जशी विद्या ही शाश्वत स्वरूपाची असते तशीच भूमि हीहि शाश्वतच आहे. माणसांच्या पिढ्या नष्ट होतात, पण एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे आलेली जमीन शिल्लकच राहते. विद्या ही जशी लपवून ठेवली असतां विनाश पावते तशीच जमीन हीदेखील ज्याला तिचा उपयोग नाहीं त्याच्याजवळ राहिली तर पडीक होते. म्हणून विद्या मुक्त हस्तानें द्यावी तशीच जमीनहि मुक्त हस्तानें देत जावी. विद्येच्या बाबतींत निदान देणारा ज्ञानी असावा लागतो आणि घेणारा अधिकारी असावा लागतो. ती गोष्ट भूमिदानाबाबत नाहीं, म्हणूनच तें अधिक सोपें आहे. गीताप्रवचनें वाचून जमीन असणारांना ती नसणारांना देण्याची बुद्धि होते. अशा रीतीनें

विनोबांच्या विद्यादानानें त्यांच्या भूमिदानकार्याला गति प्राप्त झाली आहे.

विनोबांच्या जीवनांत सदैव दिसून येणारी आत्मसमर्पणाची ओढ अत्यंत तीव्र आहे आणि ती अनेकवार उफाळून वर आलेली आहे; पण तितकीच त्यांची वृत्ति निरहंकारी आहे. त्यामुळें गांधीजींच्या आज्ञेशिवाय कांहींहि करावयाचें नाहीं, असा त्यांनीं निश्चय केला होता आणि तो त्यांनीं पारहि पाडला. त्यांच्या पदयात्रेंत ७ जून १९५२ या दिवशीं एका सभेंत बोलतांना त्यांना एकदम गांधीजींचें स्मरण झालें आणि ते गहिंवरून आले. भरल्या आवाजानें ते म्हणाले, "आजचाच दिवस होता तो. जूनची सात तारीख होती. ३६ वर्षांपूर्वी याच दिवशीं मी बापूंना प्रथम भेटलों. तेव्हां मी लहान पोर होतों. त्या दिवसापासून आज ३६ वर्षें त्यांनीं आज्ञा द्यायची आणि मीं तिचें पालन करायचें हेंच माझें जीवन आहे." त्यांना जेव्हां जेव्हां आपलें जीवन अधिक कारणीं लागावें असें वाटे, तेव्हां ते गांधीजींना लिहीत. एरव्हीं एखाद्या भोळ्या भक्ताप्रमाणें ते कधीं त्यांना भेटायलाहि गेले नाहींत. जेव्हां गांधीजींना त्यांना भेटावेंसे वाटे किंवा त्यांचा सल्ला घ्यावासा वाटे तेव्हां तेहि त्यांना बोलावून घेत. दोन डोळे शेजारी असावेत, ते एकाच दृष्टीला पूरक असावेत पण एकमेकांपासून अलग असावेत तसे हे दोन महापुरुष एकत्र पण स्वतंत्र रहात.

त्यांनीं आपला अहंकार किती पराकोटीपर्यंत नाहींसा केला होता, तें त्यांच्या पुढील उद्गारांवरून दिसून येतें. धुळ्याच्या जेलमधें असतांना एकदां ते सहज म्हणाले होते, "हल्लीं जेव्हां पहावें तेव्हां लोक रामायणाचे भाषेंत बोलतात. ते ब्रिटिश

राज्याला रावण म्हणतात. महात्माजींना राम म्हणतात. वल्लभभाईंना हनुमान म्हणतात आणि जवाहरलालना अंगद म्हणतात. तेव्हां मी मनाशीं म्हणतों कीं, या रामायणांत माझी भूमिका कोणती? आणि मग मला वाटतं कीं, रामायणांतील अहिल्या जशी शिळा होऊन पडली होती तशी शिळा आपण व्हावं म्हणजे मी खचित धन्य होईन.''

आत्मसमर्पणाची त्यांची ओढहि त्यांनीं गांधीजींना लिहिलेल्या एका पत्रांत अशीच उत्कटतेनें व्यक्त होत आहे. "गेलीं बारा वर्षें मी आपल्या आज्ञेनें वर्ध्यास राहिलों. वर्ध्यास म्हणण्यापेक्षां आपल्या आज्ञेंत राहिलों. वर्ध्याचा आश्रम स्थापन होऊन १२ वर्षें पूर्ण झालीं म्हणजेच एक तपाचा काळ संपला. या अवधींत मनोमन अनुभव चांगला आला. 'आपण करतों' ही भावना नष्ट झाली. सर्व कांहीं ईश्वरच आहे अशी प्रचीति आली. बारा वर्षें व्रतपालन करूनहि स्वतःमध्यें मला बरीच अपूर्णता जाणवते. म्हणून येत्या २५ तारखेपासून वर्ध्यापासून दीड मैलावर नालवाडी ह्या संपूर्ण हरिजन वस्ती असलेल्या गांवांत जाऊन मी राहणार आहें. तुमचा मला पूर्ण आशीर्वाद आहे हें मला माहीत आहे. तरीहि मी पुनः त्याचीच याचना करीत आहें. आपल्या महायज्ञांत आहुति बनण्याची पात्रता मला मिळवून द्या.'' यावर बापूजींनीं दोनच ओळींत उत्तर दिलें, "तुमचें प्रेम आणि भक्ति माझ्या डोळ्यांत आनंदाश्रु आणते. मी त्या योग्य असो वा नसो; पण ती तुम्हांला निश्चित फलदायी होईल. तुमच्या हातून फार मोठें कार्य घडेल.'' ठरल्याप्रमाणें विनोबा नालवाडींत राहूं लागले. आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीनें आसपासच्या गांवांचीहि स्थिति सुधारण्याचा त्यांचा प्रयत्न चालू

होता. सर्व ग्रामसेवक त्यांना आपला अहवाल मधूनमधून सादर करीत आणि त्यांचा सल्ला घेत. ‘ ग्रामसेवावृत्त ’ नांवाची एक मासिकपत्रिका निघूं लागली. ग्रामोद्योग आणि खादी ह्यांचें अधिकाधिक ज्ञान गांवकऱ्यांना मिळावें म्हणून प्रतिवर्षी एक यात्राहि भरविली जाऊं लागली. गांधीजींच्याहि मनांत खेड्यांकडे अधिकाधिक लक्ष द्यावें असें येऊं लागलें. हिंदुस्थानांत हाताच्या बोटांवर मोजण्याइतकीं शहरें आहेत, तर लक्षावधि खेडीं आहेत. बहुसंख्य प्रजा शेतकऱ्यांच्या रूपानें याच खेड्यांत राहते. आपण जर लोकांकरितां स्वराज्य अशी भाषा बोलतों तर या बहुसंख्य लोकांच्या मनांत स्वराज्याच्या चळवळीबद्दल आस्था निर्माण झाली पाहिजे आणि उलट या खेड्यांकडे शहरांचें आणि विशेषतः शहरांत काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचें लक्ष वेधलें पाहिजे. खेड्यांकडे लक्ष वेधण्याकरतां काँग्रेसचें वार्षिक अधिवेशन खेड्यांत भरवावें अशी गांधीजींनीं कल्पना काढली. हें अधिवेशन भुसावळजवळ फैजपूरला व्यायचें ठरलें. फैजपूरच्या ‘ टिळक नगराच्या ’ कामाचा समारंभ विनोबांच्या हस्तें झाला.

विनोबांचा खादीवर फार मोठा विश्वास आहे. खादीला ग्रामोद्योगांत महत्त्वाचें स्थान आहे. आठ तास कातून निदान कुशल माणसाला तरी आपलें पोट भरतां आलें पाहिजे, असें गांधीजींना वाटे. विनोबांनीं या कामीं आपली शक्ति वेचायचें ठरविलें. तकलीची गति वाढविण्याचा प्रयत्न त्यांनीं आरंभिला. पुढें दोन्हीं हातांनीं कातणें सुरू झालें. आश्रमांतील मुलांनाहि ते या कामीं तयार करूं लागले. गांधींना तर अर्थातच या कामाची फारच आवड आणि हौस होती. खादी ही आर्थिक दृष्ट्याहि यशस्वी होईल अशी त्यांची श्रद्धा होती. या बाबतींत

विनोबांनीं पुष्कळ विचार केला, लेखन केलें आणि आचारहि केलाच केला. अर्थात् हें अर्थशास्त्र आणि व्यवहारशास्त्र टीकाकारांनाच नव्हे तर खुद्द गांधींच्या अनुयायांनाहि कितपत मानवलें आहे तें आपण पाहातच आहोंत. तेव्हां त्यावर वेगळ्या टीकेची जरुरी नाहीं.

एका गोष्टीबद्दल मात्र जातां-जातां थोडें लिहावेंसें वाटतें. **चरख्याचे सहचारी भाव** ह्या नांवाचा विनोबांनीं एक लेख लिहिला आहे. त्यांत एका साधूची गोष्ट सांगितली आहे. "कोणी एक सत्यवचनी शुद्ध मनाचा साधु एका अरण्यांत तपश्चर्या करीत होता. त्याच्या शांत तपश्चर्येच्या प्रभावानें पशुपक्षी देखील वैर विसरले. त्याच्या तपश्चर्येमुळें इंद्र घाबरला आणि त्याच्या तपश्चर्येचा नाश करण्याच्या निश्चयानें वेष बदलून तो साधूजवळ आला. त्यानें बरोबर एक तलवार आणली होती. ती तलवार त्या साधूला संभाळायला देऊन तो निघून गेला. तलवार संभाळण्याची जबाबदारी स्वीकारल्यामुळें तो साधु ती तलवार सदोदित आपल्यापाशीं बाळगूं लागला. तलवारीच्या नित्य सहवासानें त्याची बुद्धि बदलली. तो क्रूर बनला. हरणेंहि त्याला घाबरूं लागलीं आणि इंद्राचें सिंहासन निर्भय झालें." ही गोष्ट रामचंद्राच्या हातून हिंसा होऊं नये म्हणून सीतादेवीनें दंडकारण्यांत फिरत असतां सांगितली होती. प्रत्येक वस्तूबरोबर तिचे सहचारी भाव येत असतात, हें त्या गोष्टीचें तात्पर्य आहे. असेच सहचारी भाव चरखा घरांत आला म्हणजे त्याच्याबरोबर आपोआपच येतील, हें नीट लक्षांत आलें म्हणजे 'चरख्यानें स्वराज्य' या म्हणण्याचा मतलब समजेल.

यानंतर विनोबांनीं एका धनिक गृहस्थाचा चरख्याविषयींचा अनुभव दिला आहे. "माझ्या मनांत पूर्वी भलभलते विचार येत असत. चरखा सुरू केल्यापासून हे विचार आपोआप कमी झाले आहेत. मध्यें वाटलें आपण एक मोटार घ्यावी; पण लागलीच विचार आला कीं, एकीकडे आपण चरखा फिरवावा आणि दुसरीकडे परदेशाची अकारण भर करावी हें बरें नव्हे." हें उदाहरण देऊन विनोबा म्हणतात, 'हा अनुभव एकट्या-दुकट्याचा नाहीं, पुष्कळांचा आहे. चरख्याचे जे अनेक सहचारी भाव आहेत, त्यांपैकीं गरिबांविषयीं सहानुभूति हा एक महत्त्वाचा भाव आहे. गरीब विरुद्ध अमीर हा झगडा मिटविण्याची ताकद चरख्यांत आहे. वर्गावर्गांतील, जाती-जातींतील आणि धर्मा-धर्मांतील झगडे मिटविण्याची शक्ति चरख्यांत आहे; अशी विनोबांची श्रद्धा आहे. तलवारीच्या सहवासानें मनुष्य हिंसक बनतो, तर चरख्याच्या सहवासानें तो शांत बनतो.'

विनोबांची ही श्रद्धा सगळ्यांनाच मानवणें कठीण आहे. कारण असें घडतें तर चरखा चालवणारे आणि कपडे विणणारे सगळे कोष्टी आज साधु आणि सामाजिक पुढारी झाले असते. चालण्यानें व्यायाम घडतो आणि पायाचे स्नायु बलिष्ठ होतात हें अक्षरशः खरें मानलें तर सगळे पोस्टमन लंकेवर उडी घेणारे हनुमान झालेले दिसले असते. सूत कांतण्याची कृति ही बोटांच्या टोकांनीं करावयाची कृति आहे आणि बोटांच्या अग्रांत मज्जा-केन्द्रें आहेत; त्यामुळें श्रद्धेनें चरखा चालवणाराच्या मनांत कांहीं चांगले सहचारी भाव निर्माण होण्याची शक्यता मान्य करतां येईल. ज्याप्रमाणें कर्मठ माणसें वर्षांनुवर्षें पूजाअर्चा करतात, स्तोत्रपठण करतात, प्रवचनें ऐकतात पण त्यांत त्यांचें मन

नसल्यामुळें त्यांच्या मनाचा विकास शून्य होतो; त्याचप्रमाणें केवळ चरखाच काय पण दुसरें कुठलेंहि काम करून सात्त्विक भाव मनांत निर्माण होणार नाहींत, असें माझ्या अल्प समजुतीला वाटतें. साधनापेक्षां तें साधन राबविणारें जें मनोबल त्यालाच अधिक किंमत आहे. अर्थात् विनोबांनीं जें लिहिलें तें त्यांच्यासारख्या बुद्धि, उक्ति आणि कृतिशुद्ध व एकरूप असलेल्या श्रेष्ठ साधकाच्या बाबतींत संपूर्णपणें खरें असूं शकेल; पण सर्वसामान्य माणसांच्या बाबतींत तें अनुभवास येणें कठीण आहे आणि अनुयायांचे हातून अशा उक्तींचा दुरुपयोग होण्याची शक्यता असते म्हणून आदरणीय चरित्रनायकाबद्दल लिहितांनाहि अशा मतभेदांचा स्पष्टपणें उल्लेख करणें जरूर वाटलें म्हणून एवढा प्रपंच केला आहे.

लोकमान्य टिळकांनीं गीतारहस्यांत कर्मयोग सांगितला आहे. पण कर्मयोगाचा उपदेश ज्ञानेश्वरांनींहि केलेला आहे, हें विनोबांनीं सोदाहरण दाखवून टिळकांनींच कर्मयोग प्रथम सांगितला ही समजूत नम्रपणें खोडून काढली आहे. ज्ञानवृद्ध व तपोवृद्धांचे विधानास आक्षेप घेणें म्हणजे त्यांचा अधिक्षेप करणें नव्हे एवढेंच या ठिकाणीं वाचकांनीं ध्यानांत घ्यावें.

विनोबांच्या मोठेपणाचें एक लक्षण म्हणजे त्यांचे विचार, कृति आणि उक्तीमधील फार थोडें अंतर हें होय. एखादा विचार त्यांना पटला म्हणजे तो ते उच्चारून दाखवितात आणि शक्य तितक्या लवकर तो आचरणांतहि आणतात. १९३५ च्या सुमारास त्यांची तब्येत अतिशय बिघडली. त्यांचें वजनहि खूप कमी झालें आणि हें असेंच चालू राहिलें तर काळजी करण्या-सारखी परिस्थिति निर्माण होईल; असें शेठ जमनालाल यांना

वाटून त्यांनीं विनोबांना कुठेंतरी चांगल्या हवेच्या ठिकाणीं ठेवून पूर्ण विश्रांति दिली पाहिजे असें आपल्याला वाटत असल्याचें गांधीजींना सांगितलें. गांधीजींनाहि ही कल्पना मानवली पण विनोबांना तें मान्य होईना. ते म्हणाले, "ज्यांची प्रकृति बिघडते अशा इतर आश्रमवासीयांना जर चांगल्या हवेच्या ठिकाणीं नेऊन ठेवणें परवडण्यासारखें नाहीं तर असा श्रीमंती उपचार मीं तरी कां पत्करावा? तथापि मला तीन महिने मुदत मिळाली तर मीच माझी प्रकृति सुधारून दाखवितों." गांधीजींनीं ती मुदत दिली व "पण तुझ्याकडून हें न घडलें तर मात्र तुला माझ्या ताब्यांत यावें लागेल," असेंहि कळविलें. तिथपासून विनोबांनीं खणण्याचा नियमित व्यायाम आणि शास्त्रशुद्ध आहार यांच्या योगानें आपलें वजन ३५ पौंडांनीं वाढवून दाखविलें.

१९३७ सालीं विनोबा नालवाडीहून निघून वर्ध्यापासून पांच मैल दूर असलेल्या पौनार या गांवीं गेले. धाम नांवाची नदी तिथून वाहते. त्या नदीच्या एका तीरावर एक छोटी टेकडी आहे. त्या टेकडीवर जमनालालजींची एक छोटी बंगली आहे. त्या बंगलींत विनोबांनीं आपला मुक्काम ठोकला. याच पौनार आश्रमांत ते असतांना १९४० सालीं पहिले वैयक्तिक सत्याग्रही म्हणून गांधींनीं त्यांची निवड केली. गांधींनीं त्यांना विचारलें, "तुला या कामाकरितां वेळ आहे का?" विनोबांनीं उत्तर दिलें, "खरोखर पाहिलें असतां मला वेळ नाहीं. कारण मी माझ्यामागें कितीतरी व्याप लावून घेतले आहेत. पण मी मुक्तहि आहें. तेव्हां मला कोणतेंच काम बांधू शकत नाहीं. अर्थात् मी सत्याग्रह करायला केव्हांहि तयार आहें." गांधीजींनीं जेव्हां पहिला सत्याग्रही म्हणून विनोबांचें नांव जाहीर केलें तेव्हांच ते

प्रथम साऱ्या जगाला माहीत झाले. त्यांचा परिचय करून देतांना 'हरिजन' मध्यें गांधींनीं लिहिलें, "विनोबा संस्कृतचे पंडित आहेत. आश्रमांतील सुरुवातीच्या सदस्यांपैकीं ते आहेत. स्वयंपाकापासून संडास-सफाईपर्यंत सर्व कामें त्यांनीं केलीं आहेत. त्यांची स्मरणशक्ति आश्चर्यजनक आहे. स्वभावानें ते अध्ययनशील आहेत, शिक्षकहि आहेत; तसे टकळी कातण्यांत तर त्यांनीं क्रांतीच केली आहे. अत्यंत आज्ञाधारक अशा कार्यकर्त्यांची सेना त्यांच्यापाशीं आहे. इतिहासाचा त्यांचा अभ्यास पक्षातीत दृष्टीचा आहे. कायदेभंगापेक्षां रचनात्मक कार्यावर त्यांचा अधिक विश्वास आहे."

त्यांनीं तीन वेळां सत्याग्रह केला आणि सरकारनें त्यांना तीन वेळां शिक्षा दिली. नंतर पुन्हां १९४२ च्या नऊ ऑगस्टला सरकारनें त्यांना जें स्थानबद्ध केलें, तें सुमारें तीन वर्षांनीं म्हणजे नऊ जुलै १९४५ ला सोडलें. विनोबांसारख्या विदेही आत्म्याला तुरुंग हा आश्रमासारखाच होता. स्थानबद्धतेच्या काळांत ते कांहीं काळ मद्रास इलाख्यांतील वेलोरच्या तुरुंगांत होते. त्या ठिकाणीं इतर बंद्यांकडून ते त्या प्रांतांतील चारहि भाषा म्हणजे तेलगु कानडी, तामीळ आणि मल्याळम् या भाषा शिकले. आजहि हिंदुस्थानांतील अनेक भाषा त्यांना अवगत आहेत. इतकेंच नव्हे, तर कुराण मुळांतून वाचतां यावें म्हणून ते अरेबिक भाषा शिकले आहेत. कुराणाचा पाठ करून त्यांनीं मौलाना आझादांना चकित केलें आहे. वेलोरहून त्यांना मध्यप्रांतांतील शिवणी जेलमध्यें आणून ठेवण्यांत आलें. तेथून सुटल्यानंतर वर्ध्याला परत जातांना जेव्हां त्यांनीं अनेक वयोवृद्ध स्त्रीपुरुष रेल्वेरस्त्याच्या दुतर्फा राजरोस प्रातर्विधि करतांना

पाहिले तेव्हां त्यांना अतिशय दुःख झालें आणि त्यांनीं पौनार-जवळील सुरगांवच्या सफाईचें काम सुरू केलें; हें वर सांगितलेंच आहे. १९४८ सालीं गांधीजींना अचानक परलोकवास न घडता तर विनोबा कीर्तीपासून दूर राहून असेंच विधायक कार्य करीत राहिले असते. पण असें घडावयाचें नव्हतें. गांधीजींच्या मागोमाग फार मोठी जबाबदारी त्यांच्या डोक्यावर पडली आणि तेलंगणांत कम्युनिस्टांनीं जो धुमाकूळ घातला, त्यामुळें त्यांना आपल्या आयुष्यांतीलच नव्हे तर भारताच्या इतिहासांतील एका महत्त्वाच्या प्रश्नावर निर्णय घ्यावा लागला.

◆ ◆ ◆

**स्वा**तंत्र्य, समता व बंधुता या तत्त्वांचा उद्घोष जगांत प्रथम फ्रेंच राज्यक्रांतीच्या वेळीं किंवा त्या आधींपासूनच झाला. रूसो आणि व्हॉल्टेअर या तत्त्वज्ञांनीं उद्घोषिलेलीं मानवी समतेचीं तत्त्वें आचरणांत आणण्याचा प्रयत्न फ्रेंच राज्यक्रांतीचे वेळीं झाला. गांजलेल्या जनतेनें चिडून केलेला तो पहिलाच भयंकर उठाव होता. आजहि जनता चिडली म्हणजे कशा प्रकारचा विध्वंस घडतो हें आपण पाहतोंच. मग त्या पहिल्या प्रयोगाच्या वेळची कल्पनाच केलेली बरी. तरीहि त्या उठावाचें महत्त्व नाकारतां येणार नाहीं. आमच्या देशांतहि '**सर्वेपि सुखिनः सन्तु सर्वे सन्तु निरामयाः। सर्वे भद्राणि पश्यंतु मा कश्चित् दुःख-माप्नुयात् ॥**' ही समतेची वाणी कित्येक शतकांपूर्वींच आमच्या ऋषिवर्यांनीं उच्चारली आहे. राजसूयादि यज्ञ करून धनभांडारें वांटून टाकणारे आणि राज्यांत कोणीहि दुःखी नाहीं ना, कोणीहि उपाशी नाहीं ना, याची चौकशी करणारे राजे पूर्वकालींच झाले असें नव्हे; तर गांवांत कुणीहि उपाशी नाहींना, याची चौकशी

करून मगच अन्नग्रहण करणारे गांवपाटीलहि परवांपरवांपर्यंत या देशांत होऊन गेले आहेत. तरीसुद्धां समतेचें तत्त्व येथें मान्य झालें आहे असें म्हणतां येणार नाहीं. युरोपखंडांतहि फ्रेंच राज्यक्रांती-नंतर इतकीं वर्षें होऊनहि समता स्थापन झालेली नाहीं. फक्त रशियांत हा प्रयोग झालेला आहे. तो लोकांनीं पचवला आहे किंवा नाहीं हें अजून ठरावयाचें आहे. त्या ठिकाणीं खऱ्या लोकशाहीची स्थापना होऊन पोलादी पडदा दूर झाला म्हणजे कालांतरानें तें ठरणार आहे. आशिया, चीनमध्येंहि तीच स्थिति आहे. उघडया गाडींतून हिंडणारे नेहरू तेथें गेले तेव्हां पहिल्यांदाच या देशाचे नेते त्यांचेबरोबर उघडया गाडींतून फिरले. आफ्रिका खंडाबद्दल तर बोलायलाच नको. ऑस्ट्रेलिया खंडहि राखीव कुरणच आहे. अशा परिस्थितींत भारताला स्वराज्य मिळाल्यानंतर जातीयवादामुळें जी भयंकर परिस्थिति येथें निर्माण झाली, तिचा उपशम होतो न होतो तोंच साम्यवादी समाजरचनेच्या स्थापनेच्या निमित्तानें आणखी एक आगडोंब पेटण्याचीं लक्षणें दिसूं लागलीं होतीं. हैद्राबाद संस्थानामध्यें तेलंगण विभागामध्यें कम्युनिस्टांनीं पीडित जनतेची बाजू घेऊन जी बंडाळी किंवा लढा सुरू केला होता, तो हैद्राबादराज्य भारतानें जिंकल्यानंतरहि कमी झाला नाहीं आणि सरकारचाच कम्युनिस्टांशीं विरोध निर्माण झाल्यानें सरकारनें सर्व शक्तीनिशीं ती चळवळ दडपून टाकण्याचें ठरविलें.

कम्युनिस्टांची चळवळ सरकार दडपून टाकूं शकेल असें घटकाभर मानलें तरी आर्थिक शोषण नष्ट होत नव्हतें आणि जनतेचे हाल थांबत नव्हते. कम्युनिस्टांचा बंडाळीचा मार्ग ज्यांना पसंत नव्हता, त्यांना लोकशाही मार्गानें दुसरा एखादा पक्ष निवडूनहि देऊन हा प्रश्न सुटेल असें वाटत नव्हतें. श्री. यदुनाथ थत्ते

यांनीं आपल्या ' विनोबा भावे ' या पुस्तकांत या परिस्थितीचें समर्पक वर्णन पुढील शब्दांत केलें आहे. " ज्या जमिनीच्या मालकीमुळें देशांतील कोट्यवधि शेतमजूर व अपुरी शेती असलेले शेतकरी पिळले जात होते, ती मालकी कशी नाहींशी करावी हें कोणाला सुचत नव्हतें. शांतता टिकवायला जावें तर उघडया डोळ्यांनीं अन्याय पहात बसावें लागतें. वाटेल तें साधन वापरावें तर ध्येयच हातून जातें, अशी परिस्थिति झाली होती. " जमीनदारी नष्ट करण्याचे कायदे करून किंवा केवळ जमीनदारांचे खून करून आणि त्यांच्या जमिनी हिसकावून घेऊनहि त्यांचा हा प्रश्न सुटणारा नव्हता. कोट्यवधि शेतमजुरांचें काय करावयाचें, त्यांना काम कसें पुरवावयाचें हा प्रश्न राष्ट्रीय नियोजकांनाहि सुटत नव्हता; किंबहुना कोणालाच कांहींच सुचत नव्हतें.

स्वातंत्र्य प्राप्त झालें म्हणजे सर्वच प्रश्न सुटतील असें लोकांना वाटत होतें. तें मिळेपर्यंत परकीय सत्तेविरुद्ध लढावयाची भावना असल्यानें लोकांत एक प्रकारचा चेव होता आणि विरोधाला धार होती. त्या वेळीं लोकाग्रणी हे सेनानी तर जनता ही सैनिक होती. स्वराज्यप्राप्तीनंतर मात्र लोकाग्रणी हेच राज्यकर्ते झाले, जनतेऐवजीं नोकरशाही आणि पोलिस हे त्यांचे अनुयायी बनले आणि जनता मात्र अलग पडली. मूठभर पुढारीच सत्ताधारी बनले. कांहीं थोड्यांना अन्य कांहीं लाभ झाले. ब्रिटिश भांडवल-शाहीऐवजीं देशी भांडवलशाही आली; पण बहुजनांचे प्रश्न व गांजणूक मात्र कायमच राहिली. लोकांकरितां कांहींतरी करीत आहोंत असें दाखविण्याकरितां शेंकडों कायदेकानूंचें मायाजाल निर्माण करण्यांत आलें; पण त्यापासून सुख लागण्याऐवजीं

दैनंदिन जीवनांत अविश्वास, महर्गता आणि जिकीर निर्माण झाली. जे पूर्वींच्या आश्वासनांचा विचार करून तक्रार करूं लागले, त्यांच्यांतील दुबळ्यांना विधायक कार्याचा संदेश देऊन आणि कडव्यांना जातीय किंवा कम्युनिस्ट म्हणून त्यांची वासलात लावण्यांत येऊं लागली.

अशा स्थितींत हैद्राबाद संस्थानांत असंतोषाला एकदम तोंड फुटलें. एका बाजूनें रझाकारांनीं उच्छाद मांडला असतांनाच कम्युनिस्टांनीं जमीनदार व कुळें यांच्यांत लढा सुरू केला. प्रथम प्रथम रझाकारांना जमीनदार साथ देतात, तेव्हां तेहि जनतेचे शत्रूच होत असें सांगण्यांत येई. पण रझाकारांचा बींमोड होऊन हैद्राबाद भारतांत सामील झाल्यानंतरहि कम्युनिस्टांचें विध्वंसनाचें कार्य संपेना. जमिनीचा प्रश्न अत्याचाराच्या मार्गानें सोडविण्याचा कम्युनिस्टांचा प्रयत्न, हें भारतीय लोकसत्तेला एक प्रकारचें आव्हानच होतें. हैद्राबादेंत प्रथम जी लष्करी राजवट भारत सरकारनें स्थापन केली, तिनें कम्युनिस्टांची चळवळ सैन्यबळावर दडपून टाकण्याचा प्रयत्न केला. अडाणी लोकांत अंगांत ठाण मांडून बसलेल्या रोगावर भुताटकीची बाधा झाली असें म्हणून पंचाक्षरी मंत्र घालतो व झाडाला झोडपतो; पण भूत मात्र झाड सोडीत नाहीं. कारण तें भूत नसतेंच तर रोग असतो. तशीच स्थिति या जमिनीच्या प्रश्नाबाबत झाली होती. जमिनीचा प्रश्न हा पिढ्यान् पिढ्यांचा जुना रोग आहे व तो हैद्राबादेपुरताच मर्यादित नाहीं, हें लक्षांत घेऊन त्यावरील उपाययोजना केली पाहिजे; हें कोणी ध्यानांत घ्यायलाच तयार नव्हतें. सरकारलाहि नवस्वातंत्र्यामुळें निर्माण झालेल्या अनेक प्रश्नांनीं भंडावून

सोडलेलें, अशा परिस्थितींत बिचारी जनता अगदीं अगतिक झाली होती.

कम्युनिस्टांचा प्रश्न तेलंगणांत खरोखरच फार गंभीर झाला होता. पुंडाई व अत्याचाराच्या मार्गानें जमीनदारांच्या जमिनी हिरावून घेऊन त्या शेतकऱ्यांना वांटून देण्याचा उपक्रम भूमि-हीनांना अत्याचारास प्रवृत्त करीत होता. या पुंडाईत तीन हजार लोकांचे खून पाडण्यांत आले आणि आठ कोटींपेक्षां अधिक संपत्तीचा विध्वंस झाला. कोणतेंहि सरकार असे अत्याचार स्वस्थपणें पाहूं शकणार नाहीं. पण ते दडपून टाकून तरी प्रश्न सुटणार होता का ? कम्युनिस्ट म्हणजे कांहीं कोणी राक्षस नव्हेत. त्यांपैकीं कितीएक खरोखरीच देशभक्तीनें प्रेरित झाले आहेत. ते अशा चळवळीची कांस कां धरतात याचा विचार व्हायला पाहिजे होता. हीच दृष्टि असलेला व कम्युनिस्टांबद्दलहि समभाव राखणारा पुरुष म्हणजेच विनोबा.

◆ ◆ ◆

**गां**धीजींच्या मृत्यूंनतर विनोबांनीं गांधीजींच्या अनेक विधायक कार्यकर्त्यांसमवेत मार्च १९४८ मध्यें सेवाग्राम येथें सर्वोदय समाजाची स्थापना केली. ‘ सर्वेपि सुखिनः सन्तु ’ या तत्त्वाच्या प्रस्थापनेकरितांच कोठलीहि कृत्रिम बंधनें न पत्करणारी आणि विश्वबंधुत्व मानणारी ही संस्था आहे. गांधींच्या मतें सर्वोदय म्हणजे खऱ्या लोकशाहीचें मूर्त स्वरूप होय. या समाजाचें पहिलें सम्मेलन मार्च १९४९ मध्यें मध्य भारतांत झालें. दुसरें १९५० मध्यें ओरिसांत झालें. त्याला विनोबा हजर राहूं शकले नाहींत. तिसरें सम्मेलन हैद्राबाद संस्थानांत १९५१ च्या एप्रिलमध्यें शिवरामपल्ली येथें व्हावयाचें

ठरलें. त्याच्या पूर्वतयारीची सभा एक महिना आधीं सेवाग्राम येथें भरली असतां, आपण सम्मेलनाला येत नसल्याचें विनोबांनीं सांगितलें. अर्थात् सर्व कार्यकर्ते नाराज होऊन "मग सम्मेलन भरवावयाचेंच कशाला?" असा प्रश्न त्यांनीं विचारला. तेव्हां मात्र थोडा विचार करून, "मी सम्मेलनाला येईन एवढेंच नव्हे तर शिवरामपल्लीला वेळेवर पोंचण्यासाठीं परवां सकाळीं म्हणजे ८ मार्चला निघेन; कारण मी पायीं येणार आहें." असें विनोबांनीं सायंप्रार्थनेच्या वेळीं जाहीर केलें. हा त्यांचा निर्णय आनंदाश्चर्याचा धक्का देणारा होता. ८ मार्चला पहांटे आपल्या आश्रमाचा आणि इतर संस्थांचा निरोप घेऊन पांच सहकारी, एक बैलगाडी आणि ती हांकणारा एक हरिजन येवढ्या सरंजामानिशीं हा आजच्या युगांतला ऋषि शिवरामपल्लीस जाण्याकरितां पायीं निघाला. ह्याच पदयात्रेंतून भूदानाची महान् यात्रा सुरू होणार होती. याची जाणीव कदाचित् खुद्द विनोबांनाहि नसावी.

त्यांचें अंतःकरण मात्र आंतून धगधगत होतें आणि बुद्धीला मार्गदर्शनासाठीं चेतवीत होतें. संमेलनांत विनोबांनीं एकंदर पांच भाषणें केलीं आणि कार्यकर्त्यांना विधायक कार्यक्रम दिला. "शारीरिक कष्टानें शेती करा, पैशाच्या विनिमयाशिवाय संस्था चालवायला शिका, खेड्यांच्या सेवेकरितां शांतिसेना स्थापा, सूत कांता, सफाईचें काम अंगावर घेऊन भंग्यांचा व्यवसायच नष्ट करा आणि एकंदरींत जीवन अधिकाधिक विशुद्ध करा" हें त्यांच्या उपदेशाचें सार होतें.

एका व्याख्यानांत अन्नधान्य-परिस्थितीबद्दल बोलतांना त्यांनीं तीन सूचना केल्या. 'शेतमजुरांना त्यांची मजुरी धान्यरूपानेंच

द्यावी, शेतसारा धान्यरूपानेंच वसूल करावा आणि खादी-निर्मितीचें काम स्वतः सरकारनें पत्करावें. कारण भारतांत माणशीं कमींत कमी सोळा वार कापड लागतें, तेथें गिरण्यांची पैदास फक्त अकरा वारच होते.'

आर्थिक समतेबद्दल बोलतांना ते म्हणाले कीं, 'आपण गेलीं कित्येक शतकें दयाळूपणाचा गुण संवर्धित करीत आहोंत. दयाळूपणानें वागणें हें आपण कर्तव्य मानतों आणि ब्रह्मप्राप्ति म्हणजेच समत्व बुद्धि हें आपण ध्येय मानतों. ज्याला ब्रह्मप्राप्ति झाली तो मुक्त झाला आणि जो मुक्त झाला त्याच्या ठिकाणीं समत्वबुद्धि निर्माण होतेच होते. आजच्या युगांत समानता हा परवलीचा शब्द झालेला आहे; पण ही समानता आपण जबर-दस्तीनें लादणार असलों तर त्यांत अनेक वर्षें मिळविलेल्या दयाशीलता या गुणाची हानि होणार आहे, ती आपण होऊं देतां कामा नये. समानता साधण्याकरितां धिसाडघाईहि करून उपयोगी नाहीं. सूर्य येवढा प्रतापी, तो स्वतः सारखा जळत असतो; तेव्हां कुठें आपल्याला ९८° उष्णता मिळत असते. तर मग ज्यांना सर्वांच्या समानतेची तळमळ लागलेली आहे; त्या कार्यकर्त्यांनीं किती बरें त्याग करायला पाहिजे ? आणि ही गोष्ट नुसत्या उतावळेपणानें होणार आहे काय ?'

शेवटच्या दिवशीं त्यांनीं विधायक कार्यकर्त्यांनीं राजकारणांत किती मर्यादेपर्यंत भाग घ्यावा याचेंहि थोडक्यांत दिग्दर्शन केलें. ते म्हणाले, 'ईश्वराला आपण अशी प्रार्थना केली पाहिजे कीं, देवा, माझा मार्ग मला ठरवूं दे; आणि त्याच्या बरेवाईटपणाचें ओझें दुसऱ्या कोणावरहि पडूं नये.' ते पुढें म्हणाले कीं, 'जें स्वातंत्र्य आपल्याला हवें, तें आपण बहुजनसमाजालाहि दिलें

पाहिजे. त्यांना आपण फक्त शिक्षणदान करावयाचें आहे. पण कृति मात्र त्यांनीं स्वतःच्या बुद्धीनें करावयाची आहे.' गांधीजी होते तोंपर्यंत विनोबा आपल्या मर्यादित कार्यक्षेत्रांत मग्न होते. पण त्यांच्यावर जबाबदारी पडतांच तीहि त्यांनीं कर्तव्यबुद्धीनें पत्करली आणि निर्भयपणें व स्पष्टपणें कार्यकर्त्यांना मार्गदर्शनहि केलें. 'अंतःशुद्धि, बहिर्शुद्धि, श्रमःशांति समर्पण' हें त्यांच्या उपदेशाचें थोडक्यांत सार आहे.

पण या चार दिवसांतहि त्यांचें मन मात्र कांहीसें व्यग्र दिसत होतें. कारण शेवटच्या दिवशीं स्वतःच्या पुढील कार्यक्रमाविषयीं बोलतांना ते येवढेंच म्हणाले कीं, 'वर्ध्याला परत जातांना कम्युनिस्टांची चळवळ असलेल्या प्रांतांत जाऊन तिथल्या परिस्थितीचें प्रत्यक्ष निरीक्षण करावें असा माझा बेत आहे.' पण तरीदेखील अवघ्या एक आठवड्यानंतर ते एका मोठ्या क्रांतिकारक पण अहिंसात्मक आंदोलनाची सुरुवात करणार आहेत याची कोणालाहि कल्पना नव्हती.

१५ एप्रिल १९५१ ला रामनवमी होती. त्या दिवशीं विनोबांनीं हैद्राबादेच्या तुरुंगांत कम्युनिस्ट कैद्यांची दोन तास भेट घेतली आणि सायंकाळीं प्रार्थना-सभेंत सांगितलें कीं, "मी सर्वोदय समाजाचा सेवक आहे हें आपण जाणतांच. सर्वोदयाचें नांव हें मला परमेश्वराच्या नांवाइतकेंच पूज्य व प्रिय आहे. सर्वोदयामध्यें सर्वांविषयीं काळजी आहे. मला कम्युनिस्ट मित्रांविषयींहि काळजी वाटते.....प्रत्येकजण स्वतःकडे ज्या दृष्टीनें पाहातो त्याच दृष्टीनें मीहि त्यांच्याकडे पाहिलें पाहिजे. स्वतःच्या दृष्टीनें इतरांकडे पाहणें म्हणजे न पाहाण्यासारखेंच आहे. त्या त्या

माणसाची स्वतःकडे पाहण्याची जी दृष्टि असते ती ओळखून त्याच्याशीं एकरूप होऊन विचार करण्याची दृष्टि हीच खरी दृष्टि होय." विनोबांची बुद्धि ही किती स्वच्छ व पक्षातीत आहे तें त्यांच्या पुढील उद्गारांवरून दिसेल. तेलंगणांतील भयंकर परिस्थिति पाहून ते म्हणाले, "अहिंसेवर माझी अविचल श्रद्धा असल्यामुळेंच मी त्या ठिकाणीं काम करीत राहिलों; नाहींतर मी कम्युनिस्टांमध्यें सामील झालों आहें असें दिसलें असतें." या उद्गारांवरून तेलंगणांतील परिस्थितीची भयानकता तर कळतेच, पण विनोबा हे रागद्वेषादींच्या पलीकडे गेलेले खरेखुरे संत आहेत याचीहि प्रचीति पटते. या निमित्तानें त्यांच्या लहानपणच्या एका प्रसंगाची आठवण होते. बडोद्याच्या लायब्ररींत बसून इतिहासाचें अध्ययन करीत असतां त्यांनीं एक दिवस सहज संतांची यादी तयार केली. त्या यादींत एकहि कोंकणस्थ संत नाहीं असें त्यांना आढळून आलें. आणि एक तऱ्हेनें हा इतिहास अपूर्ण आहे; तेव्हां त्यांच्या तोंडून उद्गार निघाले कीं, "तो इतिहास मी संत बनून पूर्ण करीन." लहानपणचे ते उद्गार आज त्यांच्या ध्यानांतहि नसतील, पण ते त्यांनीं निःसंशय खरे केले आहेत.

वास्तविक पाहतां विनोबा हैद्राबादेंतील जातीय तेढ कमी करण्याच्या हेतूनें पदयात्रा करण्यास निघाले होते; पण नंतर तेलंगणाच्या ज्वलंत प्रश्नानें त्यांचें लक्ष वेधून घेतलें व त्या निमित्तानें भूदान आंदोलनास सुरुवात होऊन गेल्या सहा वर्षांत भूदानाच्या गंगोत्रीला गंगेच्या विशाल पात्राचें स्वरूप प्राप्त झालें आहे.

या आंदोलनापूर्वी तेलंगणांतील परिस्थिति अत्यंत दाहक झाली होती. तेलंगणांत सामान्यपणें महबूबनगर, निजामाबाद,

करीमनगर, नलगोंडा आणि वरंगळ या पांच जिल्ह्यांचा समावेश होतो. त्यांची भाषा तेलगू आहे. गेलीं कित्येक शतकें येथें सरंजामशाही राज्यपद्धति चालू होती. मूठभर धनिक जमीनदार आणि बाकी सर्व अन्नाला मोताद झालेले मजूर असा प्रकार होता. आणि या दोन वर्गांमधील अंतर सारखें वाढतच होतें. कांहीं वर्षांपूर्वीं साम्यवादी तत्त्वज्ञानानें भारावलेल्या कांहीं तरुणांनीं येथें विध्वंसाची धमाल उडवून दिली होती. वेळप्रसंगीं जमीनदारांचे खून करूनहि त्यांच्या जमिनी हिसकावून घेण्याचे प्रयत्न झाले होते. ब्रिटिश राजवट संपल्यानंतर भारत सरकार आणि निजाम ह्यांच्या सत्तास्पर्धेचा पोलीस-कारवाईनें निकाल लागे-पर्यंतच्या काळांत कम्युनिस्टांनीं आपल्या तत्त्वज्ञानाच्या प्रचारानें लोकांचीं मनें भारून टाकलीं आणि भयानक विध्वंसाला सुरुवात केली. भारत सरकारनें हैद्राबाद ताब्यांत घेतांच कम्युनिस्टांवर धाड घालून त्यांची चळवळ चिरडून टाकण्याचा प्रयत्न केला. कम्युनिस्टांचीं नांवें सांगण्याबद्दल दिवसा पोलीस छळीत आणि नांवें सांगितल्याच्या खऱ्या वा खोट्या संशयावरून रात्रीं कम्युनिस्ट कांटा काढीत आणि या दोघांच्या रगाड्यांत कितीतरी निरपराध लोक भरडले गेले. चिमुटभर सुक्यांबरोबर ढीगभर ओलें जळालें. त्यामुळें सबंध तेलंगणांत वातावरण अत्यंत भीतिग्रस्त झालें आणि लक्षावधि लोक धास्तीनें दीनवाणे झाले. या लोकांच्या दैन्याचें अवलोकन करण्याकरितां पवनारचा संत रामनवमीच्या दिवशीं रामरायाचें स्मरण करून शिवरामपल्लीहून पदयात्रेला निघाला.

मिरयालगुडा या गांवीं विनोबांनीं प्रार्थनेनंतरच्या भाषणांत म्हटलें, "या गांवांत कांहीं लोकांजवळ हजारों एकर जमीन आहे, तर कांहींच्या जवळ एक एकरसुद्धां नाहीं." बालापाली

या गांवीं ते म्हणाले, " या खेड्याची लोकसंख्या तीन हजार असून येथें तीन हजार एकर शेतजमीन आहे; पण ही सर्व जमीन फक्त ९० कुटुंबांच्या मालकीची असून सहाशें कुटुंबें भूमिहीन आहेत. येथें एकहि ग्रामीण धंदा नाहीं. लोकांना विणण्यासाठीं पुरेसें सूतहि मिळत नाहीं. जमिनीची न्याय्य फेरवांटणी आणि ग्रामीण धंद्याची प्रमाणबद्ध वाढ केली तरच यांतून मार्ग निघेल. लोकांनींहि भुइमूग आणि तंबाखू यांसारखीं पैसे देणारीं पिकें काढण्यापेक्षां आपलें गांव स्वावलंबी होण्याइतकें अन्नधान्य आणि कापूस येथें पिकवला पाहिजे, तरच तरणोपाय आहे." या उद्गारांत तेलंगणाच्या प्रश्नाचेंच नव्हे, तर भारतांतील लक्षावधि खेड्यांच्या दैन्याच्या कारणाचें विनोबांनीं समर्पक शब्दांत दर्शन घडविलें आहे, असें म्हणावयास हरकत नाहीं.

सूर्यपेठ येथें ते म्हणाले, " कम्युनिस्टांच्या निर्मितीची जबाबदारी श्रीमंतांची आहे; पण हा प्रश्न पोलिस आणि सैनिक यांच्या बळावर निकालांत निघणार नाहीं. त्याच्या मुळाशींच गेलें पाहिजे. जमिनींची अन्याय्य वांटणी शांततेच्या मार्गानें नाहींशी करणें हाच त्यावर उपाय." १७ मार्चला पोचमपल्ली या अवघ्या सातशें घरांच्या आणि तीन हजार वस्तीच्या छोट्या गांवांत ते आले. सकाळीं ते हरिजन वस्तीसह सर्व गांवांत फिरून आले. हरिजनवस्तींत बरेच लोक त्यांच्याभोंवतीं जमले आणि त्यांना आपल्या दुःखाची कहाणी सांगूं लागले. विनोबांनीं त्यांना दुपारीं आपल्या मुक्कामावर बोलावलें. दुपारीं ते वामकुक्षी संपवून उठतांच पुष्कळसे हरिजन आणि कुतूहलानें कांहीं इतरहि नागरिक जमा झालेले त्यांना दिसले. विनोबांनीं त्या हरिजनांना प्रश्न विचारला कीं, "काय केलें असतां तुमच्या दैन्यावर

न्याय होईल.'' त्यावर 'आम्हांला कसायला जमीन द्या' असें ते म्हणाले. 'तुम्हांला किती जमीन लागेल?' असें विनोबांनीं विचारलें. त्यावर चटकन् उत्तर मिळेना. बऱ्याच वेळानें इतरांशीं विचारविनिमय करून एकजण म्हणाला, 'ऐशीं एकर पुरे होईल असें वाटतें.'' त्यावर 'तुम्ही लेखी अर्ज द्या म्हणजे मी प्रयत्न करतों' असें विनोबांनीं आश्वासन दिलें खरें; पण त्याच क्षणापासून त्यांच्या विचारचक्राला गति मिळाली. त्यांनीं कांहीं-काळ विचार केला आणि मग एकदम विचारलें कीं, 'येथें बसलेल्यांपैकीं कोणी जमीनमालक आहेत काय?' होकारार्थी उत्तर मिळतांच ते आपणांशींच पण मोठ्यानें म्हणाले, 'समजा, सरकारनें जमीन न दिली किंवा सरकारकडून ती मिळावयाला वेळ लागला तर खेडुतांना आपसांतच कांहीं करतां येणार नाहीं काय? एखादा जमीनमालक जमिनीचीच देणगी—भूदान-द्यायला तयार होणार नाहीं काय?'

कांहीं काल स्तब्धतेंत गेला. पण लगेच एक मनुष्य उठला आणि म्हणाला, 'मी माझी शंभर एकर जमीन देणगी म्हणून देतों.' सगळ्यांनाच एक गोड धक्का बसला. विनोबाहि त्या माणसाकडे रोखून बघूं लागले व म्हणाले, 'तूं जें म्हणालास त्याचा पुनरुच्चार कर.' निश्चयी आवाजांत श्री. रेड्डी—त्या दात्याचें नांव—म्हणाले, 'मी शंभर एकर जमीन देत आहें आणि आत्तां इथें तसा लेख लिहून द्यावयास तयार आहें.' विनोबांनीं ती सभा बरखास्त केली आणि श्री. रेड्डींना बाजूला घेऊन स्वतःची पुन्हा एकदां खातरजमा करून घेतली. संध्याकाळच्या प्रार्थनेनंतरच्या सभेंत त्यांनीं त्या दिवसाची एकंदर घटना पुन्हां सांगून श्री. रेड्डींची सर्वांशीं ओळख करून दिली.

सारा दिवस मोठा विलक्षण गेला होता; पण म्हणूनच ती सारी रात्र विनोबांना झोंप आली नाहीं. दिवसा घडलेला प्रसंग त्यांच्या मनःश्चक्षूंसमोर पुनःपुन्हा नाचत होता. त्यांनीं सारी रात्र भगवंताच्या प्रार्थनेंत व्यतीत केली. मग मात्र जरा त्यांना शांत वाटूं लागलें. ज्या ईश्वरी कार्यांत आपण एक साधन व्हावें असें त्यांना वाटत होतें, तें साधन होण्याचा बहुमान त्यांना मिळाला होता. त्यांची तपश्चर्या आज फळाला आली होती. नामदेवानें अर्पण केलेला नैवेद्य आज देवानें ग्रहण केला होता. आजपासून हा नामदेव देवाचा झाला होता.

दुसरे दिवशीं म्हणजे अठरा एप्रिलला सकाळीं पुढील गांवीं जाण्यास निघण्यापूर्वीं त्यांनीं श्री. रेड्डींना पुन्हां बोलाविलें आणि 'निश्चय अढळ आहे ना?' असें पुन्हां एकदां विचारलें. रेड्डींनीं मुळीं त्यांच्या हातांत भूदानाचा लेखच दिला. त्या दिवसापासून भूदानाची गंगोत्री वाहूं लागली. त्या दिवशीं पुढच्या गांवांत त्यांना आणखी एक दाता मिळाला. त्याबरोबर 'हें देवाचें देणें आहे' हा विनोबांचा विश्वास दुणावला. भगवान् बुद्धानंतर ईश्वराचा आणखी एक प्रेषित वेगळ्या प्रकारानें धर्मचक्र प्रवर्तन करूं लागला.

विनोबा तेलंगणांत २॥ महिने फिरले आणि त्यांनीं अहिंसेच्या मार्गानें अत्याचारी मार्गापेक्षांहि अधिक जमीन मिळूं शकतें हें सिद्ध करून दाखविलें. कम्युनिस्टांना अवघी तीस हजार एकर जमीन जबरदस्तीच्या मार्गानें मिळूं शकली. तीहि सरकारनें पुढें ज्याची त्यास परत केली. उलट विनोबांना मिळालेली जमीन अंतःस्फूर्तीनें मिळालेली असल्यामुळें तिचें वांटप सुकर होत होतें. तिच्या फेरवांटणीनें आणि त्यामागील

भावनेनें देणारा आणि घेणारा दोघेहि धन्यता मानीत होते. सप्टेंबर १९५१ मध्यें नेहरूंच्या निमंत्रणावरून विनोबा दिल्लीला गेले तेहि पायींच. दिल्लीला पोचेपर्यंतच वाटेंत त्यांना हजारों एकर जमीन मिळाली. दिल्लीहून थेट ते उत्तर प्रदेशांत गेले. वर्षभराच्या अवधींत त्यांना त्या प्रदेशांत ३॥ लाख एकर जमीन मिळाली. नंतर दोन वर्षें बिहारमध्यें पदयात्रा झाली. तेथें सुमारें २१ लाख एकर जमीन व पंधरा संपूर्ण गांवें मिळालीं. १९५२ मध्यें सेवापूर येथें सर्वोदय समाजानें दोन वर्षांत पंचवीस लाख एकर जमीन साऱ्या देशांतून मिळविण्याचा संकल्प सोडला. १९५४ च्या एप्रिल महिन्यांत बोधगया येथील संमेलनापर्यंत तेहतीस लाख एकर जमीन मिळाली. याचा अर्थ मात्र प्रत्येक प्रांतानें आपला संकल्प पुरा केला, असें नाहीं. संकल्पपूर्तीसाठीं लागणारें चैतन्यबळ या चळवळींत कमी पडतें, हें पाहून बोधगया संमेलनांत जयप्रकाश नारायणांनीं आपलें जीवनच या कार्याला अर्पण केलें आणि मग 'जीवनदानाची' प्रथा सुरू झाली. विनोबांपासून सामान्य कार्यकर्त्यांपर्यंत आठशें लोकांनीं आपलें जीवन दान केलें. त्याचप्रमाणें या सम्मेलनानें ताबडतोब फेर-वांटप करण्याचा निर्णय घेतला. ज्याला नवीन जमीन मिळाली त्याच्या मदतीसाठीं संपत्तिदान व श्रमदान मिळविण्याचें पूरक आंदोलनहि सुरू झालें. या आंदोलनाची प्रगति सुरुवातीस अत्यंत मंद होती. 'या वेगानें ही चळवळ चालल्यास जमिनीची समस्या सुटण्यास चारशें वर्षें लागतील' असें राममोहन लोहिया एकदां म्हणाले व नंतर लाख लाख एकर जमीन एकदम मिळूं लागली. तेव्हां असें वाटलें कीं, १९५७ पर्यंत पांच कोट एकर जमीन मिळवायचा विनोबांचा संकल्प खास

पुरा होणार. पण बिहारची यात्रा संपल्यानंतर आतां पुन्हा संकल्पपूर्तीबद्दल शंका उत्पन्न होऊं लागली आहे. आतांपर्यंत फक्त चाळीस लाख एकर जमीन मिळाली असून त्यांतली पंचवीस लाख एकर बिहारमधून, साडेपांच लाख उत्तरप्रदेशांतून व साडेतीन लाख एकर जमीन राजस्थानांतून मिळालेली आहे. यापैकीं बहुतेक सर्व जमीन मोठ्या जमीनदारांकडून मिळाली आहे. या आंदोलनावर आक्षेप घेणारांचा प्रश्न लहान जमीन-मालकांची जमीन हें उत्पन्नाचें पूरक साधन असणारांची स्थिति काय होईल हा आहे. अशा लोकांकडून तत्त्व मान्य असूनहि जमीन दिली जाणें शक्य नाहीं. कारण जमिनीचें उत्पन्न त्यांनीं सोडलें तर त्यांच्या नोकरीवर किंवा उद्योगधंद्यांवर त्यांचा उदरनिर्वाह होत नाहीं. जोंपर्यंत सरकार कामाची आणि जेवणाची तसेंच इतर कमींतकमी गरजा भागविण्याची शाश्वति देऊं शकत नाहीं, तर केवळ निरनिराळे विवेकशून्य प्रयोग करीत राहतें; तोंपर्यंत ज्यांनीं अडीअडचणीला उपयोगीं पडणारें साधन म्हणून पै-पैसा वांचवून जमीन खरेदिली आहे किंवा संभाळली आहे, ते जमीन देतांना खळखळ करणारच; शिवाय ज्यांना आज जमीन दिली जाते त्यांच्याकडून ती उद्यां अन्य कोणाला देण्याकरितां परत घेण्याची वेळ आली, तर काय परिणाम होतील याचा विचार गंभीरपणें झाला पाहिजे.

विनोबांना मात्र या बाबतींत पूर्ण आत्मविश्वास वाटतो. जमिनीचें फेरवांटप करणें ही क्रांति आहे हें त्यांना मान्य आहे; पण ही क्रांति एकमेकांबद्दलचा विश्वास आणि प्रेम जागृत केल्यास अहिंसेच्या मार्गानेंहि होऊं शकेल. ‘ हिंदुस्थानांत तीस कोटि एकरांच्या आसपास जमीन आहे. प्रत्येक कुटुंबांत सरासरी

पांच भाऊ असतात. दरिद्रीनारायण हा सहावा भाऊ. त्याचा हिस्सा म्हणून ही पांच कोटी एकर जमीन हस्तांतरित झाली पाहिजे.' अर्थात् विनोबांच्या मतानें संपूर्ण क्रांतीच्या मार्गावरील हा एक टप्पा आहे. हवा आणि पाणी हें जसें कोणा एकाचें नव्हे, त्यावर स्वामित्व ईश्वराचें आणि म्हणूनच तें कोणालाहि गरजेप्रमाणें उपभोगतां येतें, तीच स्थिति जमिनीबाबत झाली पाहिजे. भूदान यज्ञाचें उद्दिष्ट कसेंहि करून, अज्ञानाचा फायदा घेऊन किंवा दडपणानें जमीन मिळविणें हें नसून साम्ययोग व सर्वोदय-वृत्ति त्या योगानें निर्माण करणें हें आहे. 'सब भूमि गोपालकी' ही भावना अंतीं निर्माण झाली पाहिजे.

आणि या ठिकाणीं खरा धोका आहे. कारण वर म्हटल्याप्रमाणें एकदां आपली झालेली जमीन उद्यां आपल्याला गरज नाहीं म्हणून दुसऱ्याला द्यायची वेळ आली, तर जमीन घेतांना दीनवाणा असलेला शेतकरी जमीन देतांना रुद्रावतार धारण करणारच नाहीं ह्याची ग्वाही कोणी द्यावी? आगगाडींत शिरतांना इतरांना गयावया करून भाई म्हणणारा आणि गाडी सर्वांचीच आहे, सर्वांनीच थोडी फार गैरसोय सोसली पाहिजे; असें तत्त्वज्ञान सांगणारा माणूस त्याला ऐसपैस जागा मिळतांच कसा सुलतान बनतो हें आपण पहातोंच. रशियांतसुद्धां हा प्रश्न निर्माण झाला होता आणि त्यापायीं तिथें कितीतरी रक्त सांडावें लागलें. विनोबांची ग्रामराज्याची कल्पना वेळींच लोकांच्या मनांत रुजली तर मात्र भूदान निश्चित यशस्वी होईल. त्या कल्पनेंत जमीन ही गांवाच्या मालकीची म्हणजेच अंतीं राष्ट्राची आणि गांवांतले पंच हे तिचे कार्यकारी विश्वस्त ही कल्पना रुजायला फार वेळ लागेल आणि तोंवर मध्यम वर्गाच्या हातचें

उत्पन्नाचें लहानसें साधन मात्र जाईल अशी अनेकांना भीति वाटते. अर्थातच पुढें काय होईल कोणीं सांगावें ? जगानें आजपर्यंत अनेक द्रष्टे आणि प्रेषित पचविले आहेत, तीच गोष्ट भारताची. मंत्रद्रष्टे निघून जातात आणि उभें किंवा आडवें गंध, नाकाला फडकें आणि गाईच्या शेपटीला हात लावून नमस्कार, येवढा आचारधर्म आणि वेळप्रसंगीं त्यापायीं डोकीं फोडण्यापर्यंत मजल नेणें इतकें मात्र शिल्लक उरतें. उद्यां भूदानाच्या चळवळीचें असेंच कांहीं तिरपगडें झालें तर तो दोष विनोबांचा किंवा त्यांच्या तत्त्वज्ञानाचा म्हणतां येणार नाहीं. उलट, असेंहि म्हटलें पाहिजे कीं, जर सरकारनें भूमिदान कार्यकर्त्यांच्या सल्लामसलतीनें वेळोवेळीं योग्य कायदे करून त्यांना साथ केली नाहीं किंवा जनताच एकंदर उदासीन राहिली आणि हें कार्य फसलें, तर त्याचे परिणाम मात्र भयानक झाल्याशिवाय राहणार नाहींत. विनोबांच्या या सात्त्विक प्रयोगाच्या यशांत भागीदार व्हायचें, कीं तो उधळून लावून पुन्हा पाशवी शक्ति मोकाट सुटूं द्यायच्या हें आपणच ठरवायचें आहे. तात्यासाहेब केळकरांनीं दिलेला एक दृष्टांत पुन्हा देऊन असें म्हणतां येईल कीं, देवता प्रसन्न होऊन प्रसादाचा नारळ द्यायला लागली असतां भक्त जर फाटकें उपरणें घेऊन तो प्रसाद घेऊं लागला आणि तो प्रसाद खालीं पडून वायां गेला, तर देवतेला किंवा प्रसादाला दोष न देतां त्या भक्ताच्या फाटक्या कर्मालाच द्यावा लागेल.

विनोबांना अनेक लोक विचारतात, "तुमच्या हातून हें कार्य पुरें झालें नाहीं तर?" विनोबा म्हणतात, "तर मग परमेश्वर आणखी कोणाला तरी प्रेरणा देईल. प्रेरणा देणारा तर तोच आहे. गांधीजींनंतर तो मला भूदानाची प्रेरणा देईल हें

कुठें कोणाला माहीत होतें. परंतु परमेश्वराला एखादें काम करायचें असलें म्हणजे तो कोणाला ना कोणाला प्रेरणा देतच असतो." ते स्वतः निरहंकारी असल्यामुळें त्यांना काम अपुरें राहण्याची भीतीच वाटत नाहीं. ते म्हणतात, "मी परमेश्वराच्या आज्ञेनें हें काम करीत आहें. ज्या दिवशीं तो मला बोलावील त्या दिवशीं मी येथून चालता होईन." त्यांचेजवळ अहंकार नाहीं, याचा अर्थ त्यांचें मनांत न्यूनगंड आहे असाहि नाहीं. 'तुम्ही श्रीमंतांच्या-कडेच कां उतरता?' असें त्यांना जेव्हां एकानें विचारलें, तेव्हां ते म्हणाले, "अग्नि आणि हवेचा प्रत्येक घरांत प्रवेश होऊं शकतो तर माझा कां नाहीं होऊं शकत? अग्नि कुठेंहि गेला तरी जाळण्याचेंच काम करतो. मग मीदेखील श्रीमंतांच्या घरांत शिरून त्यांच्या घरांना आग लावली तर त्यांत बिघडलें कुठें?" या विचाराचें अधिक स्पष्टीकरण करतांना निर्मला देशपांडे म्हणतात, "विनोबांचा प्रवेश जिथें होईल तिथें खरोखरच आग लागल्यावांचून रहात नाहीं. घरमालक भूमिदान देतो. घरांतील स्त्रियांना पडदा पाळल्याबद्दल कडक शब्द ऐकावे लागतात आणि मुलांना क्रांतिकारक विचारांची दीक्षा मिळते. घरांत सारें विनोबा-साहित्य प्रवेश करतें, चरखा प्रवेश करतो. विनोबांच्या यात्री-दलांतील सर्व जातींच्या, सर्व प्रांतांच्या मंडळींमुळें व त्यांना भेटायला येणाऱ्या सर्व लहानथोर लोकांमुळें त्या घरांत समानतेचा एक धडाच शिकविला जातो. अस्पृश्यता व जातिभेद नाहींसे करण्याचें प्रात्यक्षिक दाखविलें जातें."

विनोबांच्या मतानें जमिनीच्या फेरवांटणीचें काम तीन प्रकारांनीं होऊं शकतें. वामनावतारांत तें 'करुणेनें' होतें, परशुरामावतारांत 'कत्ल' किंवा 'हिंसेनें' होतें आणि रामावतारांत तें 'कानून'

म्हणजे कायद्यानें होतें. यांपैकीं वामनावतार उत्तम, रामावतार मध्यम आणि परशुरामावतार मात्र निकृष्ट कारण तो अपयशी आहे.

कम्युनिस्टांच्या चळवळीमुळेंच विनोबांना भूदान-आंदोलनाची स्फूर्ति झाली. वैषम्य चीड निर्माण करते आणि त्या चिडींतूनच साम्यवादाचा उद्‌भव होतो हें त्यांना माहीत आहे. पण वैषम्य नष्ट करण्याचा मार्ग विध्वंस हा खास नव्हे, याबद्दलहि त्यांची निश्चिती आहे. बकसार येथें विनोबा पोंचले तेव्हां त्या ठिकाणीं कम्युनिस्टांनीं प्रकाशित केलेल्या एका पुस्तिकेंत त्यांना, 'भांडवल-दार व जमीनदारांचे' हस्तक म्हटल्याचें आढळलें. प्रार्थनासभेंतहि कम्युनिस्टांनीं त्यांना अनेक प्रश्न विचारले. त्या प्रश्नांचीं उत्तरेंहि विनोबांनीं स्पष्ट पण स्वतःच्या थोरवीला साजेशींच दिलीं. "कम्युनिस्ट हे पुस्तकपूजक आहेत व मार्क्सला वेदवाक्याप्रमाणें प्रमाण मानतात. त्यामुळें वेगानें बदलणाऱ्या या काळांत ते प्रतिगामी ठरतात. या वृत्तीमुळें नवविचार ग्रहण करण्याची शक्ति नाहींशी होते." विनोबांनाहि शोषणहीन व शासनहीन अशा समाजाची स्थापनाच अंतीं अभिप्रेत आहे. पण तें काम त्यांना अहिंसेनें करावयाचें आहे. त्यांना ही क्रांति करावयाची आहे पण ती खास भारतीय तंत्रानें आणि भारतीय तत्त्वज्ञानाला अनुसरून करावयाची आहे. आज ना उद्यां कम्युनिस्टहि आपल्या मार्गावर येतील असा त्यांना विश्वास वाटतो.

कम्युनिस्टांना ते म्हणतात, "तुम्हांला लोकांची जमीन पाहिजे ना! ती माझ्याप्रमाणें दिवसाढवळ्या फिरून मागून घ्या. चोरा-सारखे रात्रीं कां येतां?" उलट कम्युनिस्ट म्हणतात, "विनोबा आजची क्रांति लांबणीवर टाकीत आहेत येवढेंच. आणि त्यांना मिळणारी पुष्कळशी जमीन एकतर कम्युनिस्टांची दहशत अस-

लेल्या भागांतून मिळते किंवा जिथें जमीनच विपुल आहे तिथें मिळते." पण चेस्टर बोल्स—अमेरिकेचे भारताचे वकील १९५१ ते ५३—आपल्या पुस्तकांत म्हणतात कीं, "ही गोष्ट खरी नाहीं. वस्तुस्थिति अशी आहे कीं, उत्तरप्रदेश आणि बिहार यांमध्यें मिळालेल्या जमिनीपैकीं ९०% जमीन ही अत्यंत दाट वस्ती असलेल्या गंगाकांठच्या प्रदेशांतली आहे; आणि या बाजूला अद्याप कम्युनिझम फिरकलेला सुद्धां नाहीं. अवघी पन्नास हजार एकर जमीन कम्युनिस्ट वर्चस्वाखालील प्रदेशांतून मिळालेली आहे." बोल्सच्या म्हणण्याप्रमाणें गांधींच्या मृत्यूनंतर गांधीवादाला अनेक फाटे फुटले होते. नेहरूंचा गांधीवाद वेगळा. गांधींच्या विधायक कार्यकर्त्यांचा वेगळा आणि समाजवाद्यांचाहि तिसराच. पण आतां या दुबळ्या शरीरयष्टीच्या विनोबांमुळें हें सर्व एकत्र येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. जयप्रकाश नारायणसारखा नेहरूंचा राजकीय वारस समजला जाणारा थोर राष्ट्रसेवक कोठलीहि सत्ताभिलाषा न बाळगतां आज विनोबांचा पाईक होऊन राहिलेला आहे. एका खेड्यांत तर त्यांना सबंध खेडेंच भूदानाकरितां मिळालें. याचा अर्थ तेथें फेरवांटणी करतांना कांहींहि अडचण निर्माण होणार नाहीं आणि विनोबांची ग्रामराज्याची कल्पना तेवढयापुरती तरी सफल होईल.

भूदान कार्यकर्त्यांपुढें भाषण करतांना जयप्रकाश एकदां म्हणाले, "आपल्यासमोर घडणारी क्रांति समजून घेऊन आपण तिला हातभार लावला नाहीं, तर साक्षात् देव समोर उभा राहूनहि त्याला न ओळखणाऱ्या दुर्दैवी भक्तासारखी आपली स्थिति होईल." रॉबर्ट ट्रम्बल या पाश्चात्य लेखकानें न्यूयॉर्क टाइम्स मॅगेझिनमध्यें लेख लिहितांना मथळाच मुळीं भूमिवितरण

करणारा परमेश्वर—The God who gives away land—असा दिलेला आहे. आजच्या अणुयुगांत जग भयंकर संहाराच्या गोष्टी बोलत असतांना अवघें ९० पौंड देखील वजन नसलेला एक फकीर—प्रकृति घडधाकट नाहीं, हिंवताप आणि पोटांतील व्रण यांची पीडा चालू असतांना रोज पंधरा मैलाप्रमाणें गांवोगांव हिंडतो आणि "ज्याच्याजवळ पुष्कळ आहे त्यानें, ज्याच्याजवळ कांहीं नाहीं त्याला आपल्याजवळचें थोडेसें द्यावें" असा उपदेश लोकांना करतो आणि मोठमोठे पुढारी आणि राज्यकर्तेंहि त्यांना मान देतात, हें दृश्य परकीयांना चकित करून सोडतें.

आपण स्वतंत्र झालों आहों खरें, पण तें स्वातंत्र्य आपणांस पचवावयाचें आहे. अणुअस्त्रांमुळें संहाराची जी भीति निर्माण झाली आहे, त्यामुळेंच कदाचित् असेल. आज पंडित नेहरूंच्या शांततेच्या प्रयत्नांना यश येण्याची आशा दिसत आहे. या शांततेच्या काळांतच जमिनीचा यक्ष-प्रश्न आपण शांततेनें सोडविला पाहिजे. हें वैषम्य नष्ट करतां आलें तर हळुहळू इतर क्षेत्रांतील विषमताहि दूर करतां येईल. विनोबांची भूदान चळवळ ही शांततेनें आणि समंजसपणानें आपले प्रश्न सोडविण्याची बहुमोल संधि आहे. पण कदाचित् ही अखेरचीच संधि ठरण्याचा संभव आहे. कम्युनिस्टांनीं हेकटपणा आणि दुराग्रह सोडला, सत्ताधिष्ठित कॉंग्रेसवाल्यांनीं श्रेय पदरीं पाडून घेण्याची हांव सोडली आणि सर्वसामान्य जनतेनें सक्रिय पाठिंबा दिला तर जमिनीचा प्रश्न तर सुटेलच, पण ही संधि अखेरची न ठरतां पुढें उत्पन्न होणारे असे प्रश्न प्रेषितांच्या सहाय्या-शिवायहि सोडविण्याचा शहाणपणा जनतेच्या अंगीं हळुहळू येईल. लोकशाही प्रगत आणि यशस्वी होण्याचें हेंच लक्षण आहे.

भूदान-यज्ञकल्पना हें एक तत्त्वज्ञान आहे, तर भूदानयात्रा हें एक जिवंत काव्य आहे. काव्यनिर्मितीच्या वेळीं कवीला आनंद तर होतोच पण मानासिक परिश्रमहि होतात; पण तें काव्य वाचणाराला मात्र निर्भेळ आनंदाचा लाभ होतो. तसेंच भूदान-यात्रेंत भाग घेणारांच्या पायांना गोळे येत असले, चिखल तुड-वितांना आणि विनोबांच्या बरोबरीनें जलद गतीनें चालतांना त्यांच्या नाकीं नऊ येत असले आणि कांट्याकुट्यांतून जातांना पाय हुळहुळे होत असले, तरी भूदान यात्रेचें वर्णन वाच-तांना वाचकालाहि निर्भेळ काव्यानंदाचा लाभ झाल्यावांचून रहात नाहीं. विनोबांच्या पदयात्रेचीं वर्णनें कारणपरत्वें अनेकांनीं केलेलीं आहेत. पण ' विनोबाजींच्या सहवासां ' त ही श्रीमती निर्मला देशपांडे यांची दैनंदिनी वाचीत असतांना आपणांलाहि विनोबांच्या सहवासांत पदयात्रा करीत असल्याचा आनंद होतो. विनोबांच्या बरोबर दूरध्वनिक्षेपक असतो, टाइपरायटर असतो आणि त्यांचीं भाषणें ध्वनिमुद्रित करणारें यंत्रहि असतें. हें जरी खरें असलें तरी निर्मलाबाईंनीं त्यांचे सहजोद्गार पारिजातकाचीं फुलें वेंचावीं तसे हलक्या हातांनीं वेचले आहेत. या फुलांचा सुवास मात्र बकुळीच्या फुलांप्रमाणें दीर्घकाळ टिकणारा आहे.

आश्रमातील कार्यक्रम जसा पहांटे सुरू होतो तशीच विनो-बांची पदयात्राहि पहांटे साडेतीनला प्रार्थना संपल्याबरोबर कंदलाच्या उजेडांत सुरू होते. त्यांच्या बरोबरीचें ' कार्यालय ' जीपमधून, ट्रकमधून किंवा बैलगाडींतून पुढच्या मुक्कामाला जातें. तर एक माणूस कंदील दाखवीत पुढें जात आहे, विनोबा कुणाच्यातरी खांद्यावर हात ठेवून घाईगर्दीनें जात आहेत, यांचे साथी मागोमाग तीच गति संभाळण्याचा प्रयत्न करीत

आहेत, अशी ही पदयात्रा सुरू होते. विनोबांच्या अंगावर एक धोतर, डोक्यावरून लपेटलेली पांढरी शाल, पायांत वहाणा इतकाच त्यांचा पोषाख असतो. नाहीं म्हणायला हातांत मात्र पांढरा शुभ्र रुमाल असतो. चालतांना ते कांहींतरी विनोद करून चालणारांचा श्रमपरिहार करतात किंवा एखाद्या जुन्या वटवृक्षाची अगर सुरेख नांगरलेल्या शेताची कौतुकानें पाहाणी करतात.

रोज दहा बारा मैल मजल मारून ते एखाद्या खेड्यांत मुक्काम करतात. त्यांच्या स्वागतासाठीं आंब्याच्या डहाळ्या लटकावलेल्या कमानी सज्ज असतात. कोणी त्यांना पुष्पहार घालतात, कोणी सुताचे हार घालतात. खेड्यांतल्या मुक्कामांतहि कार्यक्रम ठरलेला असतो. गांवाची पहाणी, सूतकताई, वाचन, पत्रव्यवहार, आलेल्यांना भेटणें यांत दुपारच्या वामकुक्षीलाहि फारशी सवड मिळत नाहीं. प्रार्थना आणि प्रार्थनेनंतरचीं भाषणें होतच असतात. त्यांचें जेवण अगदीं साधें, क्वचित् प्रसंगीं तर नुसतें दहीं आणि मध येवढेंच असतें. दिवसभराच्या परिश्रमानें सगळेच लवकर निद्राधीन होतात. कारण दुसऱ्या दिवशीं पहाटे पुन्हां यात्रा सुरू होणार असते. गांधीजींच्या दांडीयात्रा आणि नौखाली–यात्रा प्रसिद्ध आहेत. त्यांच्या या शिष्योत्तमानेंहि आतांपर्यंत पंधरा हजार मैलांचा पायीं प्रवास केला आहे आणि सोळाशें खेड्यांत मुक्काम केला आहे. उत्तर प्रदेशाच्या यात्रेच्या वेळीं त्यांनीं बनारसला पावसाळ्यांत सलग मुक्काम केला होता. आतां मात्र कोठल्याहि ऋतूंत ते एकदोन दिवसाच्यावर कोठेंच मुक्काम करीत नाहींत. विनोबा म्हणतात, “ माझें जीवन म्हणजे **रैन बसेरू करले डेरा, उठ चलना प्रभात रे**—रात्र झाली, मुक्काम कर; उजाडलें, चल चालूं लाग, असें असतें.”

विनोबा गांवांत शिरले कीं त्यांचें वेगवेगळया तऱ्हेनें स्वागत होतें. कम्युनिस्ट दुरून दुरून काय घडतें तें बघत असतात. कांहीं वेळेला विरोधी-पत्रकें वांटतात, कांहीं वेळां त्यांना प्रश्न विचारून बुद्धिवादांत हरवायचा प्रयत्न करतात. उलट गांवकरी मात्र त्यांचा जयजयकार करतात. कुणी म्हणतात, " गांधींच्या सुपुत्राचा विजय असो ! कुणी म्हणतात, हा परमेश्वरच भूमिदान करावयाला आलेला आहे. " कुणी गात असतात :

**क्षुधार्त विश्व के लिये, जमीन दो, जमीन दो ।**
**नवीन धर्म के लिये, जमीन दो, जमीन दो ॥**

' विनोबा आले म्हटलें कीं सगळेच प्रार्थना करूं लागतात- असा एक विनोदी वाक्प्रचारच सुरू झाला आहे असें चेस्टर बोल्सनें म्हटलें आहे. विनोबांना सगळ्याच गांवांत जाणें शक्य नसतें, तेव्हां विनोबांनीं आपल्या गांवांत यावें म्हणजे भूमि मिळेल अशी कांहीं लोक प्रार्थना करतात, तर विनोबांनीं आपल्या गांवावरून टळावें म्हणजे आपल्याला जमीन द्यावी लागणार नाहीं अशी कांहीं लोक प्रार्थना करीत असतात. विनोबा मात्र या बाबतींत निष्काम कर्मयोगी आहेत. विनोबांची ही वृत्ति पाहिली म्हणजे कुठेंतरी वाचलेल्या दोन ओळींची आठवण होते.

परवाह नहीं चाहे जमाना खिलाफ हो ।
रास्ता वही चलूंगा जो सीधा और साफ हो ॥

कुणीहि बरोबर या, कुणीहि येऊं नका. कुणी जमीन द्या कुणी देऊं नका. काम पुरें होईल किंवा न होईल याची चिंता न करतां उपनिषदांतील सूक्तें म्हणत आणि चित्तशोधन करीत

विनोबा कर्तव्यबुद्धीनें जीवन व्यतीत करीत आहेत. ११ सप्टेंबरच्या एकसष्ठीच्या संदेशांतहि त्यांनीं सांगितलें कीं, "माझी धडपड जमीन मिळविणें ही नसून चित्तशोधन करीत राहणें ही आहे. माझ्या हृदयांतील दौर्बल्य आणि दोष नष्ट होऊन तेथें परमेश्वरानें रहावें हीच माझी धडपड आहे. मी स्वतः शून्यवत् बनावें ही माझी इच्छा आहे. माझ्या धडपडीपेक्षां आणि कष्टापेक्षां परमेश्वराची कृपा अधिक लाभली असेंच मी म्हणत आलों आणि आजहि म्हणतों."

विनोबा अत्यंत बुद्धिवान् असले तरी त्यांचें भावबळ फार मोठें आहे. ते उत्तम गणिती असले आणि जीवनाची आंखणी त्यांनीं अत्यंत हिशेबीपणानें केलेली असली तरी त्यांची विनोदबुद्धि जागृत आहे, निसर्गप्रेम उत्कट आहे आणि गीताईला 'माझी गीताई माउली' म्हणण्याइतकें त्याचें हृदय भक्तिप्रेमानें ओथंबलेलें आहे. त्यांचा पुनर्जन्मावर विश्वास आहे. ते सांगतात, "योगी माणसाची तर गोष्ट सोडूनच द्या. पण सामान्य माणसाला देखील अनेकदां असे अनुभव येतात कीं, ज्या योगें पुनर्जन्माची कल्पना सिद्ध होते." त्यांचाच एक अनुभव असा आहे—"मी पांच वर्षांचा असतांना एका ठिकाणीं जाण्याकरितां आईबरोबर स्टेशनच्या प्लॅटफॉर्मवर बसलों होतों. बसल्याबसल्या मला एक असें दृश्य दिसलें कीं, मीं अशा प्रकारच्या दरवाज्यांतून आंत जाईन, मग एक असें घर असेल, बाजूला असा जिना असेल वगैरे वगैरे. पूर्वीं तें घर मी कधींच पाहिलें नव्हतें. पण प्रत्यक्ष जाऊन पाहतांच आढळलें कीं, मला जसें दृश्य दिसलें होतें तसेंच तें घर होतें. या घटनेवर मी आईला प्रश्न विचारीत असतांना ती म्हणाली कीं, 'पूर्वजन्मींचा कांहीं

ऋणानुबंध असेल.... ' ती गोष्ट अजून मी विसरलों नाहीं आणि जर पुनर्जन्म मान्य केला नाहीं तर जीवनाला अर्थच काय उरला ? मला आतां साप चावला आणि मी मरून गेलों तर मग मीं आजवर जें ज्ञान मिळविलें तें काय सारें फुकट गेलें ? सापासारख्या एका क्षुद्र आणि निर्बुद्ध प्राण्याच्या दंशामुळें जर माझें सारें ज्ञान एका क्षणांत नष्ट होणार असेल तर माझी ज्ञान मिळवायची इच्छाच नाहींशी होऊन जाईल. परन्तु अजूनहि मला ज्ञानप्राप्तींत आनंद वाटतो. कारण माझा पुनर्जन्मावर विश्वास आहे. "

नवीन जन्मांत पूर्वजन्मींच्या ज्ञानाची व अनुभवाची पुंजी घेऊनच आपण येतो. या पुंजीवर व्यापार करण्याइतकें मर्यादित स्वातंत्र्य प्रत्येक माणसाला असतें. बैलाच्या जन्मांत बैलाला शक्य तेवढें सारें काम करतां येईल, पण हत्तीचें काम करतां येणार नाहीं. अशा पद्धतीनें त्यांचें जन्ममरणाचें तत्त्वज्ञान विचारावर आधारलेलें आहे. म्हणूनच त्यांना मरणाची भीति वाटत नाहीं. त्यांच्या भूदान चळवळीमुळें चिडलेले कांहीं लोक त्यांच्या दर्शनाकरितां म्हणून आले. ते खोलींत एकटेच होते. त्यांच्यापैकीं एकजण रागानें म्हणाला. ' एका माणसानें देशाचे तुकडे केले म्हणून त्याला स्वर्गाचा रस्ता दाखविला. आतां तुम्ही जमिनीचे तुकडे करीत आहां, तर तुम्हांलाहि तोच रस्ता दाखविला जाईल. ' त्याला नमस्कार करून विनोबा म्हणाले, " नारायणा, तुझीं अनेक स्वरूपें पाहिलीं पण तुझें हें स्वरूप पाहिलें नव्हतें. मृत्यूच्या स्वरूपांत तुला भेटायचें असलें तर त्यालाहि माझी तयारी आहे. " मरण येणें केवळ परमेश्वराधीन असल्यामुळें ते निर्भय आहेत.

त्यांना महाराष्ट्राचा अभिमान नाहीं; पण महाराष्ट्राबद्दल प्रेम आहे. ते म्हणतात, " आपल्या प्रांताच्या अभिमानांत आपण भारतीय संस्कृतीचें एकत्व विसरता कामा नये. ' दुर्लभं भारते जन्म ' असें पूर्वसूरींनीं म्हटलें आहे, 'दुर्लभं महाराष्ट्रे जन्म ' असें म्हटलेलें नाहीं, हें आपण लक्षांत ठेवलें पाहिजे. त्यांना दहा-बारा भाषा येत असल्या तरी त्यांचें चिंतन, मनन, लेखन मराठींतूनच चालतें. माझें हृदय मराठींतूनच व्यक्त होत असतें. एवढयानें माझें कर्तव्य पूर्ण होतें कीं नाहीं याचा विचार तुम्हीच करा............ आमच्या भाषेंत आमच्या विशेष गुणाचा विकास दिसून येतो. या गुणाचें संवर्धन आपण केलें पाहिजे.....आमचा स्वत:बद्दल फार गैरसमज झालेला आहे. तो आम्हीं दूर केला पाहिजे. मी महाराष्ट्रांत पायीं हिंडलों आहे. तेथें प्रेमळपणा, भक्तिभावना, मातृभावना अधिक आहे, असा मला अनुभव आला. आपण ज्ञानेश्वराला व ज्ञानेश्वरीला आई म्हणतों. ज्ञानेश्वरांनीं तर आत्म्याला सुद्धां माउली म्हटलें, ' येथें प्रियासी भेटे माउली आत्मा. ' सबंध जगाच्या साहित्यांत आत्म्याला माउली म्हटलेलें कोठेंच आढळणार नाहीं. मातृवात्सल्य, मातेची उपासना हें महाराष्ट्राचें वैशिष्ट्य आहे.....महाराष्ट्राचें हृदय नारळासारखें आहे; वरून खडकासारखें पण आंत जिव्हाळ्याचा मधुर झरा. उपरोध, उपहास, वक्रोक्ति इत्यादि अलंकार ज्ञानदेवांनीं वाणीचे मोठे दोष मानले आहेत. ज्ञानदेवांचा कांहीं कमी छळ झाला नाहीं. पण ज्ञानेश्वरीमध्यें तिरस्काराचा, कटुतेचा एक शब्दहि नाहीं. " पाश्चात्य साहित्याच्या परिशीलनानें आपण रुक्ष व तार्किक बनलों, पण हा आपला मूळ स्वभाव नव्हे असें विनोबांचें मत आहे.

विनोबांचे चरित्रांत सांगण्यासारख्या घटना अशा थोड्याच आहेत. ते स्वतःच म्हणतात, “ माझें चरित्र दुसऱ्या कुणी लिहूं नये. लिहावयाचें झाल्यास मी आत्मचरित्र लिहीन; कारण, माझें बहुतेक जीवन आंतरजीवन आहे. ” स्वतःचें चरित्र सांगायला देखील ते उत्सुक नसतात. ते म्हणतात, ‘ चरित्र म्हणजे भूतकाळ ’ तो मेला आणि चारित्र्य म्हणजे वर्तमानकाळ. जें घडत असतें तें तुमच्यासमोर आहेच तें लिहायला नकोच. अर्थात् विनोबांचें हें म्हणणें आम्ही मानणार नाहीं. स्वाभाविक विनयामुळें जी गोष्ट त्यांना निरुपयोगी वाटते तीच आमच्या कृतज्ञताबुद्धीमुळें आम्हांला महत्त्वाची वाटते. त्यांचें चरित्र स्वल्प असलें तरी त्यांचें चारित्र्य फार मोठें आहे आणि त्यांनीं केलेली मानवतेची सेवा फार मोठी आहे. कुठलासा एक सुलतान एक पुराना ग्रंथालय जाळायला निघाला. तेव्हां लोकांनीं, त्यानें तसें करूं नये म्हणून विलंब केला. त्यानें त्यांचें ऐकलें तर नाहींच, पण वर तो म्हणाला, “ कुराणांत नसलेलें ज्ञान यांत असेल तर तें जरुरीपेक्षां जास्त म्हणून तें निरुपयोगी आहे व कुराणांत असलेलेंच ज्ञान यांत असेल तर तें मुळांतच निरुपयोगी आहे. ” विनोबा स्वतःच्या चरित्र-लेखनाबद्दल असाच बुद्धिवाद करीत आहेत. विनोबा हेहि एक सुलतानच आहेत. फरक एवढाच कीं, तो सुलतान गर्वोद्धत होता आणि त्याचें वैभव रक्तलांछित होतें; तर उलट विनोबा विनम्र आहेत आणि त्यांचें वैभव फकिराचें असलें तरी तें कुबेरालाहि विनम्र करणारें आहे.

महात्मा गांधींनीं स्वतंत्र भारत कसा असावा याचें कांहीं एक चित्र कल्पनेनें मनाशीं रंगविलें होतें. तें साकार करण्याची संधि दुर्दैवानें त्यांना दिली नाहीं. गांधीजींची

हिंदुमुसलमान प्रश्नाबाबतची भूमिका मान्य नसलेल्यांना त्यांची देशभक्ति, मानवतेवरील त्यांची प्रीति आणि मानवाच्या मूलभूत सद्‌गुणांबद्दल त्यांना वाटणारा दृढविश्वास या त्यांच्यांतील गुणांबद्दल आदर वाटे आणि स्वराज्यप्राप्तीनंतरच्या विधायक कार्याला त्यांचा उपयोग होण्यापूर्वींच त्यांचा असा दु:खद अंत व्हावा याचाहि त्यांना विषाद वाटला. सुदैवाची गोष्ट एवढीच कीं, गांधीजी गेले तरी त्यांचें स्वदेशसेवेचें सूत्र मात्र ईश्वरानें तोडलें नाहीं. त्यांचे दोन थोर सुपुत्र पंडित जवाहरलाल नेहरू आणि विनोबा भावे यांनीं त्यांच्या स्वीकृत कार्याची ध्वजा आपआपल्या परीनें उंच उंच फडकत ठेवली आहे. दोन मोठ्या माणसांची तुलना सहसा करूं नये असें म्हणतात आणि तें कदाचित् खरेंहि असेल. तरी पण मला मात्र या दोन थोर पुरुषांची तुलना करायचा मोह अनावर होतो. दृष्टांतानेंच ही तुलना करतों म्हणजे झालें. पार्वतीमातेनें एकदा कार्तिकेय व गणपति या आपल्या दोन्ही मुलांना पृथ्वीप्रदक्षिणा करून यायला आज्ञा दिली 'आणि कोण आधीं येतो तें पाहूं' असेंहि ती म्हणाली. कार्तिकेयाची वेगवान भरारी गजाननाला कधीं तरी साधली असती काय? पण त्या बुद्धिदात्या गजाननानें क्षणभर शास्त्रार्थाचा विचार केला आणि लागलीच पार्वतीमातेला प्रदक्षिणा घालून व नमस्कार करून तो म्हणाला, 'आई, तूं पृथ्वीइतकीच थोर आहेस असें शास्त्र सांगतें, तेव्हां आतां मी पैज जिंकलों किंवा नाहीं तें तूंच सांग!' या गोष्टींतल्या कार्तिकेयाप्रमाणें भारतांतच नव्हे तर भारताबाहेरहि शांततावादाची शिकवण देण्याकरितां विमानवेगानें पंडितजी फिरत आहेत तर जन्मभूमींतच पदसंचार करून अहिंसेच्या मार्गानें समानतेचा

महामंत्र विनोबाजी देत आहेत. तेव्हां कुणाचें कार्य मोठें व कुणाचें कार्य लहान असा प्रश्न मीच उपस्थित करून मींच त्याचें उत्तर सांगतों कीं, पंडितजींचें कार्य मोठें तर खरेंच पण विनोबांचें कार्यहि लहान नाहीं. शिवाय दोन्हींहि एकमेकांना पूरकच आहेत. आषाढाच्या पावसाचा जोम आणि घनगर्जितें श्रावणसरींत न आढळलीं तरी श्रावणाचा भीजपाऊसच दाणा भरायला उपयोगीं पडतो हें कोण नाकारील?

◆◆◆

# उपायन

ले. मनोहर महादेव केळकर

[ किं. २॥ रु. ]

★ वेगवेगळ्या नमुन्याच्या ११ कथा आणि विविध-प्रकारचे १० लेख यांचा हा संग्रह आहे.

★ "भाषेचा साधेपणा, वृत्तीचा सरळपणा, प्रतिपादनांतील सच्चेपणा, खोट्या अभिनिवेशाचा अभाव इत्यादि किती तरी मनोरम गुणांनीं 'उपायन' हा संग्रह नटलेला आहे."

— य. गो. जोशी

★ " कोणताहि लेख वाचला तरी सुंदर भाषा आणि विषयाशीं एकरूप होण्याची लेखकची मनोवृत्ति या दोन विशेषांचा वाचकांस अनुभव येतो. " —द. के. केळकर

● ● ●

याच लेखकाचें आगामी प्रकाशन

## —तें माझें घर—

★ आपल्या घरावर प्रेम असणाऱ्या प्रत्येकाला पुनः प्रत्ययाचा एक उदात्त अनुभव आणून देणाऱ्या आणि वाचतां वाचतां तल्लीन करून सोडणाऱ्या ललित-निबंधांचा संग्रह.

मनोहर ग्रंथमाला : टिळक रोड, पुणें २

REFBK-0008914

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर
अनुक्रम .................... दि: ....................
क्रमांक .................... नों. दि ....................